दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, निःपक्ष
https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com

।। गण गण गणांत बोते ।।
प्रतिक्षा मसाले & ड्रायफ्रूट्स
fssai 21523054003140
। काळा मसाला । मिरची भाजी मसाला । नॉन व्हेज मसाला । व्हेज मसाला
। इडली प्रिमीक्स । डोसा प्रिमीक्स । बिट्टी प्रिमीक्स । ढोकळा प्रिमीक्स
। अप्पे प्रिमीक्स । शेंगदाना लाडू । ड्रायफ्रूट लाडू । डिंक लाडू । जवस लाडू
। मेथी लाडू । तसेच सर्व प्रकारच्या चटण्या मिळेल.
पत्ता:- सर्क्युलर रोड, चिंचोले चौक, अदिती अर्बन समोर, अक्षरा गिफ्ट शॉपी जवळ, शॉप. नं. 2 बुलडाणा
मो. 7666232414

## दिल्लीत महिलांना आता 'नाइट शिफ्ट' करता येणार!



**नवी दिल्ली :** महिला सक्षमीकरणाच्या दिशेने दिल्ली सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. दिल्लीत आता महिलांना पुरुषांप्रमाणे रात्रीच्या वेळी दुकाने आणि व्यावसायिक आस्थापनांमध्ये काम करण्याची (नाइट शिफ्ट) परवानगी मिळाली आहे. दिल्ली सरकारने या निर्णयाची औपचारिक अधिसूचना जारी केली आहे.

## न्यूज ब्रीफ

### राज आणि उद्धव ठाकरेंची भाऊबीज एकत्र

**मुंबई :** देशभरात भाऊबीज उत्साहात साजरी करण्यात आली. हा सण भावाबहिणीच्या प्रेम आणि जिव्हाळ्याच्या नात्याचा उत्सव आहे. त्याच पार्श्वभूमीवर ठाकरे कुटुंबात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोघेही त्यांची बहीण जयजयवंती यांच्या घरी भाऊबीज साजरी करण्यासाठी सहकुटुंब गेले होते. यावेळी आदित्य आणि तेजस ठाकरे यांना उर्वशी यांनी ओवाळले. उद्धव ठाकरे बुधवारी राज ठाकरे यांचे निवासस्थान शिवतीर्थ येथे गेले होते.

### 'इराण आजही अणूबॉम्ब बनवू शकतो'

**तेहरान :** इराणकडे अजूनही अणूबॉम्ब बनवण्याएवढे पर्याप्त प्रमाणात युरोनियम उपलब्ध आहे. इराणकडे जवळपास ४०० किलोग्रॅम ६० टक्के शुद्ध युरेनियम आहे, असे आंतरराष्ट्रीय अणूऊर्जा एजन्सीचे प्रमुख राफेल ग्रोसी म्हणाले. अलीकडेच अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी वांस म्हणालेले की, '१० अणूबॉम्ब बनवण्यासाठी ४०० किलोग्रॅम युरेनियम पुरेसे आहे' कूटनितीक चर्चा अपयशी ठरली, तर इराण विरुद्ध बल प्रयोग होऊ शकतो' असा इशारा ग्रोसी यांनी दिला.

### प्रत्येक जिल्ह्यात कर्करोगावर उपचार

**नागपूर :** राज्यातील कर्करुग्णांना अद्यावत उपचार मिळावे म्हणून शासन प्रभावी धोरण करत आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात कर्करोगावर उपचाराची व्यवस्था सक्षम केली जात आहे. तर नागपुरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) येथे अद्यावत कॅन्सर रुग्णालय आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर रुग्णालयातील अपूर्ण इमारतीला निधी देऊन हे कर्करोग रुग्णालयही अद्यावत केले जाईल. तर राज्यातील सर्व कर्करुग्णांवरील केंद्र एक- मेकांशी जोडण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

### ठेव खाती, लॉकरसाठी नॉमिनी नियमात बदल!

**नवी दिल्ली :** बँक ग्राहकांना १ नोव्हेंबर २०२५ पासून त्यांच्या खात्यात जास्तीत जास्त चार नॉमिनी (नामनिर्देशित व्यक्ती) निवडण्याचा पर्याय मिळणार आहे. या निर्णयामुळे संपूर्ण बँकिंग प्रणालीमध्ये दाव्यांचे समाधान कार्यक्षम पद्धतीने होण्यास मदत मिळेल, अशी अपेक्षा आहे. अर्थ मंत्रालयाच्या माहितीनुसार, बँकिंग कायदे (दुरुस्ती) अधिनियम, २०२५ मधील नॉमिनेशन संबंधित प्रमुख तरतुदी १ नोव्हेंबर पासून लागू होणार आहेत.

### महाआघाडीचे ठरले : मुकेश साहनी उपमुख्यमंत्री पदाचे उमेदवार

# बिहारमध्ये तेजस्वी यादव मुख्यमंत्री पदाचे उमेदवार

**नवी दिल्ली/पाटणा, वृत्तसंस्था :**

बिहार निवडणुकीसाठी महाआघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा राजद प्रमुख तेजस्वी यादव असतील. काँग्रेस नेते अशोक गेहलोत यांनी महाआघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. त्यांनी सांगितले की जर सरकार स्थापन झाले तर मुकेश साहनी उपमुख्यमंत्री असतील. इतर उपमुख्यमंत्री देखील मागासवर्गीय समाजातील असतील.

गेहलोत म्हणाले की तेजस्वी यादव आमचे नेते आहेत. एनडीएने त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असेल हे जाहीर करावे. आम्ही नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवू असे म्हणणे पुरेसे नाही. या घोषणेनंतर तेजस्वी यादव म्हणाले, तुम्ही माझ्यावर विश्वास दाखवला आहे. मी सर्वांचे मनापासून आभार मानतो. मी सर्वांना सांगू इच्छितो की त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचे मी पालन करेन. मी २० वर्षांचे अकार्यक्षम सरकार उलथवून टाकेन. महाआघाडीची संयुक्त पत्रकार परिषद ५० मिनिटे चालली. राजद, काँग्रेस आणि व्हीआयपीसह सात पक्षांचे १४ नेते उपस्थित होते. सर्व पक्षांच्या नेत्यांना बोलण्याची संधी देण्यात आली. सर्व महाआघाडीतील एकतेबद्दल बोलले.

### बिहार जगातील सर्वात गरीब राज्य : तेजस्वी यादव



■ तेजस्वी यादव म्हणाले, २० वर्षांच्या जेडीयू राजवट आणि ११ वर्षांच्या मोदींच्या राजवटीत, बिहार हे जगातील सर्वात गरीब राज्य आहे. बिहारमध्ये एकही उद्योग नाही. बिहारमधून लोक स्थलांतरित होत आहेत. दरडोई उत्पन्नात बिहार मागे आहे. लाच घेतल्याशिवाय येथे काहीही होत नाही. लोकप्रतिनिधींनाही प्रतिनिधित्व नाही. विभाग मंत्र्यांकडून नव्हे तर अधिकाऱ्यांकडून चालवले जातात. असंख्य घोटाळे झाले आहेत, परंतु कोणालाही अटक झालेली नाही. पाटण्याच्या रस्त्यांवर गोळ्या झाडल्या जात आहेत, व्यावसायिकांची हत्या झाली आहे, परंतु कुठेही काहीही झालेले नाही, असा हल्लाबोल यादव यांनी केला.

# ८० रुपयात मतदार यादीतून नाव वगळले!

### एसआयटीने सहा संशयितांना केली अटक

**बेंगळुरू, वृत्तसंस्था :**

कर्नाटकच्या अलांड मतदारसंघात २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत मतदान चोरीच्या आरोपांची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाला (एसआयटी) मतदार यादीतून नावे वगळण्याचे प्रयत्न आढळले आहेत. एसआयटीने यात सहभागी असलेल्या किमान सहा संशयितांना अटक केली आहे. एक नाव वगळण्यासाठी ८० रुपये देण्यात आले होते.

मतदार यादीतून नावे वगळण्यासाठी एकूण ६,९९४ विनंत्या करण्यात आल्या होत्या, परंतु काही खऱ्या प्रकरणांशिवाय, उर्वरित सर्व अर्ज बनावट होते. कलबुर्गीमध्ये येणारा अलांड हा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा गृह जिल्हा आहे आणि काँग्रेस आमदार बी.आर. पाटील या विधानसभा जागेचे प्रतिनिधित्व करतात. पाटील आणि खरगे यांचे पुत्र प्रियांक खरगे यांनी मतदार यादीतून नावे वगळण्याच्या प्रयत्नांचा पर्दाफाश केला आणि कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना माहिती दिली. पाटील यांच्या मते, एकूण ६,९९४ काँग्रेस मतदारांची नावे वगळण्यासाठी अर्ज सादर करण्यात आले होते. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी स्थिती जैसे थे ठेवण्याचा आदेश दिल्यानंतर ही प्रक्रिया थांबवण्यात आली.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अलीकडेच दिल्लीत पत्रकार परिषदेत ''मत चोरी'' कशी होत आहे याबद्दल भाष्य केले आणि अलांदचे उदाहरण दिले. पाटील म्हणाले की जर ही नावे काढून टाकली असती तर ते निश्चितच निवडणूक हरले असते. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी सुभाष गुट्टेदार (भाजप) यांच्यावर सुमारे १०,००० मतांनी विजय मिळवला. हे प्रकरण गांभीर्याने घेत, कर्नाटक सरकारने सीआयडीचे अतिरिक्त पोलिस महासंचालक बी.के. सिंह यांच्या नेतृत्वाखाली ''मत चोरी'' चौकशीसाठी एसआयटी स्थापन केली.



### मतचोरीचा घोटाळा उघड : वडेट्टीवार

**मुंबई :** कर्नाटकातील आळंद मतदारसंघात प्रति मतदार ८० या दराने मतदार यादीतून मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा दावा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, कर्नाटकात मतचोरीचा घोटाळा उघड. कर्नाटक राज्यातील आळंद मतदारसंघात झालेल्या मतचोरी प्रकरणाची धक्कादायक माहिती समोर आली आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत या घोटाळ्याची संपूर्ण पोलखोल केली होती.

### वर्ल्ड रेकॉर्ड : नवी सिक्सर क्वीन



**मुंबई :** महिला वनडे वर्ल्ड कप स्पर्धेतील सेमीफायनलचे तिकीट पक्के करण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या सामन्यात वनडे क्वीन स्मृती मानधना हिच्या भात्यातून कडक आणि विक्रमी शतकी खेळी पाहायला मिळाली. न्यूझीलंड विरुद्धच्या करो वा मरो लढतीत स्मृतीने ८८ चेंडूत अखेर शतकी डाव साधला. यंदाच्या वर्ल्ड कप स्पर्धेत भारतीय बॅटरच्या बॅटमधून आलेले हे पहिले शतक ठरले. या शतकी खेळीसह स्मृतीने खास विक्रमालाही गवसणी घातली.

### भारत डिसेंबरपर्यंत रशियन तेल खरेदी थांबवेल

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा सांगितले की भारत रशियाकडून होणारी तेल खरेदी हळूहळू कमी करत आहे आणि वर्षाच्या अखेरीस ती जवळजवळ बंद करेल. पंतप्रधान मोदींनी स्वतः त्यांना याची खात्री दिली होती. व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, तेल खरेदी ही अशी गोष्ट आहे जी लगेच थांबणार नाही, परंतु वर्षाच्या अखेरीस ते शून्यावर आणले जाईल.

# लोकपाल सदस्यांना ७० लाखांची बीएमडब्ल्यू

### अण्णा हजारे यांनी नोंदवली तीव्र हरकत

**मुंबई, वृत्तसंस्था :**

भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी भारतात लोकपाल व्यवस्था लागू करण्यात आली. पण आता लोकपाल अध्यक्ष व त्यांच्या सात सदस्यांना आलिशान व महागड्या बीएमडब्ल्यू गाड्या घेऊन देण्यात येणार आहेत. लोकपालसाठी ऐतिहासिक लढा देणाऱ्या ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

लोकपाल अध्यक्ष व सदस्य अशा एकूण ७ जणांसाठी आलिशान बीएमडब्ल्यू कार खरेदी करण्यात येणार आहेत. या सीरिजच्या एका कारची किंमत ७० लाखांच्या घरात आहे. त्यामुळे त्यावर ५ कोटींहून अधिकचा खर्च येण्याची शक्यता आहे. सरकारने या प्रकरणी एक निविदा जारी केली आहे. पण विरोधकांच्या टीकेमुळे ही निविदा वादात सापडली आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही



या प्रकरणी नाराजी व्यक्त करत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकावर टीका केली आहे.

### आम्ही खूप झगडलो : अण्णा हजारे

■ भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आम्ही एक क्रांतिकारी लढा लढला. आम्ही खूप झगडलो. संघर्ष केला. त्यातून लोकपाल पुढे आला. आपण भ्रष्टाचार होऊ नये अशी अपेक्षा करतो. पण त्यानंतर भ्रष्टाचार होण्यासाठी कारवाई होत असेल तर ती फार दुर्दैवी गोष्ट आहे, असे अण्णा हजारे गुरूवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले.

# पंतप्रधान मोदी आसियान शिखर परिषदेला लावणार व्हर्च्युअल हजेरी

### मलेशियन पंतप्रधानांकडून मोदींच्या निर्णयाचा सन्मान

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी मलेशियात सुरू होणाऱ्या आसियान शिखर परिषदेला वेळापत्रकाच्या अडचणींमुळे उपस्थित राहू शकणार नाहीत. पंतप्रधान मोदी व्हर्च्युअल पद्धतीने या शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. मलेशियाचे पंतप्रधान इब्राहिम यांनी याची खातरजमा केली असून, त्यांच्या निर्णयाचा आदर करीत असल्याचे सांगितले.

४७ वी आसियान शिखर परिषद आणि संबंधित शिखर परिषद २६ ते २८ ऑक्टोबरदरम्यान मलेशियातील क्वालालंपूर येथे होणार आहे. पंतप्रधान अन्वर इब्राहिम आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिखर परिषदेबाबत चर्चा केली. संभाषणादरम्यान दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यावर आणि विविध क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावर चर्चा केली. संभाषणाची माहिती शेअर करताना मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी सोशल



मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, मला माझे मित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोन आला, ज्यामध्ये आम्ही मलेशिया-भारत संबंध अधिक धोरणात्मक आणि व्यापक पातळीवर नेण्याच्या प्रयत्नांवर चर्चा केली. शिखर परिषदेशी संबंधित चर्चेत भारताच्या सहभागाबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. आसियान-भारत शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींचा सहभाग व्हर्च्युअल पद्धतीने होण्याची शक्यता आहे.

# इंदौर शहरात अग्नितांडवात काँग्रेस नेत्याचा मृत्यू

### पत्नीसह दोन मुलींची प्रकृती गंभीर..

**इंदौर, वृत्तसंस्था :**

मध्य प्रदेशातील इंदौर शहरात २३ ऑक्टोबर रोजी सकाळी अग्नितांडवात कार शोरूमचे मालक आणि काँग्रेस नेते प्रवेश अग्रवाल यांच्या मृत्यू झाला. त्यांची पत्नी व दोन मुलींची प्रकृती गंभीर आहे. आग स्वयंपाकघरात लागली आणि बघता बघता ती संपूर्ण घरात पसरल्याली.

हा अपघात इंदौरच्या लसूडिया पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सौम्या मोटर्सच्या वर असलेल्या पेंट हाऊसमध्ये घडला. प्रवेश अग्रवाल हे माजी मुख्यमंत्री कमल नाथ यांचे निकटवर्तीय होते. प्रवेश अग्रवाल यांच्या घराच्या स्वयंपाकघरात आग लागली, जी हळूहळू



पूर्ण घरात पसरली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी तातडीने सर्वांना रुग्णालयात पोहोचवले. तिथे डॉक्टरांनी प्रवेश अग्रवाल यांना मृत घोषित केले. प्रवेश यांची पत्नी रेखा यांची प्रकृतीही गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांची १४ वर्षांची मुलगी सौम्या आणि १२ वर्षांची मायरा याही जखमी झाल्या आहेत.

### मनोज जरांगेंचा एल्गार | भाऊबीजेला केली घोषणा

# शेतकऱ्यांसाठी राज्यभरात आंदोलन पेटणार

**जालना/प्रतिनिधी**

मराठा आंदोलनासाठी मनोज जरांगे पाटील यांनी रान पेटवले. मराठा-कुणबी आंदोलनाबाबत हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेट लागू करण्याचा निर्णय झाला आहे. आता जरांगे पाटील हे शेतकऱ्यांसाठी मैदानात उतरले आहेत. राज्यातील २९ जिल्ह्यांना मुसळधार पावसाने झोडपले आहे. अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. पण मदतीचा मोठा हात अद्यापही शेतकऱ्यांपर्यंत पोहचला नाही. ३ हजारांहून अधिक कोटींच्या पॅकेजची घोषणा झाली. पण दिवाळी संपूनही शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागले नाही. त्याविरोधात जरांगे पाटील यांनी भाऊबीजेलाच आंदोलनाचा नांगर टाकला आहे.



भाऊबीजेच्या दिवशी आम्ही यादी तयार करतो. लवकरच बैठक घेऊन शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारणार आहे. अनेक ठिकाणी सरकार पेक्षा अधिकारी मोठे झाले आहेत. जे अधिकारी काम करत नाही त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. दिलेली मदत ही मदत म्हणता येणार नाही. तो तात्पुरता आनंद आहे. जसे की फडणवीस हे प्रत्येकाला तात्पुरता आनंद देतात. धनगर समाजाला देखील तात्पुरता आनंद दिला. शेतकऱ्याचे काम करणारे अभ्यासक, तज्ञ, नेते एकत्र बसू. सगळ्यांना फोन करून बोलावणार आहे, असे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले.

### लाडकी बहीण आणि दाजीसाठी मैदानात

■ मनोज जरांगे पाटील म्हणाले आमच्याकडे एकच इमानदारीने लढण्याची आणि ती जिंकण्याची गोष्ट आहे. सर्व संघटनेचे, पक्षाचे शेतकरी नेते आम्ही अंतरवालीत बोलावणार. पहिला टप्पा एकत्र बसून चर्चा करु. नंतर सर्वांची बैठक आणि त्यानंतर आंदोलनाची दिशा ठरवणार. आमदारांकडे हजारो कोटींच्या प्रॉपट्या आहेत. तरी त्यांना पाच कोटी देण्यात येत आहेत. भाऊबीज निमित्त लाडक्या बहिणीला लाडक्या दाजीला सगळ्यांना न्याय दिल्याशिवाय शांत बसायचं नाही. असे ऐतिहासिक आंदोलन पुन्हा होणार नाही हे देश सुद्धा पाहिल, असे जरांगे म्हणाले.

### 'वडिलांनी केलेला मालमत्ता करार मुलगा रद्द करू शकतो'

**नवी दिल्ली :** अल्पवयीन मुलांचे वडील किंवा कायदेशीर पालक यांनी केलेला मालमत्ता विक्री किंवा हस्तांतरण करार मुलगा किंवा मुलगी १८ वर्षांचे झाल्यानंतर खटला न भरता रद्द करू शकतात, असा महत्त्वपूर्ण निर्णय के.एस. शिवप्पा विरुद्ध के. नीलम्मा या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

कर्नाटकातील शमनूर गावात १९७१ मध्ये रुद्रप्पा यांनी त्यांच्या तीन अल्पवयीन मुलांच्या नावावर दोन भूखंड खरेदी केले होते. रुद्रप्पा यांनी न्यायालयाच्या परवानगीशिवाय हे भूखंड विकले. मुलगे सज्ञान झाल्यावर त्यांनी ते भूखंड के. एस. शिवप्पा यांना विकले. यापूर्वी भूखंड खरेदी करणाऱ्या तिसऱ्या पक्षांनी मालमत्तेवर मालकी हक्क सांगितल्याने कायदेशीर वाद निर्माण झाला होता.

# संरक्षण व एरोस्पेस उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची आता नवी ओळख

### मुख्यमंत्री फडणवीस ▶ मिहान मधील २२३ एकर भूखंडाचे हस्तांतरण

**नागपूर, वृत्तसंस्था :**

सोलर डिफेंस अँड एरोस्पेस ही भारतातील अग्रगण्य उत्पादक कंपनी नागपूर येथे विस्तार करीत आहे. या अत्याधुनिक संरक्षण व एरोस्पेस उत्पादन प्रकल्पासाठी अटी व शर्तीनुसार मिहानतर्फे २२३ एकर जागेचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

रामगिरी निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात मिहान प्रकल्पातील वैशिष्ट्यपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्पासाठी जमिनीचे हस्तांतरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सोलार कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांना करण्यात आले. सोलर डिफ न्स अँड एरोस्पेसच्या या नव्या विस्तारित प्रकल्पामुळे नागपूरला देशातील प्रमुख संरक्षण व एरोस्पेस उत्पादन केंद्र म्हणून नवी ओळख प्राप्त होणार असल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. हा उपक्रम महाराष्ट्राच्या 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' आणि औद्योगिक प्रगतीच्या विकासासाठी अधिक बळकटी देणारा असल्याचे ते म्हणाले.



### ४०० प्रत्यक्ष रोजगार निर्मिती

■ सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी भारतात संरक्षण क्षेत्रात सुमारे १२ हजार ८० कोटींची गुंतवणूक करत आहे. नागपूर येथे यातील ६८० कोटी रुपयांची गुंतवणूक करून हा प्रकल्प मिहान मधील विशेष आर्थिक क्षेत्रात साकारला जात आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ४०० प्रत्यक्ष रोजगार निर्मिती व सुमारे एक हजार अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.

## न्यूज ब्रीफ

### राजकीय वरदहस्ताने लाडकी बहीण योजनेत घोटाळा : आदित्य ठाकरे

**मुंबई :** ऐन दिवाळीच्या तोंडावर राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहिण योजनेत १६४ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची माहिती समोर आल्याने खळबळ उडाली आहे. बोगस लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे उघड झाले आहे. यावर ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर गंभीर आरोप करत, सरकारी यंत्रणेच्या वापराशिवाय आणि राजकीय वरदहस्त असल्याशिवाय हा घोटाळा होणे शक्य नसल्याचा थेट सवाल उपस्थित केला आहे.
एका बाजूला सणासुदीच्या काळात जनतेच्या पैशांची अशी लूट सुरू असताना, दुसरीकडे राज्यातील शेतकरी मात्र मदतीविना अंधारात असल्याबद्दल आदित्य ठाकरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळेल, असे खोटे आश्वासन सत्ताधाऱ्यांनी दिले.

पुणे पोलिसांच्या अहवालानंतर महत्त्वपूर्ण निर्णय..

# कुख्यात गुंड नीलेश घायवळचा पासपोर्ट अखेर रद्द

**पुणे, वृत्तसंस्था :**

पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. कोथरूड गोळीबार प्रकरणात मकोका कारवाईनंतर पोलिसांना चकवा देऊन परदेशात पळून गेलेल्या घायवळचा पासपोर्ट अखेर रद्द करण्यात आला आहे. याप्रकरणी प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयातून ऑर्डर जारी करण्यात आली आहे. पुणे पोलिसांच्या अहवालानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, पासपोर्ट रद्द झाल्यामुळे नीलेश घायवळच्या अडचणी वाढणार आहेत.

गुंड घायवळच्या कारनाम्यांची माहिती समोर आल्यानंतर पुणे पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी त्याचा पासपोर्ट रद्द करण्याचे आदेश दिले होते. तसेच, यापूर्वीच त्यांनी घायवळची बँक खाती गोठवली होती. पासपोर्ट रद्द झाल्यामुळे आता घायवळला भारतात परतणे भाग पडेल, अन्यथा त्याला त्या देशात अवैध ठरवले जाऊन




अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

यामध्ये सर्वात आश्चर्यजनक बाब म्हणजे, नीलेश घायवळने पासपोर्ट मिळवण्यासाठी स्वतःचे नाव बनावट पद्धतीने वापरले. बदलामुळे त्याचा पासपोर्ट आणि त्यावरील तपशील पूर्णपणे अधिकृत दिसत राहिला. त्यामुळे त्याला सहजतेने व्हिसा मिळाला आणि युरोपला जाण्यात कोणतीही अडचण आली नाही. पाच वर्षे या स्पेलिंगच्या गडबडीबाबत पोलिसांना वा पासपोर्ट अधिकाऱ्यांना काहीही कळले नाही, ही गोष्ट अधिकच धक्कादायक ठरली आहे. एका कुख्यात गुंडाने अशा प्रकारे कायदेशीर कागदपत्रांत फेरफार करून यंत्रणेला चकवा देणे हे पोलिस व प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे ठरले आहे.

### मकोका अंतर्गत कारवाई

■ नीलेश घायवळच्या न्यायालयीन प्रकरणातही अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. २०२१ साली त्याला पुण्यातील एका दरोड्याच्या गुन्ह्यात अटक झाली होती आणि त्याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. पुढील वर्षी म्हणजे २०२२ मध्ये त्याला या प्रकरणात जामिन मिळाला, मात्र त्यावेळी न्यायालयाने घायवळला आपला पासपोर्ट पोलिसांकडे जमा करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. तरीसुद्धा घायवळने पासपोर्ट जमा केला नाही आणि पोलिसांनीदेखील तो स्वतःकडे घेतला नाही. हीच गंभीर त्रुटी घायवळसाठी मोठ्या फायद्याची ठरली. त्याने याच पासपोर्टचा वापर करून परदेश प्रवास केला आणि सध्या कायद्याच्या कचाट्यातून वाचलेला आहे.

# आरएसएसवर बंदी घालण्याची मागणी करणारे राष्ट्रद्रोही : चंद्रशेखर बावनकुळे

**भंडारा, वृत्तसंस्था :**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही राष्ट्रभक्ती, समाजसेवा आणि राष्ट्रनिर्माण यासाठी कार्य करणारी देशातील प्रमुख संस्था आहे. या संस्थेवर बंदी घालण्याची मागणी करणारे लोक मूर्ख आणि राष्ट्रद्रोही आहेत, अशी टीका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.

भंडाऱ्यात पत्रकारांशी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशात राष्ट्रभावना निर्माण केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेत संघाची विचारधारा प्रतिबिंबित होते. त्यामुळे जो कोणी संघावर बंदी घालण्याचा विचार करतो, तो खरे तर राष्ट्रद्रोही आहे.

शेतकऱ्यांच्या बाबतीत प्रश्न विचारण्यात आला तेव्हा चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्राच्या स्थापनेपासून आजपर्यंत कोणत्याही सरकारने शेतकऱ्यांना ३२ हजार कोटी रुपयांचं पॅकेज दिले नव्हते. हे पॅकेज शेतकऱ्यांना दिलासा देणारे ठरणार असून रब्बी हंगामासाठी आवश्यक भांडवल उभे करण्यास मदत करेल. आम्ही शेतकऱ्यांचे संपूर्ण नुकसान भरून काढू असे म्हणत नाही, पण हे पॅकेज शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची ताकद देईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेल्याचा आरोप काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला होता. त्यावर प्रत्युत्तर देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्र सरकारने दिवाळीपूर्वीचे शेतकऱ्यांसाठी ठोस उपाययोजना केल्या आहेत.

### आम्ही महायुतीत राहूनच निवडणूक लढवणार : उदय सामंत

**मुंबई :** आम्ही महायुतीत राहूनच निवडणूक लढवणार आहोत. पण, स्थानिक पातळीवर कोणी जास्त खुमी दाखवली तर धनुष्यबाण कसा चालतो ते दाखवू, असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिला आहे.

एकनाथ शिंदे यांनी सुद्धा महायुतीत राहूनच निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली आहे. तिन्ही पक्षाच्या नेत्यांना त्रास होणार नाही. महायुतीत जागावाटपाचा जो फॉर्म्युला असेल त्यानुसारच निर्णय होतील. तसेच महायुतीत मिठाचा खडा टाकणाऱ्यांना मात्र बाजूला केले पाहिजे, अशी भूमिका सामंत यांनी मांडली आहे. उदय सामंत म्हणाले, रवींद्र धंगेकर यांच्या सोबत मी स्वतः बोलणार आहे. त्यांना भेटायला जाणार आहे.

## पाककला

– रुपाली गायकवाड
सुप्रसिद्ध कुक तथा सहाय्यक कृषी अधिकारी, बुलढाणा मो. ९४२२९४३६०५ (वेळ: सायं. ७ ते ९)



### सीताफळ मस्तानी

**साहित्य :** थंड दूध २ ग्लास, २ पिकलेले सिताफळ, ड्रायफ्रूट्स , टूटी फ्रूटी, फ्रूट जेली चॉकलेट, डार्क किंवा व्हाईट चॉकलेट



**कृती :** प्रथम सीताफळाचा गर चाळणीवर काढून घ्या चमच्याच्या साह्याने मॅश करत बिया आणि गर अलग करून घ्या आता एका मिक्सरच्या भांड्यामध्ये यातील अर्धा गर आणि एक ग्लास दूध घालून फिरून घ्या एका बाऊलमध्ये काढून त्यामध्ये ड्रायफ्रूट, टूटी फ्रूटी ,जेली चॉकलेट ,मिक्स करून फ्रिजरमध्ये दोन ते तीन तासासाठी सेट करून घ्या.आता परत त्याच मिक्सरच्या भांड्यामध्ये एक ग्लास दूध घाला आणि दोन चमचे गर घालून फिरून घ्या आता सर्व्ह करण्यासाठी एका ग्लासामध्ये अर्धा ग्लास भरून घ्या त्यामध्ये आवडीनुसार फ्रीजमध्ये सेट झालेल् आईस्क्रीम घाला, ड्रायफ्रूट्स चॉकलेट्स, टूटी फ्रूटी आणि वरतून चमचाभर सीताफळाचा गर घालून सीताफळ मस्तानी चा आनंद घ्या. अतिशय अप्रतिम अशी ही सीताफळ मस्तानी नक्की करून बघा.

वरील पाककृतीचे व्हिडिओ Rupalis Food Culture या यूट्यूब चॅनलवर पाहू शकता.

# मतांची खरेदी करण्यासाठीचा राजकीय जुगाड

आ.रोहित पवारांचा सरकारवर घणाघात

**मुंबई, वृत्तसंस्था :**

राज्यात महायुती सरकारकडून फक्त सत्ताधारी आमदारांनाच निधी वाटप केल्याच्या आरोपांवरून विरोधकांचा संताप उसळला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी सरकारवर ''लोकशाहीची थट्टा'' केल्याचा आरोप करत, हा प्रकार म्हणजे ''मतांची खरेदी करण्यासाठीचा राजकीय जुगाड'' असल्याचे म्हटले आहे.

रोहित पवार यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमधून सरकारवर थेट निशाणा साधला. ते म्हणाले, ''सरकारकडे मध्यमवर्गीय मराठी कंत्राटदारांचे तब्बल ८० हजार कोटी रुपये थकित आहेत. त्यांना देण्यासाठी पैसे नाहीत, पण सत्ताधारी पक्षाच्या ५४ आमदारांना प्रत्येकी ५ कोटी रुपये देण्यासाठी मात्र पैसा उपलब्ध आहे.''

विकासनिधीच्या नावाखाली शासकीय तिजोरीतील



पैसा वापरून स्थानिक निवडणुकांमध्ये मतांची खरेदी करणं हे लोकशाहीचा अपमान आहे. शेवटी जात, धर्म असा भेदभाव करून आणि खोक्यातून जन्म घेतलेल्यांकडून समान न्यायाची आणि लोकशाहीचा सन्मान करण्याची अपेक्षा करणं म्हणजे गुंडाकडून सद्वर्तनाचं प्रवचन ऐकण्यासारखं आहे, असा टोलाही रोहित पवार यांनी सरकारला लगावला.

# सेन्सेक्सची ८०० अंकांची पडझड

**मुंबई, वृत्तसंस्था :**

शेअर बाजारात गुरूवारी ८०० अंकाची पडझड झाल्याचे पाहायला मिळाले. गुंवणुकदारांनी उच्च पातळीवर नफा मिळवण्यासाठी विक्री केल्याने, तसेच संमिश्र जागतिक संकेत आणि कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्याने इक्विटी बेंचमार्क निर्देशकांमध्ये झालेली महत्त्वपूर्ण वाढ गमावल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान गुरूवारी सेन्सेक्स त्याच्या दिवसातील उच्चांकावरून ८०० अंकांनी घसरून ८४५५६.४० वर स्थिरावला, तर निफ्टी घसरून २५८८८.९० पर्यंत खाली आला.

प्रामुख्याने इटरनल, इंटरग्लोब एव्हिएशन, आयशर मोटर्स, भारती एअरटेल आणि अल्ट्राटेक सिमेंट या शेअर्समध्ये घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. दिवसभराच्या व्यवहारात त्यांच्या किमतीत ३ टक्क्यांपर्यंत घट झाली.

सत्राच्या सुरुवातीला नवा विक्रमी उच्चांक गाठल्यानंतर, गुंतवणुकदारांनी त्यांचे लक्ष नफा कमावण्याकडे वळवल्याचे पाहायला मिळाले, ज्यामुळे प्रमुख निर्देशांकांमध्ये घसरण झाली. दिवसाच्या सुरुवातीला आजवरचा सर्वाधिक उच्चांक ८५७७ गाठल्यानंतर बँक निफ्टी ४०० हून अधिक अंकांनी कोसळला आणि त्यानंतर तो ५८१६१ वर व्यवहार करत होता.




## राशीभविष्य

- **मेष :** सणाच्या खरेदीचा उत्साह राहील. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. विद्यार्थ्यांना स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **वृषभ :** कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. व्यवसायात बऱ्यापैकी उलाढाल राहील. आप्तस्वकीयांची भेट होईल.
- **मिथुन :** विवाहाच्या प्रयत्नात अनुकूलता राहील. सुवार्ता कानी येईल. गृहसजावटीवर अधिक भर राहील.
- **कर्क :** महत्त्वपूर्ण भेटीचे योग आहेत. चैनीवर अधिक खर्च होईल. धार्मिक स्थळांच्या यात्रेने आनंद लाभेल.
- **सिंह :** उत्साहवर्धक घटना घडतील. चांगला पैसा हाती आल्याने सणाचा उत्साह वाढेल. बाकी चिंता नसावी.
- **कन्या :** आर्थिकदृष्ट्या उत्कर्षाच्या संधी लाभतील. अनुभवींचा सल्ला कामी येईल. गुंतवणूक विचारानं करा.
- **तूळ :** भाग्योदयाचा कालावधी आहे. नव्या संकल्पनांना मूर्त रूप येईल. स्थावर प्रश्नातून योग्य मार्ग निघेल.
- **वृश्चिक :** प्रलंबित कामांना गती मिळेल. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. स्वमताग्रह टाळायला हवा.
- **धनु :** जुनी येणी वसूल होतील. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. क्रीडा, शिक्षण या क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मकर :** इतरांकडून अधिक अपेक्षा बाळगू नका. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. सणाचा आनंद राहील.
- **कुंभ :** कौटुंबिक अडचणी दूर होतील. भाग्योदयकारक घटना घडतील. नव्या योजना विचारानं स्वीकाराव्या.
- **मीन :** खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. प्रकृती सांभाळावी.

## दिनविशेष

### २४ ऑक्टोबर

**१९१० :** अभिनेत्री लीला पेंढारकर यांचा जन्म.
**१९३५ :** पत्रकार आणि लेखक मार्क टुली यांचा जन्म.
**१९७६ :** अभिनेत्री मल्लिका शेरावत यांचा जन्म.
**२०१३ :** आपल्या जादुई आवाजाने तब्बल पाच दशके हिंदी चित्रपट संगीतात ठसा उमटवणारे ज्येष्ठ गायक मन्ना डे ऊर्फ मन्नादा यांचे निधन.
**२०१६ :** सायरस मिस्त्री यांची टाटा समूहाच्या चेअरमन पदावरुन हकालपट्टी.

## महत्त्वपूर्ण काही...

### पाण्याची उकळी

उष्णतेशिवाय पाण्याला उकळी येणं शक्य नाही. पण पाण्याच्या किंवा खरं तर कोणत्याही द्रवपदार्थाच्या नैसर्गिक गुणधर्मांचाच वापर करत पाण्याला उष्णतेशिवाय उकळी आणणं शक्य आहे. पाणी हे निसर्गात घन, द्रव आणि वायू अशा तिन्ही अवस्थांमध्ये अस्तित्वात असतं. ते एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जातं तेव्हा रेणूंच्या बंधनांवर परिणाम होतो. द्रवरूपात असताना पाण्याचे रेणू एकमेकांना घट्ट धरुन असतात. त्यामुळेच काचेच्या भांड्यात पाणी ठेवलं तर भांड्याच्या तोंडाशी फुगवटा येतो; पण त्याच वेळी त्यावर हवेचा दाबही पडलेला असतो. तो पाण्याच्या रेणूंना खालच्या दिशेनं दाबतो. पाणी तापवतो तेव्हा त्याला मिळालेली उष्णता पाण्याच्या रेणूंना ऊर्जा देते. ती ऊर्जा मग त्यांना एकमेकांबरोबर असलेल्या बंधनांवर मात करून दूर जायला मदत करते. उष्णता मिळते तसे हे रेणू आपल्याच भाईबंदांच्या ओढीवर मारत करतातच, त्याचबरोबर हवेच्या दाबावरही मात करत हवेत जातात. म्हणजे हवेच्या दाबाला न जुमानता बरेच रेणू उडून जाऊ पाहतात, तेव्हा पाण्याला उकळी येते असं आपण म्हणतो

## आरोग्यमंत्र

### उशीरा जेवण टाळा

धकाधकीचं जीवन, कामाचा ताण, घरी जायच्या अडनिड्या वेळा यामुळे अनेकजण रात्रीचं जेवण उशीरा घेतात. रात्री उशीरा जेवल्याने आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. उशीरा जेवल्याचे शरीरावर वाईट परिणाम होतात. रात्री आठनंतर जेवल्याने शरीरात 'ॲड्रेनलाईन' नामक स्ट्रेस हार्मोन्सची निर्मिती होते आणि आपण तणावाखाली येतो. रात्री उशीरा जेवल्याचे इतरही अनेक दुष्परिणाम आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या...



✻ उशीरा जेवल्याने अन्नाचं रूपांतर ट्रायग्लिसराइड्समध्ये होतं. यामुळे शरीरात अतिरिक्त फॅट्स जमा होऊन वजन वाढायला सुरूवात होते.

✻ जेवायला उशीर झाल्याने पचनाच्या समस्या निर्माण होतात. यामुळे रात्रीच्या झोपेवरही परिणाम होतो.

✻ उशिरा जेवल्याने झोपही उशीरा लागते आणि ताण निर्माण करणाऱ्या हार्मोन्सची निर्मिती होऊ लागते.

✻ अन्नपचन योग्य पद्धतीने न झाल्याने अन्नातले आवश्यक ते पोषक घटक शरीराला मिळत नाहीत.

✻ शरीरात ॲड्रेनलाईन नामक हार्मोनची पातळी वाढल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

✻ उशीरा जेवल्याने वजन वाढतं. शरीरात वाईट कोलेस्टेरॉलची निर्मिती होते आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.

## स्टाईल स्टेटमेंट

### ट्राय करा खादी लूक

खादीच्या या लेटेस्ट फॅशनवर एक नजर टाकू या.

✻ खादीच्या पँट बाजारात उपलब्ध आहेत. जीन्सच्या तुलनेत मोकळ्याढाकळ्या आणि अत्यंत आरामदायी अशा या पँटना महिलांची पसंती मिळते आहे. वेगवेगळ्या आकाराच्या, रंगाच्या आणि डिझाइच्या खादी पँट तुम्हाला बघायला मिळतील. या पँट तुम्हाला कूल लूक देतील. ✻ खादीच्या साड्या कायमच ट्रेंडमध्ये असतात. हटके लूक मिळवण्यासाठी तुमच्या वॉर्डरॉबमध्येही खादीची साडी असली पाहिजे. खादीच्या साड्याही ट्रेंडी दिसतात. अशा साड्यांवर छान डिझायनर ब्लाउज कॅरी करून तुम्ही मस्त फॅन्सी लूक मिळवू शकता. डिझायनर ब्लाउजसोबत खादीची साडी भाव खाऊन जाते. कोणत्याही ऑकेजनला ही साडी शोभून दिसते. ✻ खादीच्या कुर्त्यांमध्येही बरीच व्हरायटी बघायला मिळते. खादीमध्येही डिझायनर कुर्ते उपलब्ध झाले आहेत. खादी कुर्त्यांचा टिपिकल लूक कधीच मागे पडला आहे. खादी कुर्ता तुम्हाला क्लासी लूक मिळवून देऊ शकतो. ✻ खादीचे टॉप्स आणि शॉर्ट कुर्तेही आहेत. हे कुर्ते जीन्स, कॉटन किंवा खादी पँटवर अगदी सहज कॅरी करता येतील. कॉलेज, ऑफिस किंवा कॅज्युअल ऑकेजनलाही हे कुर्ते चालून जातील.

## पंचांग

**शुक्रवार, २४ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक शु. ३, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, योग : सौभाग्य, सूर्योदय ६.३८, सूर्यास्त ६.०८

## फॉरवर्डस

**वहम सें भीं ख़त्म हों जातें हैं अक़्सर रिश्तें...**

**कसूर हर बार ग़लतियों क़ा नहीं होतां...!**

## वाचा तर खरं

माणसाचे पूर्वज म्हणजे माकडं. तुम्हाला माहितीये, आशिया आणि आफ्रिकेतील माकडांना प्राचीन जगातील माकडं म्हणतात तर दक्षिणी अमेरिकेकडील माकडांना नवीन जगातील माकडं असं म्हटलं जातं. प्राचीन जगातील माकडांना ३६ दात असतात. पण नवीन जगातील माकडांच्या तोंडात ३२ दात असतात. आत्तापर्यंत माकडांच्या २६४ प्रजातींचा शोध लागला असून सर्वाधिक प्रजाती ब्राझीलमध्ये आढळतात. माणूस आणि माकडांचा डीएनए ९८ टक्के समान असतो.

## करिअरवाटा

### इव्हेंट मॅनेजर व्हा

आजकाल कोणत्याही समारंभाचं यश नेटकं नियोजन, मनमोहक सजावट आणि उत्तम पदार्थ यावर अवलंबून असतं. या सगळ्या एकत्रित कामालाच इव्हेंट मॅनेजमेंट म्हणतात. सध्या वाढत्या कॉर्पोरेट ट्रेंडमध्ये इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत. विशेष म्हणजे यात



प्रशिक्षित मनुष्यबळाची चणचण जाणवते. त्यादृष्टीने धडपड्या आणि उत्तम व्यवस्थापन कौशल्य असलेल्या तरुणांनी या क्षेत्रात आवर्जुन शिरलं पाहिजे. आपण टीव्हीवर अनेक शोज बघतो. त्यांच्या स्टेजवरचा झगमगाट, प्रकाश योजना, मांडणी आणि ट्रिक्स हे सारं पाहिलं म्हणजे नवल वाटतं. पण यासाठी अनेक कलाकार अनेक दिवस झटतात आणि कंपनीही त्यावर लाखो रुपये खर्च करते. आताच्या काळात एकेका इव्हेंटवर करोडो रुपये खर्चले जात आहेत. याचा फायदा इव्हेन्ट मॅनेजमेंटच्या व्यवसायात शिरणाऱ्या तरुणांना होऊ शकतो. विवाहाच्या आयोजनाचंही मॅनेजमेंट केलं जातं आणि निरनिराळ्या स्वरूपात केलं जातं. या पार्श्वभूमीवर सध्या केवळ इव्हेन्ट मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणाऱ्या काही मोजक्याच संस्था आहेत. मात्र एमबीए चं शिक्षण देणाऱ्या काही संस्थां या विषयाचं शिक्षण देत आहेत. इच्छुकांना कोणत्याही व्यवस्थापन शास्त्र संस्थांकडे चौकशी करता येत नाही.

## खेचाखेची

### बोलू लागले

आधी आमच्या सोसायटीत
आमच्यासोबत कोणी बोलत
नव्हतं...
पण जेव्हा सगळ्यांना कळलं
की, आमच्याकडे उंच स्टूल,
फोल्डिंगची शिडी आणि जाळे
काढण्यासाठी दांडा असलेला
झाडू आहे,
.
.
तेव्हापासून सगळे आमच्याशी
थांबून बोलू लागले...

## वेगळं काही

फिलिपाईन्सची राजधानी मनिलाच्या जवळ असलेल्या बटानगस शहरामधल्या ड्रेनेज सिस्टिमच्या स्वच्छतेदरम्यान सफाई कामगारांच्या हाती काही डझन वॉलेट्स लागली. त्यात बरीच क्रेडिट्स कार्ड होती. पण या वॉलेट्समध्ये एकही पैसा नव्हता. क्रेडिट कार्डसही कालावधी संपलेली होती. ही सगळी वॉलेट्स ड्रेनेज लाईनच्या तळाशी होती याचा अर्थ असा की बऱ्याच कालावधीपासून ती तिथे पडून होती. यात मालकांची ओळखपत्रही होती. हे भुरट्या चोरांचं काम असल्याचा त्यांचा अंदाज आहे. पाकिटं मारून चोरांनी त्यातले पैसे काढून घेतले असावेत आणि पाकिटं गटारात टाकून दिली असावी असं त्यांचं म्हणणं आहे.

## ॲक्सेसरीज

### आरामदायी पादत्राणं निवडा

उन्हाळ्यात उन्हाच्या प्रखरतेमुळे केवळ हात, चेहरा, केस यांच्याशी संबंधित समस्या उद्भवतात असं नाही. या ऋतूतील चिकचिकाटामुळे पायाच्या त्वचेलाही अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे उन्हाळ्यात पादत्राणांची निवड करताना काळजी घ्यावी. या संदर्भातील काही महत्त्वाच्या टीप्स...



✻ फ्लिप फ्लॉप स्लिपर – उन्हाळ्यात फ्लिप फ्लॉप स्लिपर अत्यंत आरामदायी असतात. पायांना घाम येत असेल तर या उपयुक्त ठरतात. यात पाय कोरडे राहण्यास मदत होते.

✻ ॲथलेटिक सँडल – ॲथलिट सँडल्स उत्तम ठरतात. यामुळे पावलांमध्ये हवा खेळती राहून घामाचा त्रास होत नाही.

✻ एस्पाड्रिल्स – बाजारातील लोकप्रिय प्रकार म्हणजे एस्पाड्रिल्स. या पादत्राणांमध्ये आराम आणि स्टाईल या दोहोंचा संगम पहायला मिळतो.

✻ डेनिम स्लाईड्स – उन्हाळ्यात वॉर्डरोबमध्ये डेनिम असतं तसंच ते शू रॅकमध्येही असावं. कडक उन्हाळ्यात डेनिमची आरामदायी पादत्राणं पसंतीस उतरतात.

✻ स्लाईड्स – स्टायलिश आणि आराम या दोहोंचा संगम हवा तर स्लाईड्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. तरुणींमध्ये या स्टाईलची क्रेझ दिसून येते.

दैनिक महाभूमि
# बुलढाणा भूमि
शुक्रवार । २४ ऑक्टोबर २०२५
dainikmahabhoomi@gmail.com

## सोने-चांदी

| | |
|---|---|
| सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) | ११२४०० |
| सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) | ११३४०० |
| चांदी (प्रति किलो) | १३४७०० |

## बाजारभाव

**चिखली कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २१५० | २४०० |
| मुंग | ५२०० | ६००० |
| सोयाबीन | ३८५० | ४२०० |
| तुर | ५१५० | ६१०० |
| ज्वारी | १४५१ | १७०० |

**खामगाव कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २००० | २५५० |
| हरभरा | २४५० | ५५१० |
| सोयाबीन | ३५०० | ४३२५ |
| तुर | २१२५ | ६२५० |
| ज्वारी | १५५० | २१२५ |

## दखल...

### दिपोत्सव

शेकडो दिप प्रज्वलीत करूनी
केला दिपोत्सव साजरा
पण अंर्तदिप पेटला नाही तर
निरर्थक सारा फाफट पसारा

निस्वार्थ परोपकाराची
जागृत रहावी भावना
हीच ह्या प्रसंगी–
व्यक्त करू या कामना..

**प्रा. अशोक सारडा, मेहकर.**
**(९४२१३९४३३९)**

## धारे बंधुनी बहिणीला दिली संविधान प्रास्ताविकेची प्रतिमा भेट

# संविधानाची मूल्ये जोपासणारी 'भाऊबीज'!

**बुलढाणा/प्रतिनिधी**



जीवनात सकारात्मक ऊर्जा आणि नवचैतन्य देणारा सण म्हणजे दिवाळी. याच प्रकाश उत्सवाचा तिसरा दिवस भावा बहिणीच्या नात्यातील गोडवा जपणारा, अर्थात भाऊबीज. पारंपरिक पद्धतीने साजरा होणाऱ्या सणाला एक आगळे वेगळे महत्त्व प्राप्त झाले ते देऊळगाव राजा तालुक्यातील निमगाव गुरु ह्या गावात. येथील संतोष व अरुण धारे या दोन भावांनी भाऊबीजेच्या निमित्ताने आपल्या बहिणीला भारतीय संविधानाची प्रतिमा भेट देऊन समानतेचा संदेश दिला. बंधुता आणि समानता अंगिकृत करणे ही संविधानाचीच मूल्ये असून, खऱ्या अर्थाने संविधानाची मूल्ये जोपासणारी ही 'भाऊबीज' ठरली!

भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्यातील प्रेम आणि आपुलकी जपणारी भाऊबीज सर्वत्र उत्साहात साजरी झाली. ज्यामध्ये बहीण भावाला ओवाळते आणि भाऊ तिला भेटवस्तू देतो. मात्र, धारे बंधूंनी आगळ्यावेगळ्या पद्धतीने भाऊबीज साजरा करून संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात आदर्श निर्माण केला आहे. संतोष आणि अरुण धारे या दोन बंधूंनी आपली बहिणी सुनिता भालेकर यांना संविधानाची प्रतिमा भेट दिली. या उपक्रमाविषयी, धारे बंधू सांगतात, २०२५ हे वर्ष संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. दुसरीकडे समाजामध्ये स्वातंत्र्य,समता, बंधुता, लोप पावत चालल्याचे अनेकदा दिसून येते. यामुळे, सांविधानिक मुल्यांचा प्रचार व प्रसार करण्याचा निश्चय आम्ही केला. यामुळे, भाऊबीज निमीत्ताने बहीण सुनिता भालेकर यांना संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रतिमा भेट देऊन समाजास योग्य दिशा दाखवण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. यंदा संविधानाच्याअमृत महोत्सवी वर्षात अभिनव उपक्रम राबविण्यात आले. गणेशोत्सवाच्या सजावटीमध्ये सुध्दा संविधानाच्या प्रास्ताविकेच्या प्रतिमांचा उपयोग केल्याचे त्यांनी सांगितले.भाऊबीजेला बहिणीला यापूर्वी भेटवस्तू दिल्या आहेत. परंतु, यावर्षी संविधानाच्या प्रास्ताविकतेची प्रतिमा देताना आनंद होत आहे, अशी भावना धारे बंधुनी व्यक्त केली आहे.

### पाच वर्षात १०० पेक्षा अधिकांना दिली भेट

■ संतोष धारे शासकीय कर्मचारी आहेत. ते हिंगोली येथे जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असून मागील ५ वर्षांपासून संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रतिमा इतरांना भेट देतात. आतापर्यंत त्यांनी १०० पेक्षा जास्त संविधानाच्या प्रास्ताविकेच्या प्रतिमा इतरांना भेट दिल्या आहेत.

## गोमांस विक्रेत्याला अटक; २२ हजारांचा मुद्देमाल जप्त

### पांग्री उगले रोड परिसरात पोलिसांची कारवाई



**सिंदखेड राजा/प्रतिनिधी**

तालुक्यातील किनगावराजा पोलिसांच्या पथकाने २२ ऑक्टोबरच्या सकाळी पांग्रीउगले रोड परिसरात कारवाई करत एका गोमांस विक्रेत्याला रंगेहात पकडले. पोलिसांनी एकूण २२ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

किनगाव राजा पोलीस स्टेशन हद्दीत गोमांस विक्री होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. याआधारे पांग्री उगले रोडवर सापळा रचून केलेल्या कारवाईत गोमांस विक्रेत्याला पोलिसांनी रंगेहात पकडले. सैय्यद हमजा सैय्यद चाँद (४२वर्ष रा. काळाकोट, ता. सिंदखेडराजा) असे आरोपीचे नाव असून त्याने गोवंशाची कत्तल करून दुचाकीने मांस विक्रीसाठी आणले होते. याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच मोटार वाहन कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कॉन्स्टेबल शरद दत्तू म्हस्के यांनी प्रकरणाची फिर्याद दिली. पुढील तपास पो.हे.कॉ. अनिल नागरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. सदरची कारवाई ठाणेदार संजय मातोंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली किनगाव राजा पोलिस पथकाने केली.

## न्यूज ब्रीफ

### पांढरदेवच्या मतदार यादीत अनियमितता!

**चिखली :** तालुक्यातील पांढरदेव गावाच्या मतदार यादीत बोगस नावे समाविष्ट झाल्याचा आरोप विद्यार्थी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गोपाल म्हस्के यांनी केला आहे. म्हस्के यांनी सांगितले की, ऑक्टोबर २०२४ मध्ये आम्ही आक्षेप घेऊन अशाच प्रकारे एक बोगस नाव मतदार यादीतून काढून टाकले होते. पण दुर्दैवाने यावर्षी पुन्हा तसेच नाव समाविष्ट झाले आहे. यावरून निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार आणि मतदार यादीतील अनियमितता उघड होत आहे. निवडणुकीपूर्वी बोगस नावे वाढवून विशिष्ट पक्षाला फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न सुरु असल्याचा संशय आहे. यासंदर्भात ग्रामपातळीवर चौकशीची मागणी सुरू असून बोगस नाव तत्काळ वगळण्याची मागणी म्हस्के यांनी केली आहे.

### फलोत्पादनासाठी मिळणार अनुदान

**बुलढाणा :** फलोत्पादन पिकाचे क्षेत्र व उत्पादन वाढविण्यासाठी शासनामार्फत शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याकरिता कृषी समृद्धी योजने अंतर्गत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या माध्यमातून फलोत्पादन विकासाकरिता आवश्यक घटकांकरिता अनुदान देण्यात येत आहे. या अंतर्गत ड्रॅगन फ्रूटकरिता २.७० लाख हेक्टर, स्ट्रॉबेरी ०.८० लाख हेक्टर, फुलपीक लागवड अंतर्गत दांड्याची फुले ०.५ लाख हेक्टर, कंदवर्गीय फुले १.० लाख हेक्टर, सुटी फुले ०.२ लाख हे लाख हेक्टर लागवडीकरिता अनुदान आहे.

### हरभरा पेरणीसाठी मशागत सुरू

**चिखली :** सोयाबीनची काढणी झालेल्या शेतात शेतकऱ्यांनी हरभरा पेरणीची तयारी सुरू केली आहे. यासाठी काही शेतात शेतकरी मशागतीची कामे करत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. सोयाबीनचे नुकसान झाल्याने आता रब्बीचा पर्याय शेतकऱ्यांकडे आहे. अनेक शेतकऱ्यांकडे सिंचनाची व्यवस्था असल्याने हरभरा पिकासाठी शेती तयार करत असल्याचे सध्यातरी चित्र सर्वत्र दिसत आहे. सोयाबीनचे पीक निघाल्यानंतर गहू किंवा हरभरा या दोन्ही पिकांचा पर्याय शेतकऱ्यांकडे आहे.

## पिस्टल व जिवंत काडतुससह एकाला अटक

**बिबी/प्रतिनिधी**



संशयास्पदरित्या समृद्धी महामार्गावर थांबलेल्या एका कंटेनर चालकाजवळ पिस्टलसह चार जिवंत काडतूस आढळून आल्याने पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

बीबी पोलीस स्टेशनहद्दीत समृद्धी महामार्गावर खळेगाव नजीक नागपूर मुंबई लेनवर १९ ऑक्टोबरच्या दुपारी बीबी पोलीस स्टेशनचे अधिकारी, अंमलदार व वाहतूक शाखा बुलढाण्याचे अंमलदार गस्त घालत असताना वाहन क्रमांक (एमएच ४० सीडी ०७३५) संशयास्पद रित्या थांबलेले दिसले. सदर वाहनचालकाची विचारपूस केली असता त्याने प्रथम खोटे नाव सांगितले. नंतर आदिल उर्फ मोहम्मद मेराज मोहम्मद मुस्तकीम (रा. सोभिपुर, उत्तर प्रदेश) असे सांगितले. त्याची अंगझडती घेतल्यानंतर त्याच्याजवळ चार जिवंत काडतुसासह एक सिल्वर रंगाची देशी बनावट पिस्टल मिळून आली.

### १०.२४ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ मोबाईल (अंदाजे किंमत२० हजार), आयशर (अंदाजे किंमत १० लाख), रोख रक्कम ४२०० असा एकूण १० लाख २४ हजार दोनशे रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. विनापरवाना पिस्टल बाळगल्याप्रकरणी बिबी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## जिल्हास्तरीय धम्म महोत्सव उत्साहात

**मोताळा/प्रतिनिधी**



भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने मलकापूर रोडवरील बुलढाणा अर्बन बँकेजवळ १९ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय धम्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सात वर्षांनंतर झालेल्या या महोत्सवाला समाजबांधवांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

२०१८ मध्ये अखेरचा धम्म महोत्सव पार पडला होता. त्यानंतर कोरोना काळ आणि इतर कारणांमुळे कार्यक्रम खंडित झाला होता. यावर्षी प्रशांत वाघोदे यांच्या संकल्पनेतून व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने हा जिल्हास्तरीय सोहळा पुन्हा नव्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे धम्माच्या खऱ्या तत्त्वांची जनमानसात ओळख निर्माण करणे, युवकांना करुणा, प्रज्ञा आणि समतेचा मार्ग दाखविणे, तसेच समाजात ऐक्य व मैत्रीची भावना दृढ करणे हे होते. दुपारच्या सुमारास राजगृह बुद्ध विहार येथून सचित्र धम्म रॅली काढून कार्यक्रमास सुरुवात झाली.

सभास्थळी रॅली पोहोचताच धम्म महोत्सवाच्या प्रमुख पाहुण्यांचा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्यासह इतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. धम्म चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा गौरव करून कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे राज्याध्यक्ष यू, जी. बोराळे यांच्या हस्ते करण्यात आले. भन्ते वीणाचार्य व भन्ते संघपाल यांनी धम्मदेशना दिली, तर मेघानंद जाधव यांच्या बहारदार भीमगीतांनी कार्यक्रमाची सांगता झाली. या सोहळ्यास भीमराव तायडे, के. के. शेगोकार, साहेबराव तायडे, भीमराव जाधव, आतिश खराटे, विशाखा सावंग, छायाताई बांगर, डॉ. अनिल वानखेडे, धम्मपाल वाघ, नितीन सूर्यवंशी, प्रकाश दांडगे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

## स्मशानभूमीत राहणाऱ्या परिवारासोबत दिवाळी साजरी

### जीवनसाथी फाउंडेशनचा उपक्रम..

**अंढेरा/प्रतिनिधी**



जीवनसाथी फाउंडेशनच्यावतीने देऊळगाव मही येथील स्मशानभूमीत वास्तव्यास असलेल्या एका कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्यात आली. यानिमित्ताने फराळ आणि मिठाईचेही वाटप करण्यात आले. समाजाच्या दुर्लक्षित घटकांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचवण्याचा प्रयत्न असल्याचे जीवनसाथी फाउंडेशनच्या सदस्यांनी सांगितले.

अनेक वर्षांपासून स्मशानभूमीतच वस्ती करून एक कुटुंब राहत असून त्यांचे जीवन अत्यंत साधन संपन्नतेपासून दूर असून, अनेकदा सण-उत्सवांचाही त्यांना लाभ मिळत नाही. याच पार्श्वभूमीवर जीवनसाथी फाउंडेशनने सामाजिक संवेदना जपत त्यांच्या घरी प्रत्यक्ष जाऊन सन्मानाने दिवाळी फराळाचे वितरण केले. यामध्ये लाडू, चिवडा, करंजी, शंकरपाळे यांसारख्या पारंपरिक पदार्थांचा समावेश होता. हा उपक्रम केवळ मदतीपुरता मर्यादित न राहता, त्यांच्या आयुष्यात दिवाळीचा खरा उजेड देणारा ठरला. जीवनसाथी फाउंडेशनचे पदाधिकारी, स्वयंसेवक आणि गावातील काही नागरिक या उपक्रमात सहभागी झाले होते. "दिवाळीत कोणी आमच्याकडे येत नाही, पण यावर्षी आम्हाला वाटलं की आपणही समाजाचा एक भाग आहोत," अशी प्रतिक्रिया स्मशानभूमित वास्तव्यास असलेल्या कुटुंबातील महिलेने दिली. यावेळी जीवनसाथी फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. महेश दंदाले, जनार्दन टेकाळे, सुनील मतकर, शिवाजी शिंगणे, अमोल बोबडे, संजय माऊली शिंगणे,रवींद्र कुळकर्णी यांसह आदी उपस्थित होते.

## श्री बालाजी संस्थानात लक्ष्मी-सरस्वती पूजन

**देऊळगाव राजा/प्रतिनिधी**



श्री बालाजी संस्थान कार्यालयात मंगळवारी सायंकाळी ८ वाजता लक्ष्मीपूजन करण्यात आले. वंशपारंपरिक विश्वस्त राजे विजयसिंह जाधव, धर्माधिकारी टाकळकर, व्यवस्थापक बिडकर यांच्या हस्ते श्री बालाजी महाराजांच्या सर्व ऐतिहासिक दागिन्यांचे विधिवत पूजन होऊन आरती झाली. लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर संस्थानने श्री बालाजी मंदिराची फुलांनी आकर्षक सजावट के होती. यावेळी परिसरात फटाक्यांची आतीषबाजी करण्यात आली.

दीपावली पाडव्याच्या दिवशी मुहुर्ताप्रमाणे सकाळी ९ वाजता संस्थान कार्यालयात सरस्वती पूजन झाले. वंशपारंपरिक विश्वस्त राजे विजयसिंह जाधव, टाकळकर, व्यवस्थापक बीडकर यांच्या हस्ते संस्थानचे खातेबुक व पंचांगाचे विधीवत पूजन होऊन आरती झाली. त्यानंतर ब्रम्हवृंदांनी पंचांग वाचन केले. दोन्ही कार्यक्रमास युवराज रोहन राजेजाधव, सर्व क्षेत्रउपाध्ये, सर्व देवउपाध्ये, त्रैशाखीय ब्राह्मणवृंद तसेच संस्थानचे कर्मचारी व प्रसिद्धी प्रमुख सुरज गुप्ता उपस्थित होते. पाडव्याच्या मुहूर्तावर माळी समाजाने मंडपोत्सवाच्या लाकडी लाटा संस्थानच्या बळदात भक्तीभावाने वर्षभरासाठी ठेवून दिल्या. संस्थानतर्फे त्यांचा प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार करण्यात आला व पुजाऱ्यामार्फत त्यांना खोबरे प्रसाद वाटप करण्यात आला.

## हुमणी अळीमुळे पिकांचे नुकसान; शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा

**बुलढाणा/प्रतिनिधी**

जिल्ह्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात हुमनी अळीमुळे सोयाबीनसह इतर पिकांचे नुकसान झाले होते. तब्बल १३ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. पीक नुकसानीचा संयुक्त पंचनामा करून जिल्हा प्रशासनाने २४ सप्टेंबर २०२५ रोजी अहवाल शासनाकडे पाठविला होता. मात्र, एक महिना उलटूनही शेतकऱ्यांना मदतच मिळाली नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे, हुमनी अळीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची दिवाळी अंधारातच गेली आहे.

जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात सोयाबीनवर हुमनी अळीने आक्रमण केले होते. हुमनी अळीच्या प्रादुर्भावाने १२ हजार ९९२.७९ हेक्टरवरील सोयाबीन, मका, तूर आणि उडीद पिकाचे नुकसान झाले होते. जिल्हास्तरीय अंतिम संयुक्त स्वाक्षरी अहवालानुसार, एकूण ८०९ गावे आणि ३३,५१४ शेतकरी हुमणी अळीच्या बाधित क्षेत्रात आले असून एकूण १२,९९२.७९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. जिल्ह्यातील सातही तालुक्यांमध्येही हुमणी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला होता. अहवालानुसार, हुमणी अळीचा सर्वाधिक प्रादुर्भाव सोयाबीन पिकावर झाला असून जिल्ह्यातील १२,९३६.६८ हेक्टर क्षेत्र सोयाबीनखालील पिकावर अळीने हल्ला केला आहे. त्याचप्रमाणे मका पिकाचे ५३.८२ हेक्टर, तर उडीद आणि तूर पिकाचे मिळून २.२९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. नगदी पिक म्हणून शेतकरी सोयाबीनचे उत्पादन घेतात. मात्र, सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे खरीप हंगामाचे नियोजन बिघडले. त्यातच अतिवृष्टीची मदत मिळत असली तरी हुमनी अळीने झालेल्या नुकसानाची भरपाई अद्यापही मिळाली नाही. अहवाल सादर करून एक महिना उलटूनही मदतीसाठी शासनाकडून कुठलाही निर्णय झालेला नाही.



**फटाक्यांची आतषबाजी** | **बाजारपेठेत नवचैतन्य**

## लक्ष लक्ष दिव्यांनी शहर उजळले!

**बुलढाणा/प्रतिनिधी**

लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबिज या तीन दिवसांच्या दीपोत्सवात बुलढाणा शहर उजळून निघाले. नागरिकांच्या घरांवर आणि अंगणात लागलेल्या आकर्षक दिव्यांचे दृश्य मनमोहक ठरले. तर, अनेक दिवसांपासून मंदीच्या सावटाखाली असलेल्या बाजारपेठेलाही दिवाळीमुळे नवसंजीवनी मिळाली होती.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नागरिकांनी पारंपरिक वस्त्रे परिधान करून सायंकाळचा मुहूर्त साधत सोने, चांदीच्या दागिन्यांसह आदिमाता लक्ष्मीचे पूजन केले. याबरोबरच चोपड्या वह्या, खाते पुस्तिका आणि प्रतिष्ठानांची मनोभावे पूजा करण्यात आली. फटाक्यांच्या आतषबाजीने जिल्हाभरातील आकाश प्रकाशमान झाले, तर मोठ्या आवाजाचे फटाके, सुतळी बॉम्ब यांच्या धडाडधुमामुळे दिवाळीचा उत्साह शिगेला पोहोचला होता. यानंतर, पाडव्याच्या दिवशीही कमालीचा उत्साह दिसून आला व गुरुवारी भाऊ बहिणीच्या नात्यातील गोडवा जपणारी भाऊबिज साजरी झाली.



### झेंडू विक्रेत्यांची निराशा

■ दिवाळीच्या दिवशी झेंडूला प्रती किलो १५ ते २० रुपये किलो भाव मिळाल्याने झेंडू उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडली. लक्ष्मीपूजनाच्या सायंकाळनंतर तर झेंडूची फुले रस्त्यालगत फेकावी लागली.

### खरेदीसाठी गर्दी

■ दिवाळीदरम्यान नागरिकांनी कपडे, मिठाई आणि इतर उपयोगी साहित्याची मनसोक्त खरेदी केल्याने बुलढाणा शहरातील बाजारपेठेणे अच्छे दिन अनुभवले. दिवाळी उत्सवाच्या तीन दिवसांतच बाजारपेठेत कोट्यवधींची उलाढाल झाल्याचे व्यापारी वर्गाकडून सांगितल्या जात आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी वस्त्रदालन, सोन्याच्या दागिन्यांची दुकाने, इलेक्ट्रॉनिक्स, गृहोपयोगी साहित्य, फटाके विक्री केंद्र, सजावटीच्या वस्तू तसेच कृषीपूरक साधनांच्या विक्री केंद्रांवरही ग्राहकांची गर्दी झाली होती.

जीएसटी दरात कपात झाल्याने गतवर्षीच्या तुलनेत यंदा कापड, वाहन बाजारात तेजीने विक्री झाली. दुचाकी, चारचाकी आणि विशेषतः इलेक्ट्रिकल वाहन खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले होते.

# जेव्हा श्वास गुदमरतोय!

दिवाळीचा सण सर्वत्र आनंदात साजरा करण्यात येत आहे. फटाक्यांचा धडाका सुरूच आहे. पण त्यानंतर एक मोठी समस्या दिसून येते. हवा खूप प्रदूषित होते. सणानंतर भारतातील अनेक ठिकाणी हवा खूप खराब असते, असे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ सांगते. जागतिक आरोग्य संघटनेनुसार अशा खराब हवेच्या संपर्कामुळे हृदयविकार, स्ट्रोक, फुफ्फुसांचा कर्करोग, न्यूमोनिया, श्वसनाचे आजार आणि कॅटॅरॅक्टसारखे आजार होण्याची शक्यता वाढते. दिवाळीनंतर दोन दिवसांनीही बुधवारी राष्ट्रीय राजधानी धुराने वेढलेली राहिली, हवेची गुणवत्ता ''अत्यंत खराब'' श्रेणीत असल्याचे समोर आले. दिल्लीतील वायू प्रदूषणाच्या जबाबदारीवरून आम आदमी पक्ष (आप) आणि सत्ताधारी भाजपा यांच्यात शाब्दिक युद्ध सुरू झाले आहे. वाऱ्याचा वेग पुन्हा कमी झाल्यामुळे बुधवारी दिल्लीची हवेची गुणवत्ता थोडीशी खालावली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) जारी केलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी ४ वाजता शहराचा २४ तासांचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) ३५३ होता. या हंगामात आतापर्यंतचा हा सर्वोच्च नोंदवलेला एक्यूआय आहे. मंगळवारी एक्यूआय ३५१ आणि सोमवारी ३४५ होता. दिल्ली दिवसा धुक्यात लपेटली गेली होती, वाऱ्याचा वेग ताशी सात किलोमीटरपेक्षा जास्त नव्हता. भारतीय हवामान विभागाने येत्या काही दिवसांत प्रदूषण वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. वाऱ्याची दिशा पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकली आहे, परंतु वेग कमी आहे. रात्री वाऱ्याचा वेग जवळजवळ मंद राहतो आणि दिवसा फक्त ५-७ किलोमीटर प्रति तास असतो. २७ ऑक्टोबरच्या सुमारास कमकुवत पश्चिमी विक्षोभ अपेक्षित आहे, परंतु त्यामुळे मुसळधार पाऊस पडण्याची किंवा वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता नाही. केंद्राच्या एअर क्वालिटी अर्ली वॉर्निंग सिस्टीमच्या अंदाजानुसार दिल्लीचा एक्यूआय शनिवारपर्यंत ''अत्यंत खराब'' श्रेणीत राहील, त्यानंतर पुढील सहा दिवस ते ''खराब'' आणि ''अत्यंत खराब'' दरम्यान राहू शकते. सीपीसीबीच्या आकडेवारीनुसार, ३९ सक्रिय देखरेख केंद्रांपैकी तीन केंद्रांनी बुधवारी दुपारी ४ वाजता गंभीर प्रदूषण पातळी नोंदवली, तर ३३ केंद्रांनी अत्यंत खराब श्रेणीत राहिले. नेहरू नगर (एक्यूआय ४११), पंजाबी बाग (४०६) आणि वजीरपूर (४०६) हे सर्वात जास्त प्रभावित क्षेत्र होते. लोधी रोड (२३०), डीटीयू (२१६) आणि आयजीआय विमानतळ (२९४) या फक्त तीन स्थानकांवर ३०० पेक्षा कमी एक्यूआय नोंदवण्यात आला. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मते, शून्य ते ५० दरम्यानचा एक्यूआय चांगला, ५१ आणि १०० समाधानकारक, १०१ आणि २०० मध्यम, २०१ आणि ३०० खराब, ३०१ आणि ४०० खराब आणि ४०१ आणि ५०० गंभीर मानला जातो. या वर्षी दिवाळीपूर्वी आणि नंतरच्या सरासरी वायू गुणवत्ता निर्देशांकमधील फरक गेल्या वर्षीपेक्षा कमी असला तरी हा मानवी आरोग्यासाठी धोकादायकच आहे. आम आदमी पक्षाने (आप) दिल्लीतील सरकारने दिवाळीच्या रात्री प्रदूषण देखरेख केंद्रे बंद केल्याचा आणि परिस्थिती लपविण्यासाठी हवा गुणवत्ता निर्देशांक डेटामध्ये फेरफार केल्याचा आरोप केला आहे. प्रत्येक दिल्लीवासीयाने त्यांच्या फोनवर १,००० ते १,५०० दरम्यान हवा गुणवत्ता निर्देशांक पाहिला, परंतु सरकारने प्रदूषण परिस्थिती नाकारली. महाराष्ट्रातील प्रदुषणाची परिस्थिती काही यापेक्षा वेगळी नाही. रस्त्यांवर मुले, वृद्ध आणि सामान्य लोक विषारी हवा श्वास घेत आहेत. जेव्हा श्वास गुदमरतोय तेव्हा आपल्याला उपाययोजना सुचतात!

# भारत-ब्रिटन करारात भविष्याचा वेध

● आरिफ शेख

एके काळी भारत ब्रिटिशांचा गुलाम होता आणि येथिल संसाधने लुटून आपल्या देशात नेत असे. भारतीय कामगारांना गुलाम म्हणून नेऊन ब्रिटिश उद्योगांमध्ये काम करण्यास भाग पाडले जात असे. आज हाच ब्रिटन भारतातून गुंतवणूक मिळवून त्याद्वारे वेगवेगळ्या क्षेत्रात किती नोकऱ्या निर्माण होतील हे आपल्याच देशात जाहीर करत आहे. बदलत्या परिस्थितीमध्ये नजरेत भरणाऱ्या ताज्या भारत-ब्रिटन कराराचा हा मागोवा. भारतासाठी तो एक ऐतिहासिक क्षण होता. भारतातील लोक आपल्याशिवाय देश चालवू शकत नाहीत, असे मानणारे ब्रिटनचे लोक आता भारतीय गुंतवणूक मिळाल्यामुळे आपल्या देशात किती रोजगार निर्माण होतील, हे आपल्याच लोकांना सांगून आनंदित होत आहेत. ब्रिटनचे जम्बो डेलिगेशन म्हणून ओळखले जाणारे १२६ जणांचे एक मोठे शिष्टमंडळ भारतात आले होते. ते आतापर्यंतचे सर्वात मोठे शिष्टमंडळ होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या शिष्टमंडळातील सदस्यांची भेट घेतली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर या भेटीला वर्षातील सर्वात मोठे व्यापार अभियान म्हणत आहेत आणि भारतासोबत व्यापार वाढवण्याबाबत त्यांना मोठ्या आशा आहेत. त्यांचा विश्वास आहे, की जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असलेल्या भारतासोबत व्यापार वाढवून ब्रिटनदेखील आपल्या अर्थव्यवस्थेला आधार देऊ शकते. भारताला मृत अर्थव्यवस्था म्हणणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टीकेला दुसरे मोठे परस्परत्त्युत्तर असू शकत नाही. ट्रम्प यांनी भारताला मृत अर्थव्यवस्था म्हणवून आपला अपमान केला; परंतु आजच्या परिस्थितीमुळे त्यांचे दावे फोल ठरत आहेत. अनेकांना हे पचवणे कठीण वाटू शकते आणि ते स्वीकारण्यास नकारही देऊ शकतात; परंतु सत्य हे आहे, की ब्रिटनला भारत हे विकास इंजिन वाटण्याबद्दल मोठ्या आशा आहेत. एका बाजूला भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. एप्रिल-जून तिमाहीमध्ये ७.८ टक्के हा भारताचा जीडीपीवाढीचा दर कोणत्याही पाश्चात्य देशाच्या तुलनेत फार मोठा आहे. ब्रिटनची आर्थिक परिस्थिती इतकी बिकट आहे, की त्याचा जीडीपीवाढीचा दर ०.३ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. भारत-ब्रिटन संबंधांची कहाणी जितकी जुनी आहे, तितकीच गुंतागुंतीची आहे. वसाहतवादी भूतकाळाचे ओझे, स्वातंत्र्यलढ्याचा वारसा आणि साम्राज्यवादाच्या वेदनादायक अनुभवांनी हे संबंध दीर्घकाळ संवेदनशील ठेवले आहेत. तथापि, कालांतराने नवीन जागतिक समीकरणे उदयास येत असताना, भारत आणि ब्रिटनने संबंध पुन्हा परिभाषित करण्याचा प्रयत्न केला आहे. ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर भारतात आले तेव्हा त्यांची ही भेट औपचारिक होतीच, पण भविष्याचा आराखडा तयार करण्याची संधीही होती. 'व्हिजन २०३५'च्या पार्श्वभूमीवर भारतासाठी ही भेट अत्यंत महत्त्वाची होती. कारण ही अशी वेळ आहे, जेव्हा भारत जगातील आघडीच्या तीन शीर्ष अर्थव्यवस्थांमध्ये स्वतःला स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. ही भेट केवळ राजनैतिकच नाही, तर धोरणात्मक आणि आर्थिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची होती. भारत केवळ आशियामध्येच नव्हे, तर जागतिक स्तरावरही आघाडीची भूमिका बजावणारी शक्ती म्हणून उदयाला येण्याची आकांक्षा बाळगतो. हे साध्य करण्यासाठी, त्याला तांत्रिक कौशल्य, आर्थिक संसाधने आणि जागतिक अनुभव असलेल्या भागीदारांची आवश्यकता आहे. 'ब्रेक्झिट'नंतर ब्रिटन नवीन आव्हानांना तोंड देत असले, तरी जागतिक राजकारणात आणि वित्तीय व्यवस्थेत तो एक महत्त्वाचा खेळाडू आहे. भारतीय दृष्टिकोनातून ब्रिटनचे महत्त्व केवळ भूतकाळातील अनुभवांपुरते मर्यादित नाही, तर भविष्यातील शक्यतांपर्यंतही मर्यादित आहे. आपण 'व्हिजन २०३५' बद्दल बोलतो, तेव्हा ते केवळ आर्थिक प्रगतीचाच संदर्भ



देत नाही, तर समग्र विकासाचादेखील संदर्भ देते. तांत्रिक नवोपक्रम, शिक्षणाचा विस्तार, आरोग्यसेवा मजबूत करणे, हरित ऊर्जेकडे संक्रमण आणि जागतिक सुरक्षेत योगदान देणे या सर्व क्षेत्रांमध्ये भारत आणि ब्रिटनमध्ये सहकार्याची प्रचंड क्षमता आहे. व्यापार संबंध या भागीदारीचा प्रमुख आधारस्तंभ बनले आहेत. अलिकडेच झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक संबंध एका नवीन पातळीवर पोहोचले आहेत. 'व्हिजन २०३५' अंतर्गत हा करार दोन्ही अर्थव्यवस्थांचा पाया रचेल. यामुळे केवळ वस्तू आणि सेवांची देवाणघेवाण वाढणार नाही, तर स्टार्टअप्स, नवोन्मेष, फिनटेक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या क्षेत्रात सहकार्याचा विस्तार होईल. भारताचे डिजिटल क्रांतीचे स्वप्न आणि ब्रिटनची तांत्रिक कौशल्य एकत्रितपणे एक नवीन आर्थिक कथा लिहू शकते. या संबंधांची सर्वात मोठी ताकद म्हणजे ब्रिटनमधला भारतीय समाज. आज भारतीय वंशाचे वीस लाखांहून अधिक लोक ब्रिटनमध्ये राहतात. राजकारणापासून व्यवसायापर्यंत, शिक्षणापासून आरोग्यापर्यंत, भारतीय वंशाचे लोक ब्रिटनच्या जीवनरक्तात खोलवर रुजले आहेत. त्यांची उपस्थिती दोन्ही देशांमधील एक नैसर्गिक पूल म्हणून काम करते. २०३५ पर्यंत भारत त्याच्या तरुणाईने प्रेरित होऊन, जागतिक नेतृत्वाकडे वाढचाल करत असताना, ब्रिटनमधील भारतीय समुदाय ही प्रक्रिया आणखी मजबूत करेल. तथापि, हे सर्व वाटते तितके सोपे नाही. भारत आणि ब्रिटनमधील संबंधांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. 'ब्रेक्झिट'नंतर ब्रिटनची आर्थिक अनिश्चितता भारताचे अंतर्गत धोरणात्मक अडथळे आणि जागतिक सत्तेच्या संतुलनात बदल हे सर्व घटक त्यांच्या भागीदारीच्या गतीवर परिणाम करू शकतात. भारतात ब्रिटनची गुंतवणूक केवळ आर्थिक फायद्यासाठीच नाही, तर त्याच्या जागतिक प्रासंगिकतेसाठीही आवश्यक आहे. 'ब्रेक्झिट'नंतर युरोपीय महासंघापासून ब्रिटनचे वेगळे होणे त्याला नवीन भागीदार शोधण्यास भाग पाडत आहे. भारताची मोठी लोकसंख्या, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि जागतिक महत्त्वाकांक्षा, ब्रिटनसाठी एक नैसर्गिक निवड आहे. भारतासाठी ब्रिटन हा एक भागीदार आहे, ज्याद्वारे तो केवळ युरोपच नाही, तर संपूर्ण अटलांटिक जगात प्रवेश करू शकतो. ब्रिटिश पंतप्रधानांचा हा दौरा भूतकाळातील सावलीतून भविष्यातील शक्यतांकडे दृष्टिकोन बदलण्याचे प्रतीक आहे. 'व्हिजन २०३५' हे केवळ भारताचे स्वप्न नाही, तर उदयोन्मुख महासत्तेसोबत सहकार्याने नवीन जागतिक समीकरणे घडवण्याची ब्रिटनसाठी एक संधी आहे. ही भेट एका नवीन अध्यायाची सुरुवात असेल, तर २०३५ हे दोन्ही देशांसाठी केवळ एक कॅलेंडर वर्ष नसून सामायिक कामगिरी आणि सहकार्याचा सुवर्ण टप्पा असेल.

ब्रिटनसोबत भारताच्या संरक्षण आणि व्यावसायिक संबंधांमध्ये नवीन सुरुवात आशादायक आहे. दोन्ही देशांमधील मुक्त व्यापार कराराचा निष्कर्ष दोन्ही बाजूंसाठी फायदेशीर मानला जात आहे. पंतप्रधान केयर स्टारमर यांच्या पहिल्या अधिकृत भारत दौऱ्याचे भारत आणि ब्रिटनमधील संबंधांमध्ये नवीन बदलाचे प्रतीक म्हणून वर्णन केले गेले. मुंबईमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत झालेल्या त्यांच्या भेटीचे प्रतिकात्मक आणि व्यावहारिकदृष्ट्या खोलवर परिणाम आहेत. या भेटीदरम्यान झालेले प्रमुख करार त्याचे महत्त्व अधोरेखित करतात. यामध्ये ४६८ दशलक्ष डॉलर्सचा क्षेपणास्त्र करार, मुक्त व्यापार करार लवकर अंमलबजावणी करण्याची वचनबद्धता आणि भारतात नऊ ब्रिटिश विद्यापीठे स्थापन करण्याचा करार यांचा समावेश आहे. मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे, या संबंधांमध्ये एक 'नवी ऊर्जा' आहे, जी व्यापार, तंत्रज्ञान आणि प्रतिभा एकत्रित करण्याचा प्रयत्न करते. तथापि, मुक्त व्यापारकराराचे मूल्यमापन त्याच्या प्रतीकात्मक मूल्यापेक्षा वास्तविक आर्थिक परिणामाच्या आधारावर केले पाहिजे. मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीमुळे भारताची कापड, औषधनिर्माण आणि सेवा, विशेषतः आयटी आणि फिनटेक, ब्रिटिश बाजारपेठेत निर्यात वाढू शकते. तथापि, मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीबाबत काही चिंतादेखील आहेत. उदाहरणार्थ, स्वस्त ब्रिटिश आयातीमुळे किंवा नियामक अडथळ्यांना तोंड दिल्याने भारताला अडचणी येण्याची भीती वाटते. 'ब्रेक्झिट'नंतर अनिश्चित जागतिक अर्थव्यवस्थेच्या दरम्यान 'एफटीए' (मुक्त व्यापार करार) ब्रिटनला एक फायदेशीर वाढीची संधी आणि स्थिर अर्थव्यवस्थेसह एक मजबूत भागीदार प्रदान करते यात शंका नाही. तथापि, मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीमध्ये भारतीय हितांचे रक्षण करण्यासाठी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत)**

# मानवी सकारात्मकतेला आत्मीय बळ देणारं पुस्तक : जीवन सुंदर आहे !

● भगवान राईतकर
(ज्येष्ठ पत्रकार, कवी, लेखक, समीक्षक व व्याख्याते)
मेहकर जि. बुलढाणा
मो.९७३०३३२१५१

समाजामध्ये सकारात्मक लोकांपेक्षा नकारात्मक व्यक्तींचा प्रभाव जरा जास्त पाहायला मिळतो. ते सतत आपल्या अवतीभोवती असलेल्या सकारात्मक माणसाला नकारात्मक कसे बनवता येईल ? त्याच्या जीवनामध्ये उदासीनता कशी निर्माण करता येईल ? त्याच्या मनाला खिन्नता कशी प्राप्त होईल ? यासाठी जणू काही ते रात्रंदिवस कार्यतत्पर असतात ; असे वाटते. त्यामुळे समाजातील अनेक माणसाच्या जीवनातील जगण्याचा आनंद कमी होऊन त्याला मनाची उदासीनता प्राप्त होते. उदासीन झालेली माणसं मानसिक खच्चीकरणाचे बळी ठरतात... अनेकदा टोकाची ही पावले उचलतात ? उदासीनता ही काही विशिष्ट व्यक्तीची मालकी नाही. व्यक्ती कोणत्या विचारांच्या लोकांमध्ये राहतो त्यावरून त्याला अशा प्रकारची मानसिकता निर्माण होत असते. खिन्न झालेल्या मानवी मनाला सकारात्मकतेचे पाळबळ देणारा नूतन मुळणकर यांचं जीवन सुंदर आहे! हे पुस्तक आहे.

जीवन सुंदर आहे ! हे पुस्तकाचं टायटल वाचतांना एक समीक्षक म्हणून दोन विचार मनामध्ये आलेत. एक म्हणजे निराश झालेल्या माणसाला जीवनाचे महत्त्व सांगितले असे वाटते... आणि दुसरे म्हणजे उदासीन म्हणाला लेखिकेने सकारात्मकतेने जीवन सुंदर आहे; असे सांगितले असावे, असे वाटते. या पुस्तकामध्ये मनाने मनाशी संवाद साधला




असे वाटते तसेच आणि मनाने जनाशी संवाद साधला असे वाटते. आत्मिक संवाद आणि जनसंवाद अशा दोन्ही संवादाचा सुरेल संगम प्रस्तुत पुस्तकामध्ये झालेला आहे. प्रस्तुत पुस्तक हे लेखिकेने त्यांच्या वडिलाला अर्पण केले आहे. वडिलांसारखी सकारात्मकता मुलांच्या जीवनामध्ये निर्माण करणारा जगामध्ये एकही व्यक्ती नाही. सकारात्मकतेच्या वडील नावाच्या सूर्याची जाणीव ठेवत लेखिकेने पुस्तक वडिलाला अर्पण केलेले वाचल्यामुळे लेखिकेच्या लिखाणाला अनुभवाची आणि भावनिकतेची जोड असल्याचे दिसते. नूतन अशोक मुळणकर यांच्या जीवन सुंदर आहे ! या पुस्तकातील मनोगत आणि ऋणनिर्देश वाचतांना मार्गदर्शकाविषयी असलेला कृतज्ञ भाव प्रगट होतो. मार्गदर्शकाविषयी असलेली कृतज्ञता ही एक संवेदनशील मनाची ओळख आहे. संवेदनशील लेखिका आणि कवयित्री असलेल्या नूतन मुळणकर यांच्या जीवन सुंदर आहे ! या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेमध्ये १६ लेखांचा समावेश आहे. शेवटी सोळाव्या नंबरवर असलेला लेख पत्र स्वरूपातील आहे. मानवी मनातील ओलावा कायमस्वरूपी राहावा यासाठी पत्र हा प्रकार अस्तित्वात आला असावा, असे वाटते. आताच्या युगामध्ये व्हाट्सअप ला व्यक्त केलेल्या भावना मोबाईल हँग म्हणून होऊ नये म्हणून कधीही डिलीट होऊ शकतात. पण पत्रातील भावना त्याला मनात साठवल्या जाते आणि त्या कधीही डिलीट न होता सदैव आधार देणाऱ्या असतात. मानवाला प्रसन्न ठेवण्याचे प्रभावी साधन जर कोणते असेल तर ती म्हणजे कला. मनाची प्रसन्नता आणि मनाची संवेदना कायम टिकवण्यासाठी प्रत्येकाला एक तरी छंद हवाच ! असा आग्रह लेखिकेने अनुक्रमणिकेतील पहिल्या लेखामध्ये केलेला आहे. हा आग्रह करतांना लेखिकेने अनेक थोर विचारवंताच्या विचारांचा संदर्भ देत, मानवी जीवनातील छंदाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यासाठी लेखिकेने संपूर्ण पुस्तकामध्ये इंग्रजी, हिंदी मराठी भाषेच्या विचारवंताचे संदर्भ घेतले आहेत. छंदाचे महत्त्व सांगतांना त्यांनी प्रशांत त्रिभूवन यांच्या विचाराचा संदर्भ दिला आहे...आयुष्यातले काही दिवस अगदी स्वतःसाठी जगावं जीवनामध्ये चढ- उतार येत असतात. त्याचा फारसा विचार न करता जीवनाचा पुरेपूर आनंद घ्या! याविषयी माहिती देतांना, मुळणकर यांनी जोनाथन स्विफ्ट यांच्या तत्त्वज्ञानाचा संदर्भ दिला आहे.. मानवी मनातील प्रसन्नता ही परिस्थितीवर अवलंबून नसून, तो एक मानसिक दृष्टिकोन आहे. त्यामुळे मानसिक दृष्ट्या सकारात्मक होण्याची गरज प्रत्येकामध्ये आहे. याविषयी सांगतांना डेल कार्नेगी त्यांच्या विचाराचा संदर्भ दिला आहे. प्रसन्नता भारी परिस्थितीयों पर निर्भर नही करती है वह मानसिक दृष्टिकोन से संचलित होती है. सकारात्मक अंतर्मनाची किमया या लेखातून लेखिकेने विचारवंताचा संदर्भ देत नकारात्मक लोकांपासून दूर राहण्याचा सकारात्मक सल्ला दिला आहे. याविषयी पाठपुरवठा करतांना त्यांनी अल्बर्ट आईस्टीन त्यांचा विचार मांडला आहे.. नकारात्मक लोगो से दूर रहे, उनके पास हर समाधान के लिए एक समस्या है माणसाला आनंदी जगण्यामधले काही तत्व लेखिकेने लेखक क्रमांक पाच मध्ये सांगितले आहेत. त्यामध्ये स्वतःशी बोलणे, आत्मनिरीक्षण, सकारात्मक विचार, पैशाचे व्यवस्थापन, स्वतःच्या भूतकाळातून शिकणे, धोकादायक मुखोटे ओळखणे, स्वतःला प्राधान्य देणे व इतर लोकांचा विचार न करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. या सर्व गोष्टीचे आपण जीवनामध्ये अनुकरण केले तर, आपण इतरांपेक्षा वेगळे होऊ शकतो. त्यावेळी आपल्याला काही घाबरण्याचे कारण नाही. याविषयी संदर्भ देताना मायकल जैक्सन यांचा विचार त्यांनी सांगितलेला आहे... सबसे अलग होने से डरो मत!शेवटी पत्र यामध्ये लेखिकेने लिखाणामागचा आपला उद्देश स्पष्ट केला आहे. जीवन सुंदर आहे ; हे सांगताना लेखिकेने जीवन सुंदर करण्याचा मूलमंत्र वाचकांसमोर मांडलेला आहे. नूतन मुळणकर यांनी या लेखमालेला आमच्या दैनिकामधून सुरुवात केली होती, हेही नमूद करणे महत्त्वाचे वाटते. त्यांच्या संवेदनशील मनातून निर्माण झालेली ही साहित्यकृती आहे .अवतीभवती नकारात्मकता वाढलेली असतांना आपल्या घरामध्ये आपल्या कुटुंबामध्ये सकारात्मक राहण्यासाठी प्रत्येकाने आपल्या संग्रही ठेवावं; असं हे पुस्तक आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत)**

# 'मिसेस युनिव्हर्स'वर भारताचा मोलाचा ठसा

## खास बात

● अश्विनी पारकर

एका विवाहित भारतीय महिलेला मिसेस युनिव्हर्सचा किताब जिंकताना पाहण्यासाठी भारताने बराच काळ वाट पाहिली. अलिकडेच शेरी सिंग हा आंतरराष्ट्रीय किताब जिंकणारी पहिली भारतीय ठरली. तिच्या विजयाने लाखो भारतीयांना अभिमान आणि आनंद दिला. हा विजय केवळ सौंदर्याचा नव्हता; तर आत्मविश्वास, कसब आणि भारतीय समाजातील बदलांचा होता.

ऑक्टोबर २०२५ च्या एका सुंदर संध्याकाळी एका चिमुकल्याची आई आणि व्यावसायिक असलेल्या शेरी सिंग या भारतातीय सौंदर्यवतीला मिसेस युनिव्हर्स हा किताब देण्यात आला. हा क्षण टीव्हीवरुन अनुभवणाऱ्या भारतातीयांनी टाळ्या वाजवल्या आणि जल्लोष केला. अतिशय अभिमानास्पद अशा क्षणाची भारताने बरीच वर्ष वाट पाहिली होती. पण ही घटना फक्त एका मिसेस युनिव्हर्स या किताबापुरतीची मर्यादित नाही. हा मुकुट परिधान करण्यासाठी भारतीय विवाहित महिलेला इतकी वाट का पहावी लागली आणि हे यश यापुढेही साजरे व्हावे म्हणून कोणत्या बदलाची आवश्यकता आहे, याची कारणमिमांसा करणे आवश्यक आहे. वर्षानुवर्षे, जागतिक सौंदर्यस्पर्धांसाठी योग्य प्रशिक्षण, पाठिंबा आणि प्रोत्साहन मिळवण्यात भारतीय महिलांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. शेरीच्या यशावरून भारत किती पुढे आला आहे आणि योग्य संधी मिळाल्यास भारतीय महिलांमध्ये किती क्षमता आहे हे दिसून येते. आजचे सौंदर्य हे दिसण्यापेक्षा व्यक्तीची प्रतिभा, शिक्षण, दयाळूपणा आणि सामाजिक जाणीव यामध्ये जास्त सामावलेले आहे, हे तिची कामगिरी आपल्याला दाखवून देते. शेरी सिंगचा विजय भारताच्या प्रगतीचे आणि जगातील भारतीय महिलांच्या वाढत्या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. मूळ मुद्द्याला हात घालण्याआधी मिसेस युनिव्हर्स म्हणजे काय हे जाणून घेऊ. मिस वर्ल्ड, मिस युनिव्हर्स या अविवाहीत कुमारी तरुणींच्या सौंदर्यस्पर्धा आहेत, तर मिसेस युनिव्हर्स ही विवाहित महिलांसाठी सौंदर्य आणि प्रतिभेची परिक्षा घेणारी स्पर्धा आहे. २००० च्या दशकात सुरू झालेल्या या स्पर्धेचा मुकुट २०२५ मध्ये पहिल्यांदा भारतीय स्त्रीच्या माथ्यावर विराजमान झाला आहे.

शेरीच्या विजयामागील कारणे विषद करताना इतर देश यासाठी काय करत होते, हे लक्षात घेणे महत्वाचे ठरते. अशा स्पर्धांसाठी महिलांना प्रशिक्षण मिळावे यासाठी अनेक देशांनी आधीच मजबूत व्यवस्था तयार केली आहे. विवाहित महिलांसाठी ती व्यवस्था तयार करण्यासाठी भारताला जास्त कालावधी लागला. त्यामुळे भारतात अनेक प्रतिभावान, सुंदर आणि समाजसेवी विवाहित महिला असतानाही इतर देशातील विवाहित महिलांच्या तुलनेत जगातील या सर्वोच्च स्थानावर पोहोचण्यासाठी त्यांच्यापर्यंत योग्य प्रशिक्षण, पैसा किंवा पाठिंबा पोहोचत नव्हता. ऐश्वर्या रॉय आणि सुष्मिता सेनमुळे भारत 'मिस वर्ल्ड' आणि 'मिस युनिव्हर्स'चा किताब जिंकून जगप्रसिद्ध झाला. त्यानंतर विजेत्या सौंदर्यवतींची रांग लागली. त्या विजेत्या मोठ्या चित्रपटस्टार आणि रोल मॉडेल बनल्या. पण त्यांच्या यशामागे त्यांच्या पाठीशी होते ते चांगले प्रशिक्षक, फॅशन तज्ज्ञ, मेकअप आर्टिस्ट आणि त्यांच्या टुर्स आणि प्रशिक्षणासाठी लागणारा खर्च उचलणारे प्रायोजक. मिसेस युनिव्हर्स स्पर्धेसाठी, या प्रकारची मदत खूप नंतर आली. आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी विवाहित महिलांना प्रशिक्षण देणारे लोक कमी होते. त्यामुळे भारतीय विवाहित महिलांनी अथक प्रयत्न करुनही इतर देशांसोबतच्या कठीण स्पर्धेत हार पत्करावी लागत असे.

सौंदर्यस्पर्धांचे नियमदेखील बदलत राहतात. पूर्वी विवाहित महिला आणि माता 'मिस युनिव्हर्स' स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकत नव्हत्या. पण आता त्या सहभागी होऊ शकतात. या नियम बदलांप्रमाणे स्पर्धेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या देशांनाही त्यांच्या प्रशिक्षणामध्ये अद्यावतता आणणे आणि निवडप्रणालीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. भारतासारख्या देशांमध्ये हे बदल हळूहळू होतात. त्यामुळे जिंकण्यासाठीही बराच कालावधी लागला. त्याचप्रमाणे भारतीय समाजाची अशा स्पर्धांबद्दल असलेली नीरस मानसिकताही एकूण दुर्लक्षिलेपणाला बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. या अशा सौंदर्य स्पर्धांमध्ये लोकांना फारसा रस नव्हता. अनेकांना या स्पर्धा अगदी आजही महत्त्वाच्या नाहीत, असे वाटते. सौंदर्यास्पर्धा म्हणजे केवळ बाह्यसौंदर्याचा देखावा असाही समज आहे. त्यामुळे अनेक प्रायोजक आणि आयोजक अशा स्पर्धांवर खर्च करणे टाळतात. अशा प्रकारे न मिळणारा आर्थिक पाठिंबा आणि एकूणच या क्षेत्राकडे पाहण्याचा कलुषित दृष्टीकोन यामुळे जागतिक स्तरावर या स्पर्धेमध्ये ठसा उमटवणे कठीण ठरत होते. तसेच या स्पर्धेसाठी केल्या जाणाऱ्या मतदानावर बऱ्याच गोष्टींचा प्रभाव असतो. आपल्या देशाचे आंतराष्ट्रीय संबंध कसे आहेत, ज्या देशात स्पर्धा आयोजित केली जाते तेथील स्पर्धकांची निवड



करणाऱ्यांची मानसिकता कशी आहे हे समजून घेणेही महत्वाचे होते. पूर्वी भारताचे 'मिसेस युनिव्हर्स' स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मजबूत आंतरराष्ट्रीय संबंध नव्हते. त्यामुळेही हा किताब आपल्या देशापासून लांब राहिला. मात्र आता भारताची या क्षेत्रात होणारी आगेकूच या यशाचे एक कारण ठरते.

सध्या सोशल मीडियामुळे एक क्रांती झाली आहे. त्यामुळे मेकअप कसा करावा, रॅम्प वॉक करण्यापासून आपले हावभाव, आपल्या शरीराची ढब कशी असावी इथपासून आपले व्यक्तिमत्व कसे सुधारावे आणि सौंदर्यस्पर्धांसाठी लागणारी सगळी कौशल्ये कशी आत्मसाद करावीत, हे शिकता येते. अर्थात सोशल मीडियाने शेरीच्या विजयानंतर अनेक अफवाही पसरवल्या आहेत. शेरी सिंग जिंकल्यानंतर काही लोकांनी चुकीची माहिती ऑनलाइन पोस्ट करण्यास सुरुवात केली. या चुकीच्या माहितीमुळे प्रायोजक यापुढील स्पर्धांना पाठिंबा देण्यासाठी कचरतील. हे या स्पर्धांच्या पथ्यावर पडणारे नाही. तरीही हा विजय सकारात्मक आहे, कारण याआधीच्या अपयशातून भारत खूप काही शिकला आहे आणि २०२५ च्या यशाने भारताचा आत्मविश्वास वाढला आहे. १९९४, २०००, २०२१ आणि आता २०२५ मध्ये भारताने जागतिक स्तरावरचे अविवाहित सौंदर्यवतींचे मुकुट जिंकले, तेव्हा त्यामागे मोठा संघर्ष होता. प्रशिक्षक, फॅशन डिझायनर्स, मेकअप आर्टिस्ट, प्रायोजक, स्पर्धकांना पाठिंबा देणारी कुटुंबे यांची कुमक होती. तरीही आपण अशा स्पर्धा जिंकूच अशी अपेक्षा दर वेळी करणे चुकीचे आहे. आता स्पर्धेच्या मानांकनामध्ये केवळ सौंदर्य हा निकष नसून स्पर्धकांची प्रामाणिकता, मुलाखत कौशल्य, प्रतिभा, सामाजिक जाणीव, विशेष म्हणजे त्यांनी केलेली समाजसेवा याला महत्व दिले जाते. स्पर्धेचे निवडकर्ते आता समाजाला मदत करू इच्छिणाऱ्या वास्तविक जीवनातील नायिकांचा शोध घेतात. भारतातील स्पर्धा आयोजकांनीही उत्तम आत्मविश्वास असणाऱ्या सुशिक्षित महिलांची निवड करण्यास सुरुवात केली आहे.

शेरी सिंगचा विजय खास आहे. आपण समाज म्हणून प्रगल्भ होत राहीलो तर अशा यशाला गवसणी घालू शकतो, हीच शिकवण या विजयातून मिळते. शेरी सिंगने स्पर्धेदरम्यान मानसिक आरोग्य, स्त्रियांचे प्रश्न यावरही प्रकाश टाकला. भारतातील मानसिक आरोग्याबद्दलची अनास्था लक्षात घेता एका भारतीय, त्यातही विवाहित महिलेने याबद्दल व्यक्त होण्यातच ती एक माणूस म्हणून किती सजग आहे हे अधोरेखित होते. एका विवाहित महिलेच्या यशामुळे आता अनेक विवाहित महिलांसाठी संधीचे नवीन दरवाजे उघडले आहेत.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** (अदिती एन्टरप्रायजेस बुलढाणा) यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक-**सुरेश बाबुराव देवकर**, *कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. **MAHMAR/२०२३/८९१४८**
ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** (Aditi Enterprises Buldhana) Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148

छत्रपती
# संभाजीनगर भूमि
शुक्रवार,२४ ऑक्टोबर २०२५ mahabhoomimarathwada@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### चोरट्यांनी सात बकऱ्या लांबवल्या

**गंगापूर :** तालुक्यातील डोमेगाव येथे शेतवस्तीवर राहणाऱ्या संतोष गोरखनाथ घुले यांच्या मालकीच्या तब्बल ४० हजार रुपये किंमतीच्या सात बकऱ्या चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना गुरुवार, २३ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरातील पशुपालक शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. संतोष घुले यांनी दिलेल्या तक्रारीवरुन बकऱ्या चोरुन नेणाऱ्या चोरट्याविरुध्द शिल्लेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पोलिस आयुक्तांच्या हस्ते दिवाळी फराळाचे वाटप

**छत्रपती संभाजीनगर :** पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते आयुक्तालयातील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी पोलिस उपायुक्त प्रशांत स्वामी, रत्नाकर नवले, विशेष शाखेचे निरीक्षक अविनाश आघाव, गुन्हेशाखेचे निरीक्षक गजानन कल्याणकर आदींसह पोलिस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### पूरग्रस्तांच्या कुटुंबियांना आधार

**छत्रपती संभाजीनगर :** पूरग्रस्त, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांची दिवाळी गोड करण्यासाठी आधार माणुसकीचा सोशल फाउंडेशनने सकारात्मक पुढाकार घेतला. या कुटुंबियांना किराणा किट, पणत्या, मिठाई, फराळ वाटप करण्यात आले. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन अर्जुन पाटील गाढे, देऊळगाव बाजाराचे सरपंच श्रीराम कुंटे, उपसरपंच रिहानाबी देशमुख, जिल्हा परिषद अधिकारी मारुती वराडे, दादासाहेब भंडे, विष्णू बोर्डे, सुमित पाटणी, अमोल माने, प्रणव भंडे आदींची यावेळी उपस्थिती होती.

### बाभुळगाव बुद्रुक येथून विद्यूत पंपची चोरी

**वैजापूर :** तालुक्यातील बाभुळगाव बुद्रुक येथून चोरट्यांनी विद्यूत पंप चोरून नेला.ही घटना ८ ऑक्टोबर रोजी रात्री घडली. गणेश कचरु सोनवणे यांची गट नंबर ६५ मध्ये शेती आहे.या शेतातील विहीरी वरील विद्यूत पंप व इतर साहित्य चोरट्यांनी चोरुन नेले.या साहीत्याची किंमत ५ हजार रुपये इतकी आहे.या प्रकरणी शिवूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास हवालदार गणेश गोरक्ष हे करीत आहेत.

### रामकृष्ण उपसा योजना चालू करा

**वैजापूर :** रामकृष्ण गोदावरी जलसिंचन योजना शासनाने ताब्यात घेऊन ती चालू करावी, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रामकृष्ण गोदावरी जलसिंचन योजना बंद आहे. ही योजना चालू झाल्यास वैजापूर तालुक्यातील १४ गावांचा पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे.

### ६ नोव्हेंबरला प्रारुप मतदार यादी प्रसिध्द होणार...

# मनपा निवडणूक : मतदार याद्यांसाठी प्रभागनिहाय पथके नियुक्त

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जानेवारी २०२६ अखेरपर्यंत महापालिका निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यादृष्टीने महापालिका प्रशासनही निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असून, प्रारूप मतदार याद्या ६ नोव्हेंबरला प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. त्यापूर्वी प्रारूप मतदार याद्या तयार करण्यासाठी मनपा प्रशासनाने प्रभागनिहाय पथकेही नियुक्त केली असल्याची माहिती मनपा उपायुक्त संतोष वाहुळे यांनी दिली.



आगमी मनपा निवडणुकीसाठी शहरात २९ प्रभाग तयार केले आहेत. एका प्रभागातून ४ सदस्य निवडून येतील. प्रभाग क्र. २९ मधून ३ सदस्य विजयी होतील. ११५ नगरसेवकांसाठी ही प्रभाग रचना आहे. महापालिका निवडणुकीत महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणजे मतदार याद्या आहेत. पूर्वी वॉर्ड पध्दत होती. काही वॉर्डामध्ये माजी नगरसेवकांनी बाहेरगावच्या मतदारांची नावे टाकून घेतली होती. प्रत्येक निवडणुकीत बाहेरील मतदान आणून ते सहज निवडून येत असत. आता प्रभाग पध्दतीमुळे या उमेदवारांची



चांगलीच दमछाक होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने १४ ऑक्टोबरला प्रारूप मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

त्यानुसार प्रत्येक प्रभागासाठी एक पथक तयार करून त्यांच्यावर प्रारूप मतदार याद्या तयार करण्याची जबाबदारी सोपविली आहे.

६ नोव्हेंबरला प्रारूप मतदार यादी प्रसिध्द केली जाणार आहे. १४ नोव्हेंबरपर्यंत याद्यांवर हरकती व सूचना मागविण्यात येतील. त्यानंतर पंचनामे करून मतदार यादी दुरुस्त केली जाईल. अंतिम मतदार यादी २८ नोव्हेंबरला प्रसिध्द केली जाईल. पथकातील अधिकारी-कर्मचारी त्या-त्या भागात जाऊन खरोखर हेच मतदार संबंधित प्रभागात राहतात का ? याची पडताळणी करतील असे उपायुक्त वाहुळे यांनी सांगितले.

## रस्त्यावर पेट्रोल टाकून फटाके फोडणाऱ्या टोळक्यावर गुन्हा दाखल

### नंदनवन कॉलनी परिसरातील घटना

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

कारमधील पेट्रोल रस्त्यावर टाकून त्यावर फटाके फोडून लोकांच्या जिवीतास धोका निर्माण करणाऱ्या पाच जणांच्या टोळक्यावर छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास नंदनवन कॉलनी परिसरातील राजमाता जिजाऊ उद्यानाजवळ हे टोळके धोकादायकरित्या फटाके फोडतांना मिळून आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्नील तेजराव गंगावणे (२५ वर्ष), रा. एकतानगर, हर्सूल, अजय विजय गवळी (२५ वर्ष), रोहित गौतम साळवे (२४ वर्ष), सागर सुनिल प्रधान (२५ वर्ष), सर्व रा. जयभिमनगर, टाऊनहॉल, प्रणीत भाऊसाहेब साळवे (२५ वर्ष), रा. नंदनवन कॉलनी अशी धोकादायकरित्या फटाके




फोडणाऱ्या टोळक्याची नावे आहे. २१ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास नंदनवन कॉलनी परिसरातील राजमाता जिजाऊ उद्यानाजवळ रस्त्यावर कार क्रमांक (एमएच-२०-बीएन-८९४७) उभी करुन त्यातील पेट्रोल रस्त्यावर टाकून त्यावर फटाके फोडत होते. हा प्रकार गस्तीवरील पोलिस उपनिरीक्षक शफिक अब्दुल हमीद शेख यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी रस्त्यावर पेट्रोल टाकून त्यावर फटाके फोडणाऱ्या टोळक्याविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार शेख करीत आहेत.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका स्वबळावर लढणार : इम्तियाज जलील

### मनपा निवडणुकीत नवीन चेहऱ्यांना संधी देणार

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये एमआयएम पक्ष कोणासोबतही युती किंवा आघाडी न करता स्वबळावर लढणार असल्याची माहिती एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच मनपा निवडणुकीत नवीन चेहऱ्यांना संधी देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

एमआयएम पक्षाच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांची राज्यस्तरीय बैठक मंगळवारी तापडिया नाट्य मंदिर येथे घेण्यात आली. बैठकीनंतर इम्तियाज जलील यांनी पत्रकारांशी संवाद साधला.



एमआयएम पक्षाचे कार्यकर्ते गेल्या दहा वर्षापासून ग्रामीण भागात काम करीत आहेत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पराभव झाला असला तरीही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी खचून न जाता आगामी निवडणुकीसाठी सज्ज राहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. गेल्या

> **मुलाला राजकारणात येऊ देणार नाही**
>
> ■ राजकारणात पहिल्यासारखे राहिलेले नाही. राजकारणाची पातळी घसरली असून घाणेरड्या पध्दतीने होत असल्यामुळे मुलगा बिलाल जलील याला राजकारणात येऊ देणार नाही असे एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी यावेळी स्पष्ट केले.

काही वर्षात राज्यातील पक्षांची संख्या वाढली असून कोणत्याही पक्षाकडे स्वबळावर लढण्याची ताकद नसल्याने ते महायुती किंवा महाविकास आघाडी करुन निवडणूका लढवित आहेत. परंतु एमआयएम हा एकमेव पक्ष कार्यकर्त्यांच्या ताकदीवर स्वबळावर निवडणुका लढवत असल्याचे त्यांनी सांगितले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी दिली जाणार आहे. निकालानंतर त्यांचा परफॉर्मन्स बघीतला जाणार असून वाईट परफॉर्मन्स असणाऱ्यांना घरचा रस्ता दाखवला जाणार आहे. मनपा निवडणुकीत नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाणार असून गेल्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर वॉर्डात ज्यांनी - ज्यांनी विकास कामे केली त्यांचा आगामी निवडणुकीसाठी विचार केला जाईल असेही इम्तियाज जलील यांनी यावेळी स्पष्ट केले.

# दुकानाचे शटर उचकटून १० लाखांचे 'कॉपर वायर' लंपास

### पैठण तालुक्यातील पाचोड येथील घटना

**पैठण / प्रतिनिधी**

तालुक्यातील पाचोड येथील मुख्य रस्त्यावर असलेल्या गुरुकृपा मशिनरी या दुकानाचे शटर उचकटून चोरट्यांनी तब्बल १० लाख रुपये किंमतीचे ९ क्विंटल कॉपर वायर चोरुन नेले. चोरीची ही घटना बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी पहाटे चार ते पाच वाजेच्या दरम्यान घडली. या घटनेची माहिती मिळाल्यावर आमदार विलास भुमरे यांनी घटनास्थळी भेट देवून माहिती घेतली.

पाचोड येथील मुख्य रस्त्यावर गुरुकृपा मशिनरी नावाचे शेतीउपयोगी साहित्य विक्रीचे दुकान आहे. बुधवारी पहाटे चार ते पाच वाजेच्या दरम्यान चोरट्यांनी दुकानाचे शटर उचकटून दुकानात प्रवेश केला. चोरट्यांनी दुकानातून विविध



नामांकीत कंपन्याचे तब्बल १० लाख रुपये किंमतीचे ९ क्विंटल कॉपर वायर चोरुन नेले.

चोरीचा हा प्रकार सकाळी उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती मिळाल्यावर पाचोड पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक सचिन पंडित यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेवून पाहणी केली. याप्रकरणी चोरट्याविरुध्द पाचोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रोटेगावचे उपसरपंच धिरजसिंह राजपूत यांचा शिवसेनेत प्रवेश

**वैजापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील रोटेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच धिरजसिंह राजपूत यांनी आपल्या समर्थक कार्यकर्त्यांसह शिवसेना (एकनाथ शिंदे) गटात नुकताच प्रवेश केला. आमदार रमेश बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर व माजी जिल्हा परिषद सदस्य दिपक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रवेश केला.

आमदार बोरनारे यांनी उपसरपंच धिरसिंह राजपूत यांच्यासह शिवसेनेत प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी सोसायटीचे माजी चेअरमन मंजाहारी शिंदे, वसंत शिंदे, मगन शिंदे, श्रावण शिंदे, भागिनाथ शिंदे, सोमीनाथ शिंदे, बाळु शिंदे, छबुराव थोरात, शेषराव शिंदे, कचरू थोरात, सुरेश गोरे, राजु थोरात, गोकुळ शिंदे, बाबासाहेब अभंग, धोंडीराम शिंदे, राजु शिंदे, दिप्तेश शिंदे, अजय राजपूत, अतुल राजपूत, सत्यजीत राजपुत, संतोष शिंदे, पप्पू खोकले, मिलिंद दांडगे, सम्राट राजपुत,



चंद्रकांत शिंदे, गौरव राजपूत, विक्रम राजपूत, जीवन राजपूत, राणा राजपूत, मयुर राजपूत, दिलीप शिंदे, राहुल आहेर, युवराज शिंदे, संतराम शिंदे, सुधाकर वाघ, अमर राजपूत, संतोष बंगाळ, गणेश मतसागर, विलास बंगाळ आदींची उपस्थिती होती.

# अवैध दारु विकणाऱ्या पाच जणांवर कारवाई

**वैजापूर / प्रतिनिधी**

अवैधरित्या देशी दारुचा साठा करुन विक्री करणाऱ्या पाच जणांविरुद्ध वैजापूर पोलिसांनी सोमवार, २० ऑक्टोबर रोजी धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान पोलिसांनी अवैध दारु विक्री करणाऱ्या पाच जणांच्या ताब्यातून ४ हजार ९०० रुपये किंमतीच्या ५५ देशी दारुच्या बाटल्या जप्त केल्या आहेत. अवैध दारु विक्री करणाऱ्याविरुध्द वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वैजापूर शहरातील वडार वाडा येथून सुमनबाई साहेबराव फुलारे या महिलेच्या ताब्यातून १ हजार ९०० रुपये किंमतीच्या १९ देशी दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. शहरातील कादरीनगर येथून कैलास भगतसिंग राजपूत यांच्या ताब्यातून ६०० रुपये किंमतीच्या १२ देशी दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.बोरसर येथील लाला रंगनाथ आल्हाट याच्या ताब्यातून ८०० रुपये किंमतीच्या ८ देशी दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.रोटेगाव येथील मिलींद रावसाहेब हिवराळे यांच्या ताब्यातून ५०० रुपये किंमतीच्या ५ देशी दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.तर पालखेड येथील राजेश रावसाहेब कुमावत यांच्या ताब्यातून ११०० रुपये किंमतीच्या ११ देशी दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.

अवैध दारु विक्री करणाऱ्याविरुध्द वैजापूर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक युवराज पाडळे, पोलिस अंमलदार रामकृष्ण कवडे, कुलदीप नरवडे, ऋषिकेश पैठणकर, अनिल दाभाडे आदींच्या पथकाने ही कारवाई केली. अवैधरित्या देशी दारुचा साठा करुन विक्री करणाऱ्याविरुध्द वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आजी, माजी सैनिकांसाठी नोव्हेंबरमध्ये तालुकानिहाय बैठकांचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आजी, माजी सैनिक व त्यांच्या अवलंबिताच्या अडी-अडचणी सोडविण्याकरीता दर सहा महिन्यांनी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली गटविकास अधिकारी,पोलीस अधिकारी, माजी सैनिक, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्या गठीत समितीची होणारी बैठक तालुका पातळीवर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित गावाच्या तहसिल कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

वैजापूर तहसिल कार्यालयात ३ नोव्हेंबर रोजी, कन्नड तहसिल कार्यालयात १० नोव्हेंबर रोजी, खुलताबाद तहसिल कार्यालयात १२ नोव्हेंबर रोजी, फुलंब्री तहसिल कार्यालयात १८ नोव्हेंबर रोजी, छत्रपती संभाजीनगर तहसिल कार्यालयात २० नोव्हेंबर रोजी आजी, माजी सैनिकांची बैठक होणार आहे. या बैठकीस आजी, माजी सैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा सैथ्नक कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे.

### तरुणांनी एकत्र येत केले गावातील रस्ते, सार्वजनिक परिसर स्वच्छ

# शिंदोळ येथे 'राष्ट्रसंत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियान' उत्साहात

**वरठाण / प्रतिनिधी**

सोयगाव तालुक्यातील शिंदोळ येथे मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाअंतर्गत 'राष्ट्रसंत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियान' उत्साहात राबविण्यता आले. यावेळी गावातील ४५ ते ५० तरुणांनी एकत्र येत गावात स्वच्छता अभियान राबवून ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, महाविद्यालयासह गावातील सार्वजनिक परिसर, रस्ते स्वच्छ केले.

शासनाने नुकतेच जाहीर केलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत



एक दिवस गावासाठी या संकल्पनेतून सोमवार, २० ऑक्टोबर रोजी 'राष्ट्रसंत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियान' राबविण्यात आले. यावेळी गावातील तरुणांनी एकत्र येत ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, महाविद्यालयासह गावातील सार्वजनिक परिसर, रस्ते आणि चौकातील कचरा गोळा केला. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने कचरा संकलीत करण्यासाठी कचरा पेटीची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी गावात एक घटांगडी देखील उपलब्ध करुन देण्यात आली होती.

दरम्यान, यावेळी 'राष्ट्रसंत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियान' राबविणाऱ्या युवकांनी गावातील व्यावसायीकांना, नागरिकांना, दुकानदारांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करत प्लास्टिक बंदी करण्याचे आवाहन केले असल्याची माहिती अभियानाचे समन्वयक सामाजिक कार्यकर्ते जगदीश सोनवणे यांनी दिली.

> **स्वच्छ अंगण ठेवणाऱ्या महिलांना बक्षीस देणार**
>
> ■ राष्ट्रसंत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत शिंदोळ गावात दररोज घराचे अंगण आणि परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या महिलांचा दर आठवड्याला सत्कार करण्यात येऊन त्यांना बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती अभियानाचे समन्वयक सामाजिक कार्यकर्ते जगदीश सोनवणे यांनी दिली. तसेच पुढील आठवड्यात वनराई बंधारे बांधण्याचे ग्राम वन व कृषी विकास समितीने ठरविले असल्याचे त्यांनी सांगितले.

## भालगावात हरिनाम सप्ताहास सुरुवात

**पैठण / प्रतिनिधी**

भालगाव येथे गुरुवार, २३ ऑक्टोबरपासून हरिनाम सप्ताहास सुरुवात झाली. या सप्ताहाला मार्गदर्शक म्हणून पांडुरंग महाराज गाधेलीकर उपस्थित होते. हरिनाम सप्ताहात ह.भ.प. ऋषीकेश महाराज नाब्दे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाघ, ह.भ.प. कल्याण महाराज जायभाये, ह.भ.प. गंगाराम महाराज राऊत, ह.भ.प. गणेश महाराज कांगणे, ह.भ.प. संतोष महाराज आढवगे, ह.भ.प. सचिन महाराज ढोले यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प. भानुदास महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

या हरिनाम सप्ताहास आडगाव, निपाणी, झाल्टा, आपतगाव, एकोड, पाचोड, चित्तेगाव गारखेडा व चित्ते पिंपळगाव परिसरातील भाविक या सप्ताहात सहभागी झाले होते. हरिनाम सप्ताहाचे संयोजक उध्दव पाटील डिघुले, हरीभाऊ डिघुळे, विक्रम अबाजी डिघुळे व भगवान ढाकणे यांनी सर्व भक्तांना सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

दर रविवारी मोफत तपासणी



नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.
डॉ.ए.एच.शेख
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बस स्टॅण्डसमोर,हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)
9021111549 / 7020614645
www.drshaikhah.com



# कुरकुरीत ब्रेड भजी

झटपट रेसिपी

मित्रांनो, संध्याकाळी चहासोबत तुम्ही छानपैकी ब्रेडची भजी खाऊ शकता. ही कुरकुरीत भजी संध्याकाळच्या वेळी पोटभरीची ठरतील.

**सामग्री:** चार ब्रेड स्लाईस, अर्धा कप दही, पाउण कप बेसन, वाटलेली हिरवी मिरची एक चमचा, थोडी कोथबिर, चवीनुसार मीठ, तेल

**कृती:** ब्रेड स्लाईसच्या कडा कापून घ्या. उरलेल्या ब्रेडचे छोटे तुकडे करून घ्या. आता एका भांड्यात बेसन, मिरची, दही आणि मीठ घालून घट्टसर पीठ बनवून घ्या. त्यात ब्रेडचे तुकडे घाला. आता कढईत तेल गरम करायला ठेवा. आता चमच्याने हे मिश्रण हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. कुरकुरीत आणि खमंग ब्रेड भजी चहासोबत खा.



# शेतकऱ्याची साबणनिर्मिती

अचिव्हर



असे म्हटले जाते की आवड असेल तर शेती फक्त धान्यांपुरती मर्यादित नाही, नवीन प्रयोग करून शेतकरी स्वतःसाठी रोजगार आणि ओळख दोन्ही निर्माण करू शकतात. मध्य प्रदेशातील बुरहानपूर जिल्ह्यातील एकझिरा गावातील शेतकरी सूपडू चौहान यांनी असाच एक पराक्रम केला आहे. गेल्या चार वर्षांपासून केळीची नैसर्गिक शेती करणाऱ्या सूपडू चौहान यांनी आता शेतीसोबतच नवनवीन प्रयोग करून कडुनिंब आणि कोरफडीपासून हर्बल साबण बनवण्यास सुरुवात केली आहे.

टाळेबंदीदरम्यान सर्व काही बंद होते, तेव्हा सूपडू यांनी मोबाईलवर एक व्हिडीओ पाहिला. त्यात कडुनिंब आणि कोरफडीपासून साबण बनवण्याची पद्धत समजावून सांगितली होती. सुरुवातीला त्याने लहान प्रमाणात प्रयोग केले आणि यशस्वी झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू केले.

**साबण कसा बनवला जातो?**

सूपडू सांगतात, मी कडुलबाची पाने, कोरफडीचे जेल आणि ग्लिसरीन मिसळून साबण तयार करतो. यात कोणत्याही प्रकारचे रसायन नसल्यामुळे ते पूर्णपणे हर्बल आणि त्वचेला अनुकूल आहे. मुरुम आणि मुरुमांच्या समस्येत ते खूप प्रभावी ठरते. एकदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुमारे १५ दिवस लागतात. एका बॅचमध्ये २०० ते ३०० नग साबण तयार केले जातात. बाजारात त्यांची कमत प्रति नग २० रुपये आहे.

**किती कमाई?**

शेतकरी सूपडू चौहान दरमहा ६०० ते ७०० साबण विकतात. ते घरोघरी आणि दुकानांमध्ये साबण पुरवतात आणि दरमहा चांगले उत्पन्न मिळवतात. ते म्हणतात, की शेतीतून जितका आनंद आणि समाधान मिळते तितकाच आनंद लोक म झ्या साबण वापरतात आणि म्हणतात, की त्याचा त्यांना फायदा झाला तेव्हा मिळतो. माझ्यासाठी ही सर्वात मोठी कमाई आहे.

**नैसर्गिक शेतीतून दुहेरी फायदा**

केळ्याच्या शेतीमध्ये सूपडू फक्त सेंद्रिय खते आणि नैसर्गिक पद्धती वापरतात. यामुळे पिकाची गुणवत्ता चांगली राहते आणि आता त्यांच्या हर्बल साबण व्यवसायाने त्याची ओळख आणि उत्पन्न दोन्ही दुप्पट केले आहे.

## शेर की जुबानी

जिंदगी गुजर जाए पर दोस्ती कम न हो,
याद हमें रखना चाहे पास हम न हो।

तारों में अकेला चांद जगम गाता है,मुश्किलों में अकेला इन्सान डगमगाता है,
कांटो से मत घबराना मेरे दोस्त,
क्योंकी कांटों में भी गुलाब मुस्कुराता है।

कभी रात में तारे गिनके देख लेना,
जितना तुम गिन पाए उतना
तुम हमें याद करते हो,
और जितने तारे बच जाए उतना हम तुमको याद करते हैं।

# 'रेझ्युमे' अधिक चांगला कसा कराल?

सल्ला मोलाचा



'डिजिटलायझेशन'च्या युगात नोकरी शोधण्याची प्रक्रिया झपाट्याने बदलत आहे. कंपन्यांकडे आज वेळेची कमतरता असून प्रत्येक उमेदवाराचा सीव्ही सखोलपणे वाचला जात नाही. त्यामुळेच आता जुन्या पद्धतीचे रेझ्युमे चालत नाहीत. त्याऐवजी कमी पण योग्य आणि प्रभावी माहिती असलेला सीव्ही महत्त्वाचा ठरत आहे.

आजही अनेकजण आपल्या 'सीव्ही'मध्ये वैयक्तिक माहिती, जसे की वैवाहिक स्थिती, धर्म, जन्मतारीख, आई-वडिलांची नावे अशा बाबी नमूद करतात; परंतु या माहितीचा नोकरीशी थेट काही संबंध नसतो. यामुळे सीव्ही लांबतो आणि मुख्य गोष्टींचे महत्त्व कमी होते. या जागेचा वापर आपण LinkedIn प्रोफाईल, पोर्टफोलिओ लिंक्स, ऋत्रीकींल प्रोफाईल (IT क्षेत्रासाठी) यासाठी करू शकता. मोबाइल क्रमांक आणि ई-मेल मात्र अनिवार्य असावेत. कारण हेच तुमच्याशी संपर्क साधण्यासाठी मुख्य साधन ठरतात.

**'ऑब्जेक्टिव्ह' टाळा**

एक मोठी चूक अनेक उमेदवार करतात, ती म्हणजे एकच 'Career Objebtive' अनेक ठिकाणी वापरणे; मात्र प्रत्येक कंपनीची गरज, कार्यपद्धती आणि संस्कृती वेगळी असते. त्यामुळे ज्या संस्थेसाठी अर्ज करत आहात, त्यानुसार ऑब्जेक्टिव्ह ठरवणे गरजेचे आहे. यामुळे 'एचआर' ला उमेदवाराच्या गंभीरतेचा आणि नोकरीसाठीच्या तत्परतेचा अंदाज येतो. केवळ नोकरीसाठी सुसंगत अनुभवच नमूद करा.

आपल्याकडे अनेक नोकरी कवा इंटर्नशिपचा अनुभव असतो; पण त्या सर्व नोंदवणे ही चूक ठरू शकते. कारण प्रत्येक अनुभव आवश्यकच असेल असे नाही. त्याऐवजी, संबंधित जॉबच्या भूमिकेशी जुळणारेच अनुभव समाविष्ट करा. यामुळे 'एचआर'चे वाचन सुकर होते आणि 'सीव्ही' अधिक लक्षवेधी ठरतो.

**स्पर्धा आणि उपक्रम गरजेपुरतेच लिहा**

शाळेतील लहान वयातील स्पर्धा, निबंध, चित्रकला अशा गोष्टी जर नोकरीशी संबंधित नसतील, तर त्यांचा उल्लेख टाळा. त्याऐवजी, शैक्षणिक प्रगती, मिळवलेली स्कॉलरशिप, संबंधित कोर्सेसचे उल्लेख फायदेशीर ठरू शकतात.

# राजस्थानात ही ठिकाणे अवश्य पाहा...

स्टाईल स्टेटमेंट



भारतातील सर्वात रंगीबेरंगी आणि ऐतिहासिक राज्य म्हणजे राजस्थान. ते खासमखास राजवाड्यांसाठी, किल्ल्यांसाठी, वाळवंटांसाठी, तलावांसाठी आणि चैतन्यशील संस्कृतीसाठी ओळखले जाते. राजस्थानची राजधानी असलेले गुलाबी शहर जयपूर, त्याच्या ऐतिहासिक वारसा आणि शाही वैभवासाठी ओळखले जाते. येथे आमर महल, सिटी पॅलेस आणि हवा महलला भेट देणे आवश्यक आहे. जयपूरच्या रंगीबेरंगी बाजारपेठांमध्ये दागिने, बूट आणि हस्तकला खरेदी करणेदेखील आनंददायी आहे.

**☆ उदयपूर लेक सिटी**

रोमँटिक ठिकाणांची आवड असेल, तर उदयपूर परिपूर्ण आहे. येथे सिटी पॅलेस, लेक पिचोला आणि सहेलियों की बारीसारखी सुंदर ठिकाणे आहेत. रात्री पिचोला लेकवर बोटग करणे हा एक संस्मरणीय अनुभव ठरतो. उदयपूर हे केवळ भारतीय पर्यटकांमध्येच नाही, तर परदेशी पर्यटकांमध्येही खूप प्रसिद्ध आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात.

**☆ सोनेरी वाळूचे शहर जैसलमेर**

जैसलमेर सोनेरी वाळू आणि वाळवंट संस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. सोनार किल्ला आणि गडीसर तलाव हे येथील मुख्य आकर्षण आहेत. जैसलमेरच्या वाळवंटात सँड सर्फिंग आणि कॅम्पफायरचा आनंद घेण्यास विसरू नका.

**☆ जोधपूर ब्लू सिटी**

जोधपूरचा मेहरानगड किल्ला आणि उम्मेद भवन पॅलेस पाहण्यासारखे आहेत. जोधपूरच्या रस्त्यांवर फिरताना निळ्या घरांचे सौंदर्य तुम्हाला मंत्रमुग्ध करेल. येथील स्ट्रीट फूडचादेखील आवर्जून आस्वाद घ्यायला हवा.

**☆ रणथंभोर आणि सवाई माधोपूर**

निसर्गप्रेमी असाल, तर रणथंभोर राष्ट्रीय उद्यानात वाघ सफारी नक्की करा. येथे तुम्हाला वाघ, बिबटे आणि इतर वन्य प्राणी पाहायला मिळतील. प्रत्येक कोपरा तुम्हाला एक नवीन कहाणी सांगतो. कधी राजांच्या अभिमानाची आणि वैभवाची, कधी वाळवंटातील सोनेरी वाळूची आणि साहसी अनुभवाची.

राजस्थानमध्ये प्रवास करणे हे केवळ पर्यटन नाही, तर तो एक अनुभव आहे. येथील रस्त्यांवर चालताना तुम्हाला इतिहास, कला आणि लोकसंस्कृतीचे थेट प्रदर्शन पहायला मिळेल. रंगीबेरंगी बाजारपेठा, स्वादिष्ट स्ट्रीट फूड, पारंपारिक राजस्थानी पोशाख आणि संगीत इथे भुरळ घालते.

## स्मार्ट टिप्स



**'व्हॉट्स ॲप' वर नवीन वैशिष्ट्ये**

'व्हॉट्स प'मध्ये ही तीन नवीन वैशिष्ट्ये आली आहेत.

**☆ शेड्यूल्ड कॉल**

आता वापरकर्ते 'व्हॉट्स प' मध्ये ग्रुप कॉल शेड्यूल करू शकतात. याचा अर्थ असा, की वापरकर्ता त्याच्या कोणत्याही संपर्कांना कवा संपूर्ण गटाला व्हिडीओ कॉलसाठी आगाऊ सूचना पाठवू शकतो.

**☆ इन-कॉल इंटरॅक्शन टूल्स**

दुसरे नवीन वैशिष्ट्य इन-कॉल इंटरॅक्शनबद्दल आहे. याचा अर्थ असा, की आता 'व्हॉट्स प' वापरकर्ते व्हिडीओ कॉल दरम्यान प्रतिक्रिया देऊ शकतील. उदाहरणार्थ, एखाद्या वापरकर्त्याला बोलायचे असेल तर तो व्हिडीओ कॉल दरम्यान हात वर करू शकतो. त्याचप्रमाणे, तो संभाषणात व्यत्यय न आणता कॉल दरम्यान प्रतिक्रिया देऊ शकतो.

**☆ नवीन कॉल व्यवस्थापन**

कंपनीने कॉल टॅबदेखील अपडेट केला आहे. आता त्यात येणाऱ्या कॉलम ध्ये सहभागी होणाऱ्या लोकांची यादी आणि शेअर करण्यायोग्य कॉल लक्सचे स्पष्ट दृश्य असेल. यासोबतच, जेव्हा कोणी व्हिडीओ कॉलला लकवरून कॉल अटेंड करेल, तेव्हा कॉलरला त्याची सूचना मिळेल. ही 'व्हॉट्स प'ची तयारी आहे. 'व्हॉट्स प'ने वैयक्तिक आणि व्हिडीओ कॉलशी संबंधित ही महत्त्वाची वैशिष्ट्ये आणून तयारी केली आहे.

# करीअर निवडीसाठी काय कराल?

करीअरवेध



करीअरच्या प्रवासाला सुरुवात करणे हा एखाद्याच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण असतो. आज तुम्ही घेतलेले निर्णय तुमचे भविष्य घडवतील, तुमच्या आनंदावर, आर्थिक स्थिरतेवर आणि एकूण समाधानावर परिणाम करतील. उपलब्ध असंख्य शक्यता आणि मार्गांमुळे योग्य करिअर मार्ग निवडणे कठीण वाटू शकते. तथापि, एक संरचित दृष्टिकोन अवलंबून आणि विविध घटकांचा विचार करून तुम्ही आपल्या कौशल्यांना, आवडींना आणि आकांक्षांना अनुकूल असा निर्णय घेऊ शकता.

**१. स्व-मूल्यांकन:** योग्य करिअर मार्ग निवडण्याचे पहिले पाऊल म्हणजे स्वतःला समजून घेणे. तुमची ताकद, कौशल्ये, आवडी आणि मूल्यांचे मूल्यांकन करण्यासाठी वेळ काढा. तुम्ही नैसर्गिकरित्या कशात चांगले आहात, कोणत्या बाबी तुम्हाला ऊर्जा देतात याचा अंदाज घ्या. तुमचे छंद, शैक्षणिक यश आणि मित्र आणि मार्गदर्शकांकडून मिळालेल्या अभिप्रायाचा विचार करा. तुमच्यासाठी योग्य असलेले करिअर पर्याय ओळखण्यासाठी आत्म-जागरूकता ही गुरुकिल्ली आहे.

**२. संशोधन:** विविध करिअर पर्यायांचा शोध घ्या. जगात करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत, त्यापैकी बरेच तुम्हाला कदाचित माहितीही नसतील. विविध उद्योग, नोकरीच्या भूमिका आणि व्यवसायांचा शोध घ्या. त्यांच्या जबाबदाऱ्या, आवश्यक पात्रता आणि संभाव्य वाढीच्या शक्यतांबद्दल जाणून घ्या. या क्षेत्रात आधीच असलेल्या व्यावसायिकांकडून अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी नोकरी मेळे, सेमिनार आणि कार्यशाळांना उपस्थित रहा. येथेच रोजगार मेळा योजना कामाला येते.

**३. नोकरी मेळावे यांचा परिचय:** रोजगार मेळा हा एक मौल्यवान उपक्रम आहे, त्याचा उद्देश म्हणजे नोकरी शोधणाऱ्यांना नियोक्त्यांशी जोडणे. हे नोकरी मेळे व्यासपीठ म्हणून काम करतात, जिथे विविध कंपन्या आणि संस्था त्यांचे काम आणि उपलब्ध पदे प्रदर्शित करण्यासाठी बूथ स्थापित करतात. नोकरी मेळाव्यात सहभागी झाल्याने संभाव्य नियोक्त्यांशी थेट संपर्क साधता येतो. त्यामुळे संवाद साधण्याची, नोकरीच्या भूमिकांबद्दल चौकशी करण्याची आणि तुमचा सीव्ही सबमिट करण्याची संधी मिळते. ही योजना नोकरी शोधणाऱ्या आणि रोजगाराच्या संधींमधील अंतर कमी करण्यासाठी पूल म्हणून काम करते.

**४. कौशल्य विकास:** संभाव्य करिअर मार्ग ओळखल्यानंतर, तुम्हाला काही कौशल्यातील तफावत जाणवू शकते. स्वतःला अधिक आकर्षक उमेदवार बनवण्यासाठी या तफावती भरून काढणे आवश्यक आहे. आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी कार्यशाळा, अभ्यासक्रम कवा ऑनलाइन वर्गांमध्ये नावनोंदणी करण्याचा विचार करा. रोजगार मेळा योजना अनेकदा कौशल्य विकास सत्रेदेखील देतात. त्यामुळे क्षमता वाढते आणि इच्छित क्षेत्रात नोकरी मिळण्याची शक्यता वाढते.

**५. ध्येय निश्चिती:** अल्पकालीन आणि दीर्घकालीन सुस्पष्ट ध्येय तुमच्या करिअर प्रवासाला दिशा देऊ शकते. अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही ध्येये निश्चित करा. पुढील काही वर्षांमध्ये तुम्ही काय साध्य करण्याचे ध्येय ठेवता? ते तुमच्या दीर्घकालीन आकांक्षांशी कसे जुळते हे बघून घ्या. स्पष्ट ध्येय असणे तुम्हाला लक्ष केंद्रित करण्यास आणि प्रेरित राहण्यास मदत करू शकते.

## टेक्नो टॉक



**'व्हॉट्स ॲप'ला इन्स्टाग्राम अकाउंट जोडणारे फीचर**

**हे फीचर कसे काम करते?**

'मेटा'च्या अकाउंट सेंटरद्वारे इंस्टाग्राम अकाउंट लक करता येते. या फीचरमुळे वापरकर्त्यांना 'मेटा'च्या अकाउंट सेंटरद्वारे त्यांचे इंस्टाग्राम अकाउंट व्हॉट्स प्रोफाइलशी लक करण्याचा पर्याय मिळेल. 'व्हेरिफिकेशन'नंतर हे अकाउंट लक केले जाईल. एकदा पडताळणी झाल्यानंतर प्रोफाइलवर 'सोशल आयकॉन' दिसेल. यामुळे 'व्हॉट्स अप' वापरकर्त्यांच्या संपर्कांना हे अकाउंट खरे आहे हे कळेल. हा पर्याय आधीही होता; परंतु आधी त्यात वेरिफिकेशन जोडले गेले नव्हते. 'व्हॉट्स अप' वापरकर्ते त्यांच्या प्रोफाइलवर कोणतेही इंस्टाग्राम अकाउंट दाखवू शकत होते. अशा परिस्थितीत काही वापरकर्ते गोंधळले होते, की 'व्हॉट्स अप' प्रोफाइलवर दिसणारे अकाउंट खरे आहे की दुसऱ्याचे इंस्टाग्राम अकाउंट आहे. हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी आणलेले नाही. सध्या कंपनी फक्त बीटा वापरकर्त्यांसाठी याची चाचणी घेत आहे. नंतर अभिप्रायाच्या आधारे टप्प्याटप्प्याने सर्व वापरकर्त्यांसाठी आणले जाईल. 'व्हॉट्स अप'च्या या नवीनतम वैशिष्ट्याचा लाभ घेण्यासाठी, प नियमितपणे अपडेट करत राहणे महत्त्वाचे आहे.

## टिप्स अँड ट्रिक्स



**इच्छेप्रमाणे फोटो एडिटींग करता येणार**

'गूगल'ने आपल्या गूगल फोटोज पसाठी एकदम मस्त अपडेट आणले आहे. हे फीचर फोटो प्रेमींसाठी वरदान ठरणार आहे. त्यामुळे फोटो एडिटग आता सोपे आणि मजेदार होणार आहे. या नव्या फीचरमुळे वापरकर्ते फक्त आपली इच्छा बोलून सांगून फोटो एडिट करू शकतील.

सर्वात अगोदर हे फीचर अमेरिकेतील पिक्सेल १० डिव्हाइसेसवर उपलब्ध होईल. त्यानंतर येत्या काही आठवड्यांमध्ये इतर अँड्रॉइड आणि 'आयओएस डिव्हाइसेस'वरही ते विस्तारित होईल. 'गूगल'च्या जेमिनी मॉडेलवर आधारित हे नवे फीचर 'गूगल फोटोज'च्या एडिटरचा भाग आहे. आता फोटो एडिट करण्यासाठी अवघड साधने शोधण्याची कवा स्लायडर्स ड करण्याची गरज नाही. हे वापरणारी व्यक्ती हवे असलेले बदल बोलून सांगू शकतात. उदाहरणार्थ 'बॅकग्राउंडच्या गाड्या काढा', 'हा जुना फोटो नवीन बनवा' कवा अगदी 'हा फोटो जरा चांगला करा' अशा सूचना देता येतील. गूगल फोटोज त्या सूचनांचे पालन करून एडिट करेल. या फीचर्समुळे फोटो एडिटग केवळ जलदच होणार नाही, तर सर्वसामान्य वापरकर्त्यांसाठीही आणखी सोपे होईल.

# तिला गमवायचं नाही...

मंच मेकिंग



गेल्या सहा महिन्यांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. तिच्या आणि माझ्या आईवडिलांना आमच्या नात्याबद्दल कल्पना आहे. पण गेल्या काही दिवसांपासून माझी मैत्रीण खूपच विचित्र वागते आहे. तिच्या आईवडिलांना आमचं हे नातं पसंत नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती याचं कारणही सांगायला तयार नाही. मी तिच्या पालकांशी बोलायला तयार आहे. पण ती याबद्दल काहीच बोलत नाही. आता मी काय करू? मला तिला गमवायचं नाही.

**उत्तर :** मित्रा, सध्या तू विचित्र परिस्थितीत अडकला आहेस. खरं तर तुझ्या मैत्रिणीचे तिच्या पालकांच्या मनातलं जाणून घ्यायला हवं. त्यांच्या मनात तुझ्याबद्दल नेमकं काय आहे, न भेटताच ते तुला का नाकारत आहेत हे तिला कळायला हवं. आधी तिच्या पालकांचं म्हणणं ऐकून घ्या. मग तुम्ही दोघं बोला आणि पुढे काय करायचं हे ठरवा. तुम्ही दोघांनीही शांत रहाणं गरजेचं आहे. अजिबात गोंधळून जाऊ नका. काहीतरी मार्ग नक्कीच निघेल.

# सांभाळा शरीराचा तोल

फिटनेस फंडा



दोस्तांनो, आपल्याला आपल्या शरीराचा तोल सांभाळता आला पाहिजे. तोल सांभाळण्याचा सराव तुम्ही कसा करू शकता. शरीराचा तोल सांभाळण्याचे लाभ जाणून घेऊ.

☆ तोल सांभाळण्याच्या सरावामुळे तुमचे सांधे, स्नायू बळकट होतात. गुडघे, पायाच्या घोट्यालगतच्या स्नायूंना याचा लाभ होतो.

☆ शरीराचा तोल सांभाळण्याचं तंत्र गवसल्यामुळे दुखापतीची शक्यता कमी होते.

☆ शरीराचा तोल सांभाळण्याचा सराव करण्याआधी शरीराची क्षमता तपासून घ्या. यासाठी एका पायावर उभे रहा. अशा स्थितीत किती वेळ उभं रहाता येतं हे बघा. साधारण मिनिटभर या स्थितीत उभं रहाता यायला हवं.

☆ तोल सांभाळण्यासाठी स्क्वॅट्स करायला सुरुवात करा. यामुळे पाय, पोट्या आणि मांड्यांचे स्नायू बळकट होतील आणि एका पायावर तोल सांभाळणं शक्य होईल.

☆ एका पायावर शरीराचा तोल सांभाळायचा सराव करा. स्क्वॅट्सच्या तुलनेत हा व्यायामप्रकार थोडा कठीण आणि गुंतागुंतीचा आहे. मात्र यामुळे तुम्हाला तोल सांभाळण्याचं तंत्र गवसेल.

☆ योगासनं करताना शरीराच्या स्थितीत सतत बदल होत असतात. यामुळे शरीराचा तोल साधणं शक्य होतं. अगदी साधी योगासनं करतानाही वेगेवेगळ्या स्नायूंवर ताण येतो. या सगळ्याचे लाभ शरीराला होतात.

# कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करायचंय?

वेगळ्या वाटा



सध्या ऑनलाईन शॉपिंगचा बराच बोलबाला आहे. विविध ऑनलाईन साईट्स ग्राहकांना सवलतींची खैरात करतात. मोबाईल फोनसह विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू अर्ध्या किमतीत मिळतात. अशा ऑनलाईन शॉपिंग साईट्समुळे दुकानदारांपुढे बरीच आव्हानं उभी राहिली. तरुण मंडळी ऑनलाईन खरेदी करत असली तरी अनेकांना वस्तू प्रत्यक्ष बघून, स्पर्श करून खरेदी करायला आवडतं. सध्याच्या तीव्र स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी दुकानदारही वेगवेगळे फंडे लढवत असतात. त्यातूनच कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना उदयाला आली आहे. या कॉन्सेप्ट स्टोअरच्या माध्यमातून तुम्हीही उद्योजक बनू शकता. याबाबतचं मार्गदर्शन...

कॉन्सेप्ट स्टोअर विशिष्ट संकल्पनेवर आधारित असतं. म्हणजे या स्टोअर्समध्ये ठराविक उत्पादनं विक्रीसाठी ठेवली जातात. काही दुकानांमध्ये फक्त सौंदर्यप्रसाधनं मिळतात तर काहींमध्ये गृहपयोगी वस्तू असतात. पुस्तकं, सजावटीच्या वस्तू अशा विविध संकल्पनांवर आधारित असणारी ही स्टोअर्स आता लोकप्रिय ठरत आहेत. ठराविक ग्राहकवर्ग समोर ठेऊन हे स्टोअर सुरू केलं जातं.

कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना अजूनही नवी आहे. त्यामुळे हा प्रकार लोकप्रिय होईपर्यंत थोडं थांबावं लागेल. दुसरं म्हणजे कॉन्सेप्ट स्टोअर्स नेहमीच्या दुकानांपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात. ही स्टोअर्स ग्राहकांना आपल्याशी जोडून घेण्याचा पयत्न करतात. त्यांच्याशी जोडलेले रहातात. त्यामुळे कॉन्सेप्ट स्टोअर सुरु करताना ही बाब नेहमी लक्षात ठेवा.

# कोणत्या व्यक्तिमत्त्वासाठी कोणती जिन्स उपयुक्त?

स्टाईल स्टेटमेंट



जीन्स हा एक असा पोशाख आहे, जो आजकाल सर्व वयोगटातील लोकांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. ऑफिसपासून बाहेरगावी जाईपर्यंत आणि पार्टीपर्यंत, पुरुष तसेच महिलांना जीन्स घालायला आवडते. ते खरेदी करणेदेखील सोपे आहे. फक्त तुमच्या आकारानुसार ऑफलाइन कवा ऑनलाइन जीन्स खरेदी करा.

जीन्सदेखील शरीराच्या प्रकारानुसार येतात. हे ऐकायला विचित्र वाटत असले, तरी हे वास्तव आहे. प्रत्यक्षात, प्रत्येकाच्या शरीराचा आकार वेगळा असतो आणि त्यानुसार जीन्स निवडणे महत्त्वाचे आहे. योग्य जीन्स केवळ तुमचे व्यक्तिमत्व वाढवत नाही, तर तुम्हाला आरामदायीदेखील बनवत.

**☆ जीन्स खरेदी करण्याच्या टिप्स**

पीअर शेप बॉडी: ज्या लोकांचे शरीर नाशपातीच्या आकाराचे असते, त्यांचे नितंब जड असतात, कंबर आणि वरचे शरीर पातळ असते. अशा लोकांनी बहुतेकदा सरळ फिट जीन्स, हाय-वेस्ट जीन्स, बूटकट जीन्स घालायला. अशा जीन्स नाशपातीच्या आकाराच्या लोकांवर चांगल्या दिसतात.

**☆ ॲपल शेप बॉडी:** ज्या लोकांचे शरीर सफरचंदाच्या आकाराचे असते, पोट जड असते, कंबर रुंद असते अशा लोकांनी मिड-राईज जीन्स, फ्लेर्ड जीन्स, रिलॅक्स फिट जीन्स घ्याव्यात. त्या त्यांना नेहमीच चांगल्या दिसतात. म्हणून पल शेप बॉडी असलेल्या लोकांनी अशा जीन्स खरेदी कराव्यात.

**☆ अवरग्लास शेप:** तुमचे शरीराचे शरीर वक्र असेल, कंबर लहान असेल, कंबर आणि छाती संतुलित असेल तर स्किनी जीन्स, हाय-वेस्ट स्ट्रेच जीन्स चांगल्या दिसतात. अशा लोकांनी जीन्स हुशारीने खरेदी करावी, अन्यथा त्यांचा लूक खराब होऊ शकतो. ज्या लोकांचे शरीर आयताकृती असते, त्यांची कंबर आणि छातीचा आकार जवळजवळ समान असतो. अशा लोकांनी नेहमी लो-राईज जीन्स, डिस्ट्रेस्ड जीन्स, बॉयफ्रेंड जीन्स घालावी. या प्रकारच्या जीन्स त्यांचे सौंदर्य वाढवेल.

**☆ इनव्हर्टेड ट्रँगल:** ज्या लोकांचे शरीर उलटे त्रिकोण असते, त्यांचे वरचे शरीर रुंद असते आणि कंबर सडपातळ असते. अशा लोकांनी नेहमी फ्लेर्ड जीन्स, रुंद पायांची जीन्स, हाय-व्हॉल्यूम जीन्स घालावीत. यामुळे त्यांचे शरीर आणखी सुंदर दिसेल.

दैनिक महाभूमि

# जालना भूमि

शुक्रवार, २४ ऑक्टोबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### मोती तलावात आढळला तरुणीचा मृतदेह

**जालना :** शहरातील मोती तलावात एका तरुणीचा मृतदेह आढळून आला. या प्रकरणी चंदनझिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले.

### आनंदी वातावरणात साजरी झाली एकात्मतेची दिवाळी



**बदनापूर :** दीपावली आणि पाडवा या शुभ पर्वानिमित्त आ नारायण कुचे यांच्या वतीने बदनापूर येथे गुरुवार, २३ ऑक्टोबर रोजी दीपावली स्नेहमीलन कार्यक्रम उत्साहात पार पडला.
या स्नेहमीलन कार्यक्रमास अंदाज समिति प्रमुख तथा आमदार अर्जुन खोतकर यांची उपस्थिती होती.
शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भूतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, तसेच महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते, नागरिक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्लास्टिकच्या दुकानाला लागली आग

**जालना :** शहरातील जुना मोंढा भागातील एका प्लास्टिकच्या होलसेल दुकानाला आग लागली. यात दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले. यावेळी दुकानाला भेट देऊन भाजपाचे युवा नेते अक्षय गोरट्याळ यांनी नुकसानीची पाहणी केली.

### जमिनीची मोजणी होणार आता एका महिन्यात

**जालना :** जमीन मोजणीसाठी आतापर्यंत लागणारा ९० दिवसांचा कालावधी यापुढे लागणार नाही. तर अवघ्या ३० दिवसातच जमिनीची मोजणी पूर्ण होणार आहे. याबाबत शासनाने एक अधिसूचना काढली असून यामुळे मालमत्ता धारकांना दिलासा मिळणार आहे. जमीन मोजणीसाठी अनेक मालमत्ता धारकांना प्रतीक्षेत रहावे लागते. यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागत असल्यामुळे मोजणीचे प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित राहतात. दरम्यान, यापुढे मोजणीसाठी फक्त ३० दिवसांचा कालावधी लागणार आहे. शासनाने मोजणीसाठी आता खासगी भूमापकांची मदत घेण्याचे धोरण स्वीकारले असून यासाठी जिल्ह्यात १५० खासगी भूमापक नेमण्यात येणार आहे.

## जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीच्या नुकसानीपोटी ४२१ कोटींचा प्रस्ताव

# दिवाळी सरली, भाऊबीजही झाली; नुकसानभरपाई कधी मिळणार ?

**जालना / प्रतिनिधी**

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील बहुतांश भागातील शेतीपिके पाण्यात गेली. दरम्यान, राज्य सरकारने दिवाळीच्या तोंडावर ३१ हजार कोटींची मदत जाहीर केली. दिवाळीच्या आधी ही मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार होती. मात्र, दिवाळी सरली, पाडवा आणि भाऊबीजही झाली; तरीही शासनाची मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली नाही. जालना जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांची सरकारने थट्टा केल्याचा आरोप शेतकरी संघटनेचे सुरेश काळे, शिवाजी लकडे यांनी केला आहे.

ही मदत कधी मिळणार असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. सप्टेंबर महिन्यात जालना



जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले. या महिन्यात ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेल्या ६ लाख ३ हजार ३९३ शेतकऱ्यांच्या मदतीपोटी ४२१ कोटी ४१ लाख ४७ हजार २२५ रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. अतिवृष्टी व पूरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मिन्नू, अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल आणि इतर अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली पंचनामे करण्यात आले होते. त्यानुसार जालना जिल्ह्यात ४ लाख ४९ हजार शेतकरी बाधित झाले आहेत. यात ४ लाख ५४९ हेक्टर जिरायत शेती, १ हजार २७५ बागायती तर २७ हजार ४५८ हेक्टर फळपिकांचे नुकसान झाले आहे. अंबड तालुक्यात सर्वाधिक ९३ हजार १२९ हेक्टर शेत पिकांचे नुकसान झाले. कापूस पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले. जिल्ह्यात १ लाख ८४ हजार ९४ हेक्टर क्षेत्रावरील कापसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सोयाबीन १ लाख ६८ हजार ३१२ हेक्टर, मका– २ लाख हेक्टरवरील क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. जवळपास शेतकऱ्यांची बहुतांश खरिपाची पिके वाया गेली आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने जाहीर केलेली मदत तुटपुंजी असली तरी किमान दिलासा देणारी ठरली असती. पण तीही अद्याप खात्यावर जमा झालेली नसल्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी जेमतेम परिस्थितीत साजरी झाली.

### शेतकऱ्यांची थट्टा

■ राज्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले. जालना आणि मराठवाड्यातील दुष्काळी भागात देखील अतिवृष्टीमुळे खरिपाची सर्व पिके उध्वस्त केली. हातातोंडाशी आलेला उत्पन्नाचा घास हिरावला गेला असताना सरकारने मदत जाहीर केली आणि दिवाळीच्या आधी देणार म्हणून स्वतः ची पाठ थोपटून घेतली. मात्र, शेतकऱ्यांच्या खात्यावर एकही रुपया आलेला नाही. सरकारने शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. याविरुद्ध शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल, अशी प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष सुरेश काळे आणि शेतकरी संघटनेचे नेते शिवाजी लकडे यांनी दिली.

### अशी मिळणार मदत

■ जिरायत शेतीसाठी ८ हजार ५०० रुपये प्रतिहेक्टरी तर बागायतीसाठी १७ हजार व फळपिकांसाठी २२ हजार ५०० रुपये प्रतिहेक्टरी मदत देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. यानुसार, जिरायत शेतीच्या नुकसानीपोटी ३५७ कोटी ४६ लाख ६३ हजार ५२५ रुपयांची मागणी करण्यात आली आहे. बागायती शेतीच्या नुकसानीसाठी २१ कोटी ६८ लाख ९५० रुपयांची मदतीची तर फळपिकांसाठी ६१ कोटी ७८ लाख २ हजार ७५० रुपयांच्या मदतीची मागणी करण्यात आलेली आहे.

### तालुकानिहाय आकडेवारी

| तालुका | बाधित शेतकरी | मदतीची मागणी |
|---|---|---|
| ■ जालना | ८६४३३ | ६४२७४५३१० |
| ■ बदनापूर | ६४९३३ | ३३८१३२७५० |
| ■ भोकरदन | १०८४७१ | ५३२७९७००० |
| ■ जाफराबाद | ३३२६९ | ११५०९७३१० |
| ■ परतूर | ५०५१८ | ४३६८०८५१५ |
| ■ मंठा | ५८४०८ | ३९८४८३०९० |
| ■ अंबड | १०५७९१ | ९७१९९८७७५० |
| ■ घनसावंगी | ९५५७० | ७७८०९५५०० |

## रिपब्लिकन सेनेच्या वतीने आ. खोतकर यांची सदिच्छा भेट



**जालना / प्रतिनिधी**

आमदार अर्जुन खोतकर यांच्या संपर्क कार्यालयात दिवाळी स्नेहमेलन कार्यक्रमानिमित्त रिपब्लिकन सेनेच्या वतीने सदिच्छा भेट घेण्यात आली.

यावेळी रिपब्लिकन सेनेचे पश्चिम जिल्हाध्यक्ष लिंबाजी वाहुळकर, समाधान खरात, मच्छिंद्र खरात, भिमराज खरात, दिनेश वाहूळ, अर्जुन म्हस्के, पाराजी गाडेकर, गोवर्धन वाहुळकर, बबनराव खरात, रमेश खरात, सर्जेराव वाहुळकर, विशाल गाडेकर, कैलास लहाने, भगवान खरात इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## उपोषणस्थळी बंजारा समाजातर्फे गोवर्धन पूजन

### खासदार, आमदारांच्या भेटी: उद्या रास्ता रोको आंदोलन

**जालना / प्रतिनिधी**

बली प्रतिपदा, पाडवा निमित्त बंजारा समाजाच्या वतीने एसटी आरक्षणासाठी आमरण उपोषणास बसलेले विजय चव्हाण यांच्या उपोषणस्थळी पारंपरिक पद्धतीने गोवर्धन पूजन करण्यात आले. यावेळी महिलांनी " हुरेहूर गाई – गोधन पूज । केवड्या,मेवड्या,बांड्या,बूचा,।।

घोडेरी कटारे,उटेरी कटारे, लांबी हारे,धोळी हारे । विजय नाईक तारे टांगे उची करेस!!" अशा बोली गीतांमधून विजय चव्हाण यांची कीर्ती उज्वल व्हावी अशी प्रार्थना केली.

तथापि शासन, प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याच्या निषेधार्थ शनिवार, २५ ऑक्टोबर रोजी बंजारा समाजाकडून रास्ता रोको आंदोलन केले जाणार आहे.

हैद्राबाद गॅझेटप्रमाणे बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा, सी.पी.बेरार गॅझेट लागू करावे, आरक्षण लढाईतील आत्महत्या ग्रस्त कुटूंबांना आर्थिक मदत व शासकीय नोकरी द्यावी या मागण्यांसाठी मागील आठ दिवसांपासून विजय चव्हाण यांचे आमरण उपोषण सुरू असून दररोज मराठवाडा , विदर्भ, खानदेश, महाराष्ट्रातील बंजारा समाज बांधव भेटी देऊन लढा तीव्र करण्याचा निर्धार करत आहेत. आ.अर्जुन खोतकर, आ.नारायण कुचे, खा.डॉ. कल्याण काळे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन समाजबांधवांसोबत संवाद



साधला. यावेळी उध्दव पवार यांनी कष्टकरी,ऊसतोड बंजारा समाजाची स्थिर रोजगार, शिक्षणाच्या सुविधा नसल्याने होत असलेली फरफट, हाल अपेष्टा मांडून समाजाच्या भावना तीव्र आहेत, दंडेलशाही करणारे पोलीस निरीक्षक साबळे यांना तात्काळ निलंबित करावे, शासनाचे शिष्टमंडळ उपोषण स्थळी पाठवावे आणि बंजारा समाज एसटी आरक्षणासाठी विशेष अधिवेशन घ्यावे,अशा मागण्या पवार यांनी केल्या.

### आईला आश्रू अनावर

■ समाजासाठी स्वतःच्या जीवाची बाजी लावून आमरण उपोषण करत असलेले विजय चव्हाण यांच्या आईने सातव्या दिवशी उपोषण स्थळी भेट दिली.ऐन सणासुदीच्या काळात मुलगा घरी नसल्याने तसेच ढासळलेली प्रकृती पाहून आईंना आश्रू अनावर झाले. हा प्रसंग पाहताच सभा मंडपात सर्वत्र स्तब्धता पसरली.भाऊबीज निमित्त महिलांनी चव्हाण यांचे औक्षण करून यश, दीर्घायुष्यासाठी आशीर्वाद दिले.

## स्वातंत्र्यवीर सावरकर भवनचे काम प्रगतीपथावर



**जालना :** स्वातंत्र्यवीर सावरकर भवन उभारणीचे काम प्रगती पथावर असून इमारतीचे बांधकाम वेगाने होत आहे. जालना शहरातील भाग्यनगर येथील श्रीकृष्ण कुलकर्णी यांनी भवनासाठी त्यांच्या घराची जागा दान दिली आहे.

जालना येथे सावरकर भवन उभारले जाणार असल्यामुळे सावरकर यांच्यावर श्रद्धा असलेल्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. भाग्यनगर येथे १२ फेब्रुवारी २०२४ रोजी सावरकर भवन उभारणीच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. आमदार अर्जुन खोतकर यांच्या उपस्थितीत या भवनाचा विकास केला जात आहे.

## जालना शहरात अवैध वृक्षतोड; मनपाने केले सात गुन्हे दाखल

**जालना / प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर सुरू असतानाच आता शहरातही अवैध वृक्षतोड केली जात असल्याचे समोर आले आहे. जालना शहरातील तब्बल ४५ झाडे अवैधरीत्या तोडण्यात आली आहेत. याप्रकरणी आतापर्यंत जालना महानगरपालिकेने सात गुन्हे दाखल केले आहेत.

जालना शहरात दोन वर्षांपूर्वी महानगरपालिका अस्तित्वात आल्यामुळे आता शहराचा नव्याने आराखडा तयार केला जाणार आहे. असे असले तरी मागील नऊ महिन्यात जालना शहरातील काही नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणची ४५ झाडे अवैधरीत्या तोडली आहेत. खासगी मालमत्तांना अडसर ठरणारी



रस्त्यांवरील झाडे मालमत्ता धारकांनी विनापरवानगी तोडली आहेत. अशी अनेक प्रकरणे शहरात होत आहे. मात्र यापैकी ४५ प्रकरणाची माहिती महानगरपालिकेला झाली असून यापैकी ७ जणांवर पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मात्र, या नंतरही अवैध वृक्षतोड थांबलेली दिसत नाही. दरम्यान, अवैध वृक्षतोड करणाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी दिला आहे.




### विविध सामाजिक उपक्रमांबद्दल सन्मान

# अंजनी फाउंडेशनला 'जालना गुण गौरव पुरस्कार'



**जालना / प्रतिनिधी**

विविध सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या येथील अंजनी फाऊंडेशनला जालना गुण गौरव पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते नुकतेच सन्मानित करण्यात आले.

जालना गुण गौरव समितीच्या वतीने आयोजित सोहळ्यात आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते अंजनी फाउंडेशनला "जालना गुण गौरव पुरस्कार" प्रदान करण्यात आला. यावेळी फाउंडेशनचे संस्थापक बालाजी किरवले, संस्थेच्या अध्यक्षा ज्योती आडेकर, सचिव विद्या जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल विशेष सन्मान देण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा जालना शहरातील एका हॉटेलात नुकताच पार पडला. यावेळी ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, विष्णू पाचफुले, विजया चौधरी आयोजक समितीचे सागर ठाकूर, दीपक नाडे, सतीश फतपुरे, संतोष लामखाणे यांची उपस्थिती होती.

### वंचित घटकांसाठी काम

■ अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती, व्यसनमुक्ती आणि महिला सक्षमीकरण अशा विविध सामाजिक उपक्रमांत अंजनी फाउंडेशन कार्यरत आहे. समाजातील वंचित घटकांसाठी उपयुक्त उपक्रम राबवून लोककल्याणासाठी योगदान देणाऱ्या या संस्थेच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अजिंक्य आघाडी

# ऑस्ट्रेलियाने भारताचा दोन गडी राखून केला पराभव



## शॉर्ट आणि कॉनॉलीची खेळी ठरली निर्णायक

■ ऑस्ट्रेलियाकडून शॉर्टने सर्वाधिक ७४ धावा केल्या, तर कॉनॉली ६१ धावा करून नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल ओवेनने ३६, मॅट रेनशॉ ३०, ट्रॅव्हिस हेड २८, मिचेल मार्श ११, केरी ९, मिचेल स्टार्क ४ आणि झेवियर बार्टलेटने ३ धावांचे योगदान दिले. भारताकडून अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या, तर मोहम्मद सिराज आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

**एडिलेड, वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताला दोन विकेट्सने हरवून तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अजिंक्य आघाडी घेतली. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रोहित शर्मा आणि श्रेयस अय्यरच्या अर्धशतकांमुळे भारताने ५० षटकांत नऊ बाद २६४ धावा केल्या. प्रत्युत्तरात, ऑस्ट्रेलियाकडून मॅथ्यू शॉर्ट आणि कूपर कॉनोली यांनी अर्धशतके झळकावली, ज्यामुळे संघाला ४६.२ षटकांत आठ बाद २६५ धावांपर्यंत पोहोचता आले.लक्ष्याचा पाठलाग करताना, ऑस्ट्रेलियाने ५४ धावांवर दोन विकेट्स गमावल्या.

परंतु मॅथ्यू शॉर्टने डाव स्थिरावला आणि अर्धशतक झळकावले. त्याला मॅट रेनशॉने साथ दिली. भारताने रेनशॉ आणि ॲलेक्स कॅरीचे बळी घेतले, ज्यामुळे ऑस्ट्रेलियावर दबाव वाढला. त्यानंतर हर्षित राणाने शॉर्टलाही बाद केले. कोनोलीने आपली पकड कायम ठेवली आणि ऑस्ट्रेलियाचा विजय निश्चित केला.

भारताला शेवटी काही विकेट्स मिळाल्या, पण ऑस्ट्रेलिया लक्ष्याच्या इतक्या जवळ पोहोचला होता की भारताचा पराभव निश्चित झाला. भारताचं २६५ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या ऑस्ट्रेलियाला भारतानं सुरूवातीलाच दोन धक्के दिले होते. अर्शदीपनं मार्शला तर हर्षित राणानं ट्रव्हिस हेडला बाद करत तगडा झटका दिला होता.

मात्र त्यानंतर मॅथ्यू शॉर्ट आणि रेनशॉ यांनी भागीदारी रचत संघाला वीसाव्या षटकातच शतकी मजल मारून दिली.

# आफ्रिकेने पाकला ८ गड्यांनी हरवले

### कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत



**नवी दिल्ली :** रावळपिंडी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात जागतिक कसोटी विजेत्या दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानचा ८ विकेट्सने पराभव केला. दोन सामन्यांची कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत सुटली. दक्षिण आफ्रिकेचा फिरकी गोलंदाज केशव महाराज याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. त्याने पहिल्या डावात सात आणि दुसऱ्या डावात दोन विकेट्स घेतल्या आणि ३० धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेचा दुसरा फिरकी गोलंदाज सेनुरन मुथुस्वामी याला मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आले. त्याने मालिकेत ११ विकेट्स घेतल्या आणि १०६ धावा केल्या.

पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना ३३३ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४०४ धावा केल्या आणि ७१ धावांची आघाडी घेतली. पाकिस्तानचा दुसरा डाव फक्त १३८ धावांवर संपला.दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी ६७ धावांचे लक्ष्य होते, जे त्यांनी २ धावांच्या मोबदल्यात ७३ धावा करून साध्य केले.

## दक्षिण आफ्रिकेने ६८ धावांचे लक्ष्य सहज गाठले

■ पाकिस्तानचा डाव १३८ धावांवर संपल्यानंतर दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी ६८ धावांचे लक्ष्य होते. संघाने हे लक्ष्य १२.३ षटकांत दोन गडी गमावून पूर्ण केले. कर्णधार एडेन मार्करामने ४५ चेंडूत ४२ धावा केल्या, तर रायन रिकेल्टनने २९ चेंडूत नाबाद २५ धावा केल्या.

## मुव्ही Time

### बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**मिराई :** दुपारी २, सायंकाळी ५, रात्री ९.३० वा

**बाघी ४ :** दुपारी २.१५, रात्री ९.१५ वा

**दशावतार :** सायंकाळी ५.४५ वा

### खामगाव

**श्री गजानन टॉकीज**

**बागी ४ :** शो टाईम-दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकीज**

**दिल मद्रासी :** शो टाईम- दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

### वाशिम

**एचटूएम मुव्हीप्लेक्स**

**बागी-४ :** दुपारी १२:१५, सायंकाळी ६:१५, रात्री ९:२०

**मिराई :** दुपारी १२:२५, सायंकाळी ६:३०

**दशावतार :** दुपारी ३:१५

**द कॉन्जुरिंग :** लास्ट राइट्स : दुपारी ३:३०, रात्री ९: ३५

### अकोला

**मिराज**

**दी कॉंज्यूरिंग: लास्ट राइट्स :** स. ९.०० वा., दु. ५.०५ वा. रात्री १०.५० वा.

**मिराई :** स. ९.४५ वा. , दु. १.०० वा., सायं. ७.०० वा. रात्र. १०.१५ वा.

**देमॉन स्लायर: कायमेस्टू नो याईबा इन्फिनिटी कास्टल (हिंदी) :** दु. १.३० वा. , रात्री १०.३० वा.

**देमॉन स्लायर: कायमेस्टू नो याईबा इन्फिनिटी कास्टल (इंग्लीश) :** सायं. ७.३० वा.

**बागी ४ :** स. १०.४५ वा., दु. ५.००, रात्री ११.०० वा.

**मन्नु क्या? कारेगा :** स. ११.३५ वा, रा. ८.१५ वा.

**हिर एक्सप्रेस :** दु.२.०० वा.

**बीन लग्नाची गोष्ट :** दु.२.२० वा.

**दशावतार :** सायं. ७.५० वा.

### जालना

**रत्नदीप सिनेमा**

**दशावतार :** सायंकाळी ६ : १५

**मिराय :** दुपारी ३ :००; रात्री ९: ३०

**कृष्णा मल्टिप्लेक्स**

**बागी ४ :** सायंकाळी ६ : ३०; रात्री ९: ३०

**मिराय :** स ९ : ४५; सायंकाळी ६ :००; रात्री ९ :१५

**दशावतार :** दुपारी : ३ :००

**नीलम सिनेमा**

**बागी ४ :** दुपारी : ३ : २०; रात्री ९ : ३०

**दशावतार :** दुपारी १२ : २०; सायंकाळी ६ : ३०

**मिराय :** दुपारी २ :००; ३ :००; रात्री ९:१५




# असरानींची अभिनय शैली अद्वितीय होती : मनोज जोशी

बॉलिवूड अभिनेता असरानी यांचे सोमवारी दीर्घ आजाराने निधन झाले. पाच दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी ३५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. असरानींसोबत अनेक चित्रपटांमध्ये काम केलेले अभिनेते मनोज जोशी यांनी त्यांची आठवण आणि त्यांच्याबद्दलच्या अनेक गोष्टी शेअर केल्या.

मनोज जोशी म्हणाले, 'असरानी... या नावात एक शिस्त, एक उल्लेखनीय ऊर्जा आणि एक नम्रता होती जी आजच्या काळात क्वचितच दिसून येते. त्यांच्या अभिनयाची आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जादू खरोखरच उल्लेखनीय होती. मी त्यांना एका अभिनेता, गुरु आणि एक आख्यायिकेपेक्षा जास्त मानतो आणि प्रियदर्शनच्या अनेक यशस्वी चित्रपटांसह जवळपास १० चित्रपटांमध्ये त्यांच्यासोबत काम करण्याच्या अनुभवातून हा विश्वास निर्माण झाला आहे.' मनोज जोशी यांनी स्पष्ट केले की असरानींची अभिनय शैली अद्वितीय होती. त्यांनी कधीही त्यांचे संवाद लक्षात ठेवले नाहीत, उलट ते हाताने लिहिले. जेव्हा मी त्यांना असे का करता असे विचारले तेव्हा त्यांनी उत्तर दिले, 'लिहिल्याने शब्द त्यांच्या मूळ स्वरूपात लक्षात राहतात. त्यांच्याकडे फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया मधून पदवी होती, ते तिथे शिक्षक होते आणि त्यांनी त्यांच्या काळातील काही महान कलाकारांना शिकवले होते, तरीही त्यांचा दृष्टिकोन कधीही 'मला सर्व काही माहिती आहे' असा नव्हता. ते नेहमीच नवीन कलाकाराच्या तीव्रतेने आणि शिस्तीने कामाकडे पाहत असत.



# दिवाळीत खुशी मुखर्जीचा रस्त्यावर गोंधळ

## पोलिसाशी भांडण, रस्त्यावर फटाके फेकले

बोल्ड कपड्यांमुळे चर्चेत राहणाऱ्या खुशी मुखर्जीचा दिवाळीत रस्त्यावर जोरदार वाद झाला. तिचा एका पोलिस अधिकाऱ्याशीही वाद झाला. खुशीच्या वादाचा व्हिडिओ आता समोर आला आहे, ज्यामध्ये ती रस्त्यावर फटाके फेकताना आणि वाद घालताना दिसत आहे.

मुंबईच्या स्थानिक माध्यमांनी पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये खुशी मुखर्जी एका फटाक्यांच्या दुकानात उभी राहून वाद घालताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये खुशी कारने धडक दिल्याबद्दल ओरडताना दिसत आहे. ती म्हणते, 'प्रत्येकाला दिवाळी साजरी करायची आहे, तो माझ्या कारला धडकून निघून गेला आणि तुम्हाला फटाके विकायचे आहेत.' व्हिडिओमध्ये, खुशीच्या गोंधळात, फटाके विक्रेता जवळ उभ्या असलेल्या एका माणसाला म्हणतो, 'तिला सांग, खूप जास्त होत आहे, तिला मारहाण होईल.' त्यानंतर अभिनेत्री ओरडते, ''त्याने माझ्या गाडीला धडक दिली आणि निघून गेला, हे सर्व येथे होते.' त्यानंतर विक्रेता उत्तर देतो, 'आम्ही तुमच्या गाडीचा ठेका घेतला आहे का?' घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याने वाद थांबवण्याचा प्रयत्न केला, परंतु अभिनेत्री संतापली आणि ओरडली, 'हे लोक जे काही करतात ते मान्य आहे. रिक्षाचालकाने माझ्या गाडीला धडक दिली, आणि तुम्ही १०० वर फोन करण्याचीही तसदी घेत नाही. माझ्या गाडीला का धडक दिली?' असे म्हणत खुशीने दुकानातील फटाके उचलले आणि रस्त्यावर फेकू लागली. विक्रेत्याने अभिनेत्रीला वारंवार त्याचे नुकसान करू नका असे सांगितले, परंतु अभिनेत्री गोंधळ घालत राहिली. सध्या या प्रकरणात कोणतीही कायदेशीर कारवाई झालेली नाही.



## दैनिक महाभूमि शब्दसंगम 778



**-: आडवी विधाने :-**

1) हट्टाने श्रीरामाला वनवासात पाठविल्यामुळे भरताने आपली आई कैकयीला उद्देशुन उच्चारलेले शब्द
5) महाराष्ट्रातील एक जुने सुप्रसिद्ध मराठी गायक व संगीतकार
10) अभिनेता
11) दिवसभर उपोषण करुन रात्री जेवण करण्याचे व्रत
12) अखंड लागलेले
13) मावळणे, लयास जाणे, शेवट
14) सौभाग्यवती स्त्री
15) अक्षराच्या डोक्यावरची तिरकस रेघ
16) अठराहून अधिक सर्ग असलेले एक महाकाव्य
17) हिमालय पर्वताचे विशेषण
20) गर्क, तल्लीन, कैफ चढलेला
21) आनंदाने अंगावर कांटा उभा राहील अशी स्थिती
23) आईचा भाऊ, मातुल
24) जवळचा नातेवाईक, सख्खा
26) यज्ञोपवित
28) डोंगरी किल्ला
29) एक शब्दालंकार
30) भरपूर, असंख्य
32) पत्रा कापतांना मध्यबिंदू काढण्याचे उपकरण
33) साठी, करीता
34) चोवीस कागदांचा एक दस्ता याप्रमाणे वीस दस्त्यांचे पुडके
36) शंभर घोडेस्वारांची टोळी, चमू
40) स्वरसम्राज्ञी लतादीदींनी सुरवातीच्या काळात या टोपणनावाने काही चित्रपटांना संगीत दिले होते.
43) थंडपणा, गारठा
44) लग्नाच्या दिवशी वधूद्वारे शिवपार्वतीची करण्यात येणारी पूजा
46) साडी किवा पातळाचा शेवटचा भाग
47) पति, यजमान
49) वाईट सवय, खोड
50) एक संख्या
51) वायू, शरीरातील त्रिदोषांपैकी एक
52) वरदान, नवरदेव
54) अस्सल, विशेष, मुद्दाम योजिलेले
55) सीतेचा पति
57) चांगले वळणशुद्ध सुवाच्य अक्षर, चक्राकार
61) नुकतेच लग्न झालेली मुलगी
62) कल्याण, हित, कुशल
64) बोधपर सूत्रवचन (वाक्य)
67) शुद्ध, निर्मळ, पुण्यप्रद
69) कुमार ......, हिंदी चित्रपटसृष्टीतील एक गायक
70) महाभारतातील पांडवांपैकी एक
71) नाव चालविणारा, नौका चालक
73) उत्तराधिकारी
74) एखाद्याची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी वकिलाला दिलेले अधिकार पत्र
76) बकरी
77) वतनाचा उपभोग घेणारा जमीनदार
79) जल, पाणी
80) एक वृक्ष विशेष
81) जहर
82) नाटक किंवा कार्यक्रमाचे सूत्र संचालन करणारा

**-: उभी विधाने :-**

1) मनातील भाव, विचार
2) फुलांचा वाफा, तक्ता
3) महाराष्ट्रातून वाहणारी एक नदी
4) रिकामा
5) रामायणात लक्ष्मणाची आई
6) आनंदाचा विरस होणे, हिरमोड
7) फळ, शेवट, परिणाम
8) अस्थिर अवस्था
9) राहणे, वास करणे
13) अयोग्य काळी झालेले
15) कैफ, अहंकार, गर्व
17) डोके झुकवून नमस्कार करणे
18) शांत, सुस्त, मंद
19) एक सुप्रसिद्ध महाकाव्य
20) मुका (हिंदी)
21) रोगाने सदैव पिडलेला
22) लग्न समारंभात वधूपक्षाकडून वरपक्षाला दिलेली मेजवानी
24) चांगले, पौष्टिक
25) विष्णुपत्नी
27) खुळा, भ्रमिष्ट, वेड लागलेला
30) खुप सारा आनंद
31) वर्तुळाची मर्यादा दाखविणारी वक्ररेषा
35) मनातल्या मनात केलेले चिंतन, अभ्यास
37) पक्ष्यांचा जमाव
38) शत्रु, गनीम
39) श्रीरामांचा एक भाऊ
40) विपदा, संकट
41) उग्र वास
42) शोभिवंत दिसण्यासारखी केलेली आकर्षक रचना
43) कपोल
44) बुद्धदेवांचे नाव
45) वातावरणाची स्थिती
48) मालाचे गोदाम
50) जमिनीवरील महसूल
53) रणभूमी, युद्धक्षेत्र
56) विशेष उल्लेखनीय गोष्ट
58) पैसा, मूल्य, किमत
59) आरशासारखे चकचकीत संगमरवरी दगड
60) मोराच्या पिसांची उंच टोपी घालून भिक्षा मागणारी एक जात
63) दुसरा करेल त्याप्रमाणे करण्याचा प्रयत्न करणे
65) नात्यागोत्यातील मंडळी, बंधुत्व
66) सत्यानाश, कुलक्षय, निर्वंश
68) पौराणिक कालीन सप्तर्षीपैकी एक ब्रह्मर्षी
69) विद्येची देवी
72) फुलाची पूर्वस्थिती
73) दिवस
75) रामायणात श्रीरामचंद्रांचा एक मुलगा
78) श्रीकृष्णाची सखी (उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भू | दा | न | च | ळ | व | ळ | | स | र | ह | द्द | गां | धी | | कं |
| त | | ज | | | र्ण | | द | म | | ज | | डी | | स | गा |
| द | स्तु | र | खु | द | | रा | मा | य | ण | | क | व | डी | मो | ल |
| या | | बा | ज | | पा | म | | सु | | पा | व | | | र | |
| | ल | ग | ट | | व | ग | | च | विं | त | च | र्व | ण | | शु |
| नी | ला | | | फु | टा | णे | | क | | की | | | | ए | क |
| | म | सु | री | | | श | क्य | ता | | | वा | सं | ति | क | |
| अ | भू | त | पु | र्व | | ग | | | ल | वा | द | | जा | त | क |
| ग | त | क्र | | | ग | ड | गं | ज | | क | वि | ता | | फी | |
| ड | | डी | | | | क | | मा | या | | वा | | म | | झी |
| बं | क | | म | त्ते | दा | री | | ल | | बा | द | रा | य | ण | |
| ब | र | खा | स्त | | बे | | अ | गो | च | र | | म | स | | सा |
| | स्था | प | क | | दा | वा | | टा | र | ग | ट | | भा | वा | र्थ |
| प | नी | र | | भा | र | द | स्त | | खा | ळ | | अ | | ट | क |
| र | | | आ | र | | ग्र | | प | | णे | | न | | स | |
| शु | क्रा | चा | र्य | | म | स्त | क | शु | ळ | | ती | र्थ | स्व | रु | प |

uday munde - 8446302691

# सिद्धार्थ जाधवचा धडकी भरवणारा लूक



चित्रपट अभिनेते तथा दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या पुन्हा शिवाजीराजे भोसले या नव्या चित्रपटाची सिनेरसिकांना मोठी प्रतिक्षा आहे. या चित्रपटाचे एक पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले. त्यात अभिनेता सिद्धार्थ जाधव याचा लूक अक्षरशः धडकी भरवणारा आहे.

सिद्धार्थ जाधवच्या वाढदिवसानिमित्त पुन्हा शिवाजीराजे भोसले या चित्रपटाचे पोस्टर लॉन्च करून त्यातील सिद्धार्थचा लूक समोर आणण्यात आला. या लूकमध्ये सिद्धार्थ जाधव हा आपल्या नेहमीच्या लूकपेक्षा फार वेगळा दिसून येत आहे. चेहऱ्यावर रक्त, जखमांचे व्रण, उरात धडकी भरवणारी नजर आणि नजरेत दडलेले क्रौर्य आदी गोष्टी सिद्धार्थच्या या नव्या लूकमध्ये दिसून येत आहेत. त्याच्या या लूकमुळे त्याची या चित्रपटात नेमकी कोणती भूमिका असेल? याविषयी सिनेरसिकांच्या मनात उत्कंठा निर्माण झाली आहे.

सिद्धार्थ जाधव आपल्या या चित्रपटातील भूमिकेविषयी सांगतो, पुन्हा शिवाजीराजे भोसले या चित्रपटातील माझी भूमिका माझ्या आजवरच्या कारकिर्दीमधील सर्वात वेगळी आहे. या पात्रात एक वेगळीच क्रूरता आहे. ती त्याच्या लूकमध्ये उतरणे गरजेचे होते. माझ्या लूकचे संपूर्ण श्रेय महेश मांजरेकरांचे आहे. त्यांनी मला माझा एक फोटो पाठवायला सांगितला. त्यानंतर त्यांनी त्यावर काम करून माझा हा लूक तयार केला. जेव्हा हा लूक माझ्याकडे आला, तेव्हा मी स्वतःच थक्क झालो. मी असाही दिसू शकतो? असा प्रश्न मला पडला. अशा प्रकारची भूमिका मी यापूर्वी कधीच साकारली नव्हती.

# अकोला भूमि

शुक्रवार । २४ ऑक्टोबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### १८ प्रकल्पांतून पाण्याचा विसर्ग

**अकोला :** यंदा पश्चिम विदर्भात समाधानकारक व मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे या भागातील २८९ मोठे, मध्यम आणि लघु सिंचन प्रकल्प तुडूंब भरले आहेत. सोमवार २० ऑक्टोबरपर्यंतच्या अहवालानुसार, एकूण जलसाठा ९४.४९ टक्के इतका झाला असून, २० मोठ्या व मध्यम प्रकल्पातून विसर्ग सुरू आहे. अकोला जिल्ह्यातील १८ प्रकल्पातून विसर्ग सुरू आहे. १ मध्यम प्रकल्पामध्ये अकोला जिल्ह्यातील निगुर्णा मध्यम प्रकल्पात १०० टक्के साठा असून, पूर उंची १ से.मी. विसर्ग ०.९०६ क्यूमेक होता. मोर्णा प्रकल्पात १०० टक्के जलसाठा असून, पूर उंची २ से.मी. विसर्ग ०.६८ क्यूमेक सुरू आहे. उमा प्रकल्पात १०० टक्के जलसाठा असन पर उंची ४ सेमी विसर्ग ५.६० क्युमेक होता. घुंगशी प्रकल्पाचे १ एक गेट १० से. मी. विसर्ग ९.३९ क्यूमेक होता.

### तांत्रीक बिघाडामूळे पॉस मशीन बंद

**अकोला:** जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील रेशन दुकानांमध्ये शासनाने रेशन वितरण सुलभ व्हावे म्हणून पॉस मशिन बसवल्या आहेत; मात्र ऑक्टोबर महिन्यात तांत्रिक अधिकाऱ्यांनी मशिनचे सेन्सर बदलल्यानंतर यामध्ये गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. सेन्सर बदलल्यानंतर मशिनची कार्यक्षमता कमी झाली असून, कार्डधारकांचे अंगठ्याचे ठसे वारंवार घेतले तरी ते स्वीकारले जात नाहीत. काही ठिकाणी ओटीपी येत नाही, तर काही ठिकाणी आय स्कॅन (डोळा ओळख) प्रणाली कार्यरत नाही. परिणामी, रेशन वितरणाची प्रक्रिया अत्यंत धिम्या गतीने सुरू आहे.

### तहसील स्तरावरून शेतकऱ्यांच्या पोर्टलवर याद्या अपलोड

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना संदेश; दिवाळीच्या दिवशी मदतनिधी जमा

**अकोला / प्रतिनिधी**



ऑक्टोबर खरीप हंगामात ऑगस्ट महिन्यात १.६ लाख हेक्टरवर झालेल्या नुकसानीपोटी ९१.१२ कोटी तर सप्टेंबरसाठी १८६ कोटी रूपये मंजूर झाले आहेत. संबंधित शेतकऱ्यांच्या याद्या पोर्टलवर अपलोड करण्याची कार्यवाही सुरु असून दिवाळीच्या दिवशी नुकसानग्रस्तांना मदतीचे संदेश प्राप्त झाले आहेत. तीन हेक्टरच्या मर्यादेत रक्कम मिळत असून अपेक्षेपेक्षा मदत निधी कमी आल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

यंदा खरीप हंगामात पेरणीपासूनच पिकांची वाट लागली. याचा उत्पादनावर परिणाम झाला. सततचा पाऊस सप्टेंबर अखेर झाल्याने पिकांची प्रचंड हानी झाली.

शेतकऱ्यांना याची मदत मिळावी यासाठी राज्य शासनाने पॅकेज जाहीर केले. या मध्ये कृषी वीज देयक, महसुलात सूट, विद्यार्थ्यांना फी माफी अशा सवलती जारी केल्या. त्यानुसार शासनाकडून ऑगस्ट व सप्टेंबर महिन्याची मदत जाहीर केली. त्यानुसार शेतकऱ्यांच्या खात्यात मंगळवारपासून मदत जमा होणे सुरू झाले आहे. त्यामुळे काहीअंशी शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

#### ऑगस्टमधील नुकसानीपोटी हवेत ५ कोटी

■ शासनाने पॅकेजमध्ये जाहीर केलेल्या ३ हेक्टरपर्यंतच्या मर्यादेत मदतीसाठी ऑगस्ट महिन्यातील नुकसानीची माहिती संकलित करण्यात आली आहे. यापूर्वी २ हेक्टरपर्यंतची मदत देण्यात आली. आता एक हेक्टरपर्यंतच्या वाढीव मदतीसाठी ४ कोटी ९३ हवे असून, याबाबतचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला आहे. ही मदत ५ हजार ५७७ हेक्टरसाठी देण्यात येणार आहे.

#### १० हजारांच्या मदतीची प्रतीक्षा

■ राज्य सरकारकडून पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या पॅकेजनुसार जिल्ह्यातील रब्बीसाठी प्रस्तावित असलेल्या सुमारे १ लाख २५ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणीसाठी प्रती हेक्टरी १० हजार अतिरिक्त मदत मिळणार आहे. याबाबतची कार्यवाही कृषी विभाग करणार आहे. मात्र अद्याप निधी व वाटपाचे संदर्भात शासनाकडून मार्गदर्शन आले नसल्याची माहिती कृषी विभागातील सूत्रांनी दिली आहे.

## अथर्व, दर्शन, आदित्य व गणेश विदर्भ रणजी संघात

**अकोला / प्रतिनिधी**





जामठा, नागपूर येथे २५ ते २८ ऑक्टोबर या कालवधीत झारखंड विरुद्ध विदर्भ संघ यांच्यात होणाऱ्या रणजी ट्रॉफीकरिता अकोला क्रिकेट क्लबचे अथर्व तायडे, दर्शन नळकांडे, आदित्य ठाकरे व गणेश भोसले यांची विदर्भ क्रिकेट संघात निवड झाली आहे.

अथर्व तायडे हा सलामीला खेळणारा डावखुरा शैलीदार फलंदाज असून, यापूर्वी त्याने १६, १९, २३ वर्षाखालील विदर्भ व मध्य विभाग संघाचे, १९ वर्षाखालील भारतीय संघाचे, रणजी ट्रॉफी व भारतात सर्वात प्रतिष्ठीत असणारी इराणी ट्रॉफी संघाचे प्रतिनिधित्व केले. गत तीन वर्षापासून आयपीएल स्पर्धेत तो सनराईज हैदराबाद संघाचे प्रतिनिधित्व करीत आहे. दर्शन नळकांडे हा मध्यमगती गोलंदाज व आक्रमक फलंदाज असून, यापूर्वी त्याने १६, १९, २३ वर्षाखालील विदर्भ व मध्य विभाग संघाचे, १९ वर्षाखालील भारतीय संघाचे, रणजी ट्रॉफी संघासह गत आठ वर्षापासून आयपीएल स्पर्धेत दिल्ली कॅपिटल संघाचे प्रतिनिधित्व करीत आहे.

शैलीदार मध्यमगती गोलंदाज आदित्य ठाकरे याने यापूर्वी १६, १९, २३ स्पर्धेत विदर्भ तथा मध्यविभाग संघाचे, १९ वर्षीय भारतीय संघाकडून आशिया कप, न्यूझीलंड येथे झालेल्या १९ वर्षीय विश्व चषक स्पर्धेत भारतीय संघाचे, इराणी ट्रॉफी व रणजी ट्रॉफीचे प्रतिनिधित्व करीत आहे. गणेश भोसले हा उत्कृष्ट फिरकी गोलंदाज असून, यापूर्वी त्याने १६ व १९ वर्षाखालील विदर्भ संघाचे, १६ वर्षाखालील मध्य विभागाचे संघाचे व विजय हजारे ट्रॉफीचे प्रतिनिधित्व केले आहे.

## बाबूजी देशमुख वाचनालयात प्रदर्शन

### वाचकांसाठी दिवाळी अंकाची विशेष भेट

**अकोला / प्रतिनिधी**

येथील सर्वात जुन्या अशा बाबूजी देशमुख वाचनालयात दीपावली निमित आयोजित दिवाळी अंक ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन एसडीओ डॉ. शरद जावळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. वाचनालयाचे सचिव अनुराग मिश्र, सदस्य विनोद अग्रवाल, प्रवीण वाणी, बबनराव कानकिरड, प्रमोद रत्नपारखी यांची प्रमुख उपस्थिती होती. आपण बाल कुमारांना वाचनासाठी प्रवृत्त केले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तकांच्या ठिकाणी इंटरनेटकडे प्रवाह वाढतो आहे. विद्यार्थी मोबाईलचा वापर करतात. पण वाचनाचे स्थान अढळ आहे, असे प्रतिपादन खरे यांनी केले.

मानसिक समाधान पुस्तक वाचनात असल्याचे प्रतिपादन डॉ. शरद जावळे स्वातंत्र्यापूर्वी या वाचनालयाची स्थापना झाली. चोखंदळ वाचकांसाठी ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून अभिजात मराठी ग्रंथ संपदा बाबूजी देशमुख वाचनालय सातत्याने उपलब्ध करून देत असल्याचे प्रतिपादन महादेवराव भुईभार यांनी अध्यक्षीय भाषणातून केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. मोहन खडसे यांनी केले. शालेय, महाविधालय, स्पर्धा परीक्षेचे विधार्थी, वाचक मोठ्या संख्येत उपस्थित होते. ग्रंथपाल सुरेश टेके, सतीश डगवले, जुगल शिरसाट, नितीन कदम, स्वप्निल ताथोड, सुनील मिश्रा यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी सहभाग घेतला.

## भाउबिजेला चिमुकल्याने दिले मोठ्या भावाला जीवदान

**अकोला / प्रतिनिधी**

दिवाळीतील भाऊबीज हा भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा सण. भाऊ बहिणीच्या प्रेम, त्याग व समर्पणाच्या अनेक कथा, प्रसंग समोर येतात. अकोल्यात मात्र दोन भावांमधील अतूट प्रेमातून लहान्याने मोठ्याला कर्करोगाच्या संकटातून बाहेर काढत नवजीवन दिले.

शहरातील १६ वर्षीय मुलाने रक्ताच्या कर्करोगाशी लढा दिला. त्याच्यावर बोन मॅरो प्रत्यारोपण करणे आवश्यक होते. या संकटाच्या काळात १२ वर्षीय लहान भावाने आपल्या मोठ्या भावाला 'स्टेम सेल्स दान करून त्याचे प्राण वाचवले. मोठ्या भावाचा जीव वाचवण्यासाठी लहान भावाने उचललेले पाऊल कौतुकास्पद व आदर्श ठरले आहे. दोन भावांमधील नाते हे प्रेम, स्नेह, विश्वास आणि आपुलकीवर आधारित असते. हे नाते एकमेकांना आधार देणारे, सांभाळणारे आणि जीवनातील सुख- दुःख वाटून घेणारे असते. अकोल्यातील एका लहान भावाने आपल्या मोठ्या भावाचा जीव वाचवण्याचे प्रेरणादायी कार्य केले. हा १६ वर्षीय मुलगा आपल्या आई-वडिलांसह आणि १२ वर्षीय लहान भावासोबत अकोला येथे राहतो. वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. काही महिन्यांपासून जीवन सतत आजारी पडत होता.

सुरुवातीला स्थानिक रुग्णालयात उपचार करूनही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्याला पुढील तपासणीसाठी मोठ्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तिथे रक्त तपासणीतून जीवनला रक्ताचा कर्करोग असल्याचे निदान झाले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारासाठी बोन मॅरो प्रत्यारोपणाचा सल्ला दिला.

#### विविध स्त्रोतांतून मदतीचा हात

■ मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून, टाटा ट्रस्टच्या मोठ्या योगदानातून तसेच काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने एकूण २५ लाखांची मदत उभी करण्यात आली. जीवनच्या १२ वर्षीय लहान भावाने अस्थिमज्ञा (स्टेम सेल्स) दान केले आणि त्यानंतर जसलोक रुग्णालयात जीवनवर यशस्वी बोन मॅरो प्रत्यारोपन करण्यात आले.



## न्यूज ब्रीफ

### महिलेच्या पर्समधून सव्वा तीन लाखांचे दागिने लंपास

**मलकापूर :** बसमधून भाऊबीजेसाठी मुलांसह माहेरी जाणाऱ्या महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्याने सव्वा तीन लाखांचे दागिने लंपास केल्याची घटना २२ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली. मलकापूर शहरातील हनुमान नगरात राहणाऱ्या स्वाती विकास संभारे ह्या आशा सेविका म्हणून कार्यरत असून त्या २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ०६.१५ वाजेच्या सुमारास दोन मुलांसह मुर्ती ता. मोताळा जि. बुलडाणा येथे भाऊबीज करीता बस स्थानक मलकापूर येथून जळगाव ते मेहकर या बस मध्ये बसल्या. बस स्थानक मलकापूर येथून बस निघाल्यानंतर तिकीटाचे पैसे काढण्याकरीता त्यांनी पर्स मध्ये हात घातला असता पर्स मध्ये ठेवलेले एकुण ३,१५,६३२ रुपयाचे सोन्याचे दागिने दिसून आले नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेवून त्यांच्या पर्समधून दागिने लंपास केल्याचे त्यांच्या लक्षात आले. याप्रकरणी त्यांनी मलकापूर शहर पोलिसांत तक्रार नोदविली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला असून याप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

### जिल्हा परिषद शाळेत दीपोत्सव साजरा

**शेगाव :** बोंडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत पारंपरिक उत्साहात व सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवणारा दीपोत्सव आनंदोत्सवाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शाळा परिसर दिव्यांच्या मिणमिणत्या प्रकाशाने उजळून निघाला होता. तर विद्यार्थ्यांनी साकारलेल्या आकर्षक रांगोळ्यांनी परिसराला सौंदर्य आणि संस्कृतीचा संगम प्राप्त करून दिला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना शेगाव तालुका प्रमुख रामा थारकर, शाळा समिती अध्यक्ष प्रवीण इलामे तसेच समाजातील प्रतिष्ठित नागरिक विनायक इलामे, दत्ता इलामे, अजय अंदुरकर, वंदना इलामे, मनोरमा थारकर आणि संगीता अंदुरकर उपस्थित होते. ग्रामस्थ आणि पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाला प्रोत्साहन दिले. दीपोत्सव कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक सादरीकरण, गाणी आणि कवितांच्या माध्यमातून दिवाळीचा संदेश मांडला. अंधारातून प्रकाशाकडे हा आशय घेऊन साजऱ्या झालेल्या या सोहळ्याने शाळेतील बालकांना एकात्मता संस्कार आणि आनंदाचा अनोखा अनुभव दिला.

सेवेसाठी श्री संस्थानचे सुसज्ज नियोजन

# दिवाळीच्या सलग सुट्ट्यांमुळे भाविकांची संतनगरीमध्ये मांदियाळी

**शेगाव/प्रतिनिधी**



दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे संतनगरी शेगावमध्ये भाविक भक्तांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. हजारो भाविक 'श्रीं'च्या समाधीचे मनोभावे दर्शन घेत आहे.

दिवाळीनंतर आलेल्या सलग सुट्ट्यांमुळे मुंबई, पुणे, नागपूर, जळगाव खान्देश, नाशिकसह इतर राज्यभरातील विविध ठिकाणचे भाविक श्रींच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून येत आहेत. भाविकांच्या गर्दीमुळे मंदिर परिसरात व शहराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. जवळपास दिवाळीच्या सुट्ट्या संपेपर्यंत २ नोव्हेंबर पर्यंत लाखो भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणावर संतनगरी शेगाव येथे मांदियाळी राहणार आहे. भक्तांच्या गर्दीने शहरातील मंदिराकडे जाणारे सर्व रस्ते फुलून गेले आहेत. 'श्रीं'च्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्तांना श्रींच्या दर्शनासाठी किमान दोन ते तीन तास दर्शन बारी मध्ये उभे राहावे लागत आहे. 'गण गण गणात बोते' मंत्राचा नाम जप करत मनोभावे भाविक दर्शन घेत आहेत. तर श्रीमुख दर्शनासाठी ३० मिनिटे वेळ लागत आहे. शाळा, कॉलेज यांना दिवाळी सुट्टी असल्याने या दिवसात तब्बल लाखाच्या वर भाविक 'श्रीं'चे दर्शन घेणार असल्याचा अनुमान लावला जात आहे.

गुरूवार २३ ऑक्टोबर रोजी हजारो भाविक 'श्रीं'च्या दर्शनासाठी शेगावमध्ये दाखल झाले आहेत. या सुट्यामध्ये शेगावला येणाऱ्या भक्तांचा ओघ लक्षात घेता श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने भाविकांच्या दर्शनाची आणि महाप्रसाद तसेच निवासाची चोख व्यवस्था केली असून त्याच बरोबर भक्तांच्या सुरक्षेचीही काळजी घेतली जात आहे. दररोज हजारो भाविक रेल्वे बस तसेच खाजगी वाहनांनी संतनगरी शेगावात दाखल होत असून. 'श्रीं'च्या मंदिरात जाऊन समाधीचे मनोभावे दर्शन घेत आहेत. त्यानंतर मंदिराचे आनंद सागर अध्यात्मिक केंद्र यासह शहरातील इतर धार्मिक स्थळी तसेच जवळच असलेल्या नागझरी येथील श्री.गोमाजी महाराज संस्थानमध्ये सुध्दा भाविक दर्शनासाठी जातांना दिसून येत आहेत.

#### व्यवसायीकांना दिलासा

दिवाळीच्या सुट्ट्यामध्ये भाविकांची गर्दी वाढली असून शेगावातील व्यवसायीकांना मोठा दिलासा मिळत आहे. शहरातील वाढलेल्या गर्दीने फुलांचे हार विक्री करणारे, पेढा विक्री करणारे याचप्रमाणे इतर लहानसहान वस्तू कुंकू, गुलाल, अष्टगंध विक्रेत्यांची चांगली विक्री होत आहे. गेल्या दोन दिवसांपासून राज्यभरातील विविध भागातून भाविक संतनगरी शेगावात हजेरी लावत आहेत. भक्तांच्या गर्दीमुळे संतनगरीतील हॉटेल, रेस्टॉरंट, गेस्ट हाऊस विविध वस्तू व साहित्य विक्रीच्या व्यवसायिकांसह ऑटोरिक्षा चालक, खाद्यविक्रेते, किरकोळ व्यावसायिक अशा सर्वांनाच सद्या सुगीचे दिवस आले आहेत. श्री संस्थांनचे पार्किंगमध्ये मोठ्या प्रमाणावर भाविकांची वाहने शिस्तबद्ध पध्दतीने उभी असल्याचे दिसून येत आहे. तर मंदिर परिसरात व खाजगी पार्किंग सुद्धा हाऊस फुल झाले आहे.

#### भक्तांचे माहेर घर झाले शेगाव

शेगाव या तीर्थक्षेत्र स्थळी भक्तांना आपल्या माहेरी आल्याचा अनुभव पदोपदी येताना दिसून येत आहे. संस्थानकडून श्रींच्या समाधी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण व्यवस्था केली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवासामध्ये नियमानुसार व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू आहे. संपूर्ण मंदिर परिसरात स्वच्छता ही भक्तांना श्रींच्या प्रति आपली आस्था प्रसन्न मनाने एकरूप करणारी आहे. भक्तांना कोणताही त्रास होवू नये, यास्तव श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर आहेत. श्रींच्या भाविक भक्तांसाठी सर्वतोपरी सोयीसुविधा श्री संस्थानच्या वतीने पुरविल्या जात आहेत.

## भरधाव कारची मालवाहू वाहनाला धडक

चार जण जखमी ; दोन्ही वाहनाचे नुकसान



**शेगाव/प्रतिनिधी**

दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या कारने मालवाहू वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी दुपारी खामगाव-शेगाव मार्गावरील माऊली वाटर पार्क जवळ घडली. या अपघातात कार व मालवाहू वाहनामधील चार जण जखमी झाले असून दोन्ही वाहनाचे प्रचंड नुकसान झाले आहे.

शेगाव येथे दर्शनासाठी आलेल्या कार क्रमांक एमएच १५ जीआर १७९० ने २३ ऑक्टोबर रोजी दुपारी खामगाव शेगाव मार्गावरील माऊली वॉटर पार्क जवळ शेगावच्या दिशेने जाणाऱ्या मालवाहू वाहन क्रमांक एमएच १९ सीवाय ८४६२ ला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये कारमधील तीन प्रवासी तसेच मालवाहू वाहनाचा चालक गंभीर स्वरूपाने जखमी झाले आहे. अपघाताची माहिती मिळताच शेगाव ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजूला केली. सदर अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून वृत्तलिहेपर्यंत पोलिसांची कारवाई सुरू होती.

## चार वर्षांपासून वीज जोडणीची प्रतीक्षा

किसान कॉँग्रेस कार्याध्यक्ष कैलास साबे यांचा आत्मदहनाचा इशारा

**खामगाव/प्रतिनिधी**




चिखली, सुजतपुरी व आमसरी येथील शेतकऱ्यांनी शेतात विज कनेक्शन मिळण्याबाबत अर्ज करून चार वर्ष लोटली तरी महावितरणकडून टाळाटाळ केली जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असून पिकांचे नुकसान होत आहे. याकडे महावितरण विभागाने लक्ष देवून ७ दिवसांच्या आत वीज कनेक्शन द्यावे अन्यथा सब स्टेशन समोर आत्मदहन करण्याचा इशारा किसान काँग्रेस खामगाव कार्याध्यक्ष कैलास साबे व शेतकऱ्यांनी दिला आहे.

यासंदर्भात महावितरण कार्यालय नांदुराचे कार्यकारी अभियंता यांना १८ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनामध्ये नमूद आहे की, मौजे चिखली, सुजातपुर व आमसरी येथील शेतात मागील ३ - ४ वर्षापासून वीज कनेक्शन दिलेले नाही. दरम्यान १०१६ मध्ये श्रीकृष्ण दामोदर यांनी आपल्या कार्यालयात वीज कनेक्शन मिळणेबाबत अर्ज केला होता, परंतु चार वर्षे लोटूनही अद्यापपर्यंत सदर शेतात वीज जोडणी करण्यात आली नाही.

त्यामुळे शेतकऱ्यांना नाह त्रास सहन करावा लागत आहे. तसेच पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी होत आहे. याबाबत प्रशासकीय अधिकारी नांदुरा यांची भेट घेतली असता त्यांच्याकडून उडवा उडवीची उत्तरे दिली जातात. या प्रकरणात आमच्या वीज जोडणीसाठी लागणारे तार व पोल उपलब्ध नाही असे म्हणून टाटाटाळ केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या निवेदनावर किसान काँग्रेस खामगाव कार्याध्यक्ष कैलास साबे, भगवान बावस्कार, श्रीकृष्ण दामोदर यांच्यासह शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पीड़ित कुष्ठरोगी सोबत दिवाळी साजरी

**मलकापूर :** शांतीवन कुष्ठरोग आश्रम चावरदा तालुका मोताळा येथे दिवाळी उत्सव निमित्त विश्व हिंदू परिषद सेवा विभाग द्वारा भेट देऊन तेथील कृष्ठरोगी बंधू भगिनी यांना दिवाळीचे फराळ ७ दिवस पुरेल इतके देण्यात आले तसेच त्यांचे करिता भोजनचे आयोजन करण्यात आले.

कुष्ठरोगी कडे समाजाचा तसेच त्यांचा परिवाराचा दृष्टिकोन वेगळा असतो. कृष्ठरोगमुळे त्यांना दैनंदिन जीवनातील कार्य करण्यात त्यांना खूप अडचणी येतात आणि असह्य पीडा सहन कराव्या लागतात. परिवारातील लोकांची अशा वेळेस त्यांना साथ सहकार्य हवे असते पण तेही त्यांना दूर करतात आणि ते अशा परिस्थितीत जीवनाशी संघर्ष करून जीवन व्यतीत करत असतात अशा लोकांकरिता दिवाळी उत्सव निमित्त काही क्षण आनंदाचे त्यांच्या जीवनात निर्माण व्हावे, याकरिता विश्व हिंदू परिषदचे कार्यकर्ता आश्रमात पोचून त्यांना दिवाळीचे फराळ देण्यात आले.

## प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात दिवाळी साजरी

**खामगाव/प्रतिनिधी**

स्थानिक ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय रायगड कॉलनी खामगाव येथे २१ ऑक्टोबर रोजी सकाळी दिवाळी सण साजरा करण्यात आला.

यावेळी दिवाळीचे आध्यात्मिक रहस्य सांगतांना सेवाकेंद्र संचालिका शकुंतलादीदी म्हणाल्या की, निराकार शिव परमात्मा धरतीवर अवतरीत होवून सतयुगाची स्थापना करीत आहेत. आपण सर्व शरीराला चालवणारी एक चेतनशक्ती आत्मा आहोत. स्वतःला आत्मा समजून शरीराव्दारे कर्म करणे, आत्मज्योत जागृत करणे म्हणजेच खरी दिवाळी साजरी करणे असल्याचे सांगून निराकार शिव परमात्मा सर्व शक्तींचा स्त्रोत आहे. आपली मने आणि बुध्दीची तार परमात्म्याशी जोडणे म्हणजेच राजयोग आहे. राजयोगाच्या नित्य अभ्यासाने जीवनात दैवी गुणांची धारणा होते. आपल्यातील मनोविकारांवर विजय मिळवता येते. भविष्यात स्वर्णीम युग



धरतीवर येणार असल्याचा संदेश देण्यासाठी स्वर्णीम युगाचा देखावा सादर केल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी ब्रह्माकुमारीच्यावतीने भविष्यात स्वर्णिम युग धरतीवर येणार असल्याचा संदेश देणारा देखावा सादर करण्यात आला. या देखाव्यात 'राधा' च्या भूमिकेत परी वाघमारे, 'कृष्णा' च्या भूमिकेत योगेश कुमठे, 'लक्ष्मी' च्या भूमिकेत ऋतीका निकम, 'नारायणा' च्या भूमिकेत ईश्वरी राखोंडे यांनी वेशभूषा साकारल्या होत्या. यावेळी ॲड. अमोल अंधारे यांच्याहस्ते लक्ष्मीपूजन व आरती करण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा प्रदान करणारे कार्ड व प्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ब्रह्माकुमारी परिवारातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मेघा अग्रवाल व आभारप्रदर्शन ब्रह्माकुमारी सुषमादीदी यांनी केले.

## भरधाव ऑटो बैलगाडीवर धडकल्याने १६ वर्षीय युवक ठार

**जलंब/प्रतिनिधी**

भरधाव ऑटो बैलगाडीवर धडकल्याने १६ वर्षीय युवक ठार झाला तर दोन जण जखमी झाले. ही घटना २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास जलंब ते खामगाव रस्त्यावर घडली.

माटरगाव (ता. शेगाव) येथील रहिवासी शेख परवेज उर्फ पप्पू शेख महेबुब हा त्याच्या एम.एच. २७-२८१८ क्रमांकाच्या ऑटोने जलंबकडे जात होता. दरम्यान, त्याने वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवित बैलगाडीला जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोत बसलेला रहीम उर्फ गोल्या (१६) रा. माटरगाव हा युवक गंभीर जखमी झाला होता. उपचाराआधीच त्याचा मृत्यू झाला. तर शेख फयुम व नरवाडे हे दोघे जखमी झाले असून बैलगाडीचेही नुकसान झाले आहे. या घटनेनंतर माटरगाव व परिसरात शोककळा पसरली आहे. याबाबतची फिर्याद शेख हरुण शेख मेहबुब रा. माटरगाव यांनी जलंब पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी ऑटोचालक शेख परवेज उर्फ पप्पू शेख महेबुब याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार अमोल सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकाँ नन्हेखाँ तडवी करीत आहेत.

## 'आरोग्य धनसंपदा नित्ययोग' वर्गाचा वर्धापन दिन उत्साहात

**शेगाव/प्रतिनिधी**

आरोग्य धनसंपदा नित्ययोग वर्गाचा स्थापना दिवस राजेश्वर कॉलनी येथे २० ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चतुर्भुज मिटकरी यांनी भूषवले. प्रमुख उपस्थितीत निळकंठ साबळे, प्रल्हाद सुलताने, मधुकर बघे, सेवकराम कड, हास्यकवी नितीन वरणकार, दिलीप गोहेल, अनिता तायडे, प्रा. डॉ. विलास डेहनकर, राजकुमारी भट्टड, दिलीप इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक प्रल्हाद सुलताने यांनी केले. राजकुमारी भट्टड, अर्चना शेळके, वंदना शेगावकर, सविता इंदोरे आणि बोरसे यांनी वनिता तायडे यांचा सत्कार केला. हास्यकवी नितीन वरणकार यांना श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आपेगाव यांच्या वतीने जाहीर झालेल्या जीवन गौरव पुरस्काराबद्दल कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विठ्ठल मिरगे यांनी केले.

## गुंजकर परिवाराची आदिवासी बांधवांसोबत दिवाळी

**खामगाव/प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणारे प्राध्यापक रामकृष्ण गुंजकर यांच्या गुंजकर एज्युकेशन हब सामाजिक कार्यात देखील अग्रणी असते. आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करत गुंजकर परिवार गेल्या १५ वर्षांपासून अखंड सामाजिक भान जपत आहे. या वर्षी देखील गुंजकर परिवाराने सलाईबन येथे आदिवासी बांधवांना दिवाळी निमित्त कपडे व फराळ वाटप करून आगळी वेगळी दिवाळी साजरी केली.

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा गुंजकर एज्युकेशन हबचे अध्यक्ष प्राध्यापक रामकृष्ण गुंजकर आणि सचिव सुरेखा गुंजकर हे सतत १५ वर्षांपासून सालईबन येथे आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करत असतात. २० ऑक्टोबर रोजी गुंजकर परिवाराने आदिवासी बांधवांना निमित्त कपडे व फराळ वाटप करून दिवाळी साजरी केली

भाजपाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत आगामी निवडणुकीबाबत आढावा

# पक्ष मजबूत करा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता काबीज करा : ना. फुंडकर

**नांदुरा/प्रतिनिधी**




आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल केव्हांही वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागून पक्ष मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करून भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी सज्ज राहावे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले.

स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शिक्षक मतदारसंघ निवडणुकांच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाची जिल्हास्तरीय कार्यशाळा नांदुरा येथील स्व. हरिभाऊ पांडव मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी ते उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख होते. व्यासपीठावर राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार चैनसुख संचेती, प्रदेश सदस्य गुणवंत कापले, डॉ. गणेश दातीर, बलदेव चोपडे, मोहन शर्मा, राजेश पाटील, भाऊराव पाटील, कल्पना मसने, अनिता देशपांडे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सारिका डागा, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष यश संचेती आदींची उपस्थिती होती. जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख यांनी माहिती देताना सांगितले की, घाटाखालील तीन विधानसभा मतदार संघांत जिल्हा परिषद सदस्य २४, पंचायत समिती सदस्य ४८, नगरसेवक १४१ आणि २०० ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. सक्षम उमेदवार द्या आणि निवडून आणा असे आवाहन त्यांनी केले. आमदार डॉ. संजय कुटे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की बुथ मजबूत असणे ही विजयाची गुरुकिल्ली आहे. आपला गाव, सर्कल स्वतः सांभाळा. सत्ता आपली आहे, हा आपला प्लस पॉईंट आहे. दिवाळीनंतर निवडणुकांचे बिगुल वाजण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कामाला लागणे आवश्यक आहे. असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरदचंद्र गायकी व महेश पांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा सरचिटणीस ब्रह्मानंद चौधरी यांनी केले. या कार्यशाळेत जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानदेव मानकर, अरुण पांडव, प्रमोद हिवराळे, महादेव मिरगे, शाम पाटेखेडे, सुरेश गव्हाळ, ज्ञानेश्वर साखरे, लता ताठे-देशपांडे, गोदावरी दही-बोंबटकार, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख अनिल उंबरकर आदींसह जिल्हाभरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### शासकीय समित्यांवर लवकरच नियुक्त्या

राज्याचे कामगार कल्याण मंत्री ॲड. आकाश फुंडकर म्हणाले की, भाजपाच्या पदाधिकाऱ्यांची विविध शासकीय समित्यांवर नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांनाच स्थान दिले जाईल. पक्ष मजबूत करा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता काबीज करा, असे आवाहन त्यांनी केले.

## दृश्यकला स्पर्धेत श्री स्वामी विवेकानंद ज्ञानपीठची विद्यार्थीनी राज्यस्तरावर




**शेगाव/प्रतिनिधी**

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र शासन आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कला उत्सव स्पर्धा २०२५-२०२६ पुणे येथे २९ सप्टेबर ते ०१ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत श्री स्वामी विवेकानंद ज्ञानपीठची विद्यार्थीनी राज्यस्तरावर व्दितीय क्रमांक पटकावून यश प्राप्त केले आहे.

या स्पर्धेमध्ये पीएमश्री स्कुल श्री स्वामी विवेकानंद इंग्रजी ज्ञानपीठ नगर परिषद शेगांव मधील विद्यार्थीनी वैष्णवी बोपटे हिने दृश्यकला (मुर्ती बनविणे), दिव्या भोंगरे व गौरी बिलेवार यांनी दृश्यकला (मातीचे खेळणी बनविणे) या कला प्रकारात विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करून राज्यस्त्रीय स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. राज्यस्तरीय स्पर्धेचा निकाल २२ ऑक्टोबर ला घोषीत झाला असून त्यामध्ये शाळेची विद्यार्थीनी वैष्णवी बोपटे हिने दृश्यकला या स्पर्धेत व्दितीय क्रमांक प्राप्त करून शाळेचे नांव उज्वल केले. या स्पर्धेकरीता मुख्याधिकारी डॉ. जयश्री काटकर-बोराडे, उपमुख्याधिकारी राजवर्धन पाटील, प्रशासन अधिकारी प्रविण डिघोळे व प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग सुधाकर हिवाळे यांनी विद्यार्थीनीचे कौतुक केले. या कला उत्सव स्पर्धेकरीता मुख्याध्यापिका जयश्री इधोळ-चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक कराळे व शिक्षिका फदाट यांनी परीश्रम घेतले.


## जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून त्यांनी सौ.कौसल्या प्रभाकररामभाउ बावणे रा.शेंबा ता. खामगांव जि.बुलढाणा यांच्या मालकीची व ताब्यातील मौजे घाटपुरी, पो.तु.खामगांव जि.व जि.प.बुलढाणा येथील शेत सर्व्हे नं. १५/३-अ पैकी ४१ आर या शेताचे वि. तहसिलदार साहेब खामगांव यांचे फाईला वरील रे.के.नं. एनएपी-३४/घाटपुरी/१/१९९२-९३ आदेश दि. १९/०८/१९९२ नुसार रहिवासी करिता परावर्तीत झालेल्या ले-आउट प्लॉट क्र. १८ अठरा ज्याचे एकुण क्षेत्रफळ १७५.३२५ चौ.मि.म्हणजे १८८६.४९ चौ. फुट खुला प्लॉट ज्याची चतु सिमा पुर्वेस किसन नगर हायवे रोड व ले-आउट रोड. पश्चिमेस प्लॉट नं. १७, उत्तरेस ले-आउट मधील ६ मिटरचा रस्ता व दक्षिणेस -श्री देशमुख यांचे घर व अंकुश किराणा दुकान, येणे प्रमाणे चतुःसिमेच्या आतील मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला आहे. सबब सदर मालमत्तेसंबंधी कोणाचाही व कसल्याही प्रकारचा बोजा, भानगड, कर्ज, हक्क किंवा अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाचे आत खालील पत्त्यावर संबंधीत कागदपत्रांसह लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. अन्यथा त्यानंतर आमचे पक्षकार हे वरील मालमत्तेचे खरेदीखत लिहुन व नोंदवुन घेतील व मग कोणाचीही उजर राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- खामगांव
दिनांक :- २२/१०/२०२५

स्वाक्षरी
शिक्का
ॲड. एस. जी. बिहाडे,
हरेरामा हरेकृष्णा अपार्टमेंट खामगांव
मोबा.: ७०२००८०४१५

# वाशिम भूमि

शुक्रवार । २४ ऑक्टोबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com


## बसस्थानकावर महिलांची गर्दी; एसटीच्या उत्पन्नात वाढ

# भाऊबीज माहेरी ; सवलतीमुळे ताईची एसटीला पसंती!

**वाशिम / प्रतिनिधी**

भाऊबीजच्या दिवशी भावाला ओवाळण्यासाठी माहेरी जाणाऱ्या बहिणींची धावपळ संपूर्ण जिल्ह्यात पाहायला मिळाली. दिवाळीचा गोडवा आणि माहेरच्या ओढीबरोबरच राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) सवलतीमुळे महिलांची पावले यंदाही एसटीकडे वळली. वाशिम बसस्थानकावर गुरुवारी सकाळपासूनच महिलांची तुफान गर्दी दिसून आली.

राज्य शासनाने महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत दिल्यापासून एसटी बसने प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांची संख्या प्रचंड वाढली आहे. दिवाळीच्या काळात तर या सवलतीचा महिलांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. भाऊबीजच्या दिवशी बहिणींनी माहेरी जाण्यासाठी एसटीलाच पसंती दिली. खासगी वाहनांच्या तुलनेत सुरक्षित, स्वस्त आणि सुलभ प्रवासाचा पर्याय म्हणून एसटी पुन्हा महिलांची ''पहिली पसंती'' ठरली आहे. महिलांप्रमाणेच ज्येष्ठ नागरिकांनाही शासनाने दिलेल्या सवलतीमुळे प्रवासात सुलभता आली आहे. ६५ वर्षांवरील नागरिकांना प्रवासभाड्यात ५० टक्के सवलत तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा असल्याने अशा प्रवाशांसोबतच गावी जाणारे आणि परतणारे इतर प्रवाशी देखील एसटीला पसंती देत आहेत.



वाशिम बसस्थानकावर प्रवाशांची झालेली गर्दी (छाया: अक्षय काटे)

### जादा बसेस

■ राज्य परिवहन महामंडळाच्या अकोला विभागांतर्गत येणाऱ्या वाशिम, कारंजा, मंगरुळपीर आणि रिसोड आगारातून दिवाळी कालावधीत जादा बसेस सोडण्यात आल्या आहेत. प्रवाशांच्या वाढत्या गर्दीमुळे अकोला, अमरावती, हिंगोली, मेहकर आणि रिसोड मार्गांवर या जादा बसेस धावत असल्याने प्रवाशांना दिलासा मिळत आहे.

### चारही आगारांना उत्पन्नाची अपेक्षा

■ दिवाळीच्या गर्दीमुळे वाशिम विभागातील आगारांना चांगला आर्थिक फायदा होत आहे. वाशिम आगाराला सध्या दिवसाला साडेसहा ते सात लाख रुपयांचे उत्पन्न मिळत असून, कारंजा, रिसोड आणि मंगरुळपीर आगारांनाही प्रत्येकी साडेसहा ते सात लाख रुपयांपर्यंतचे दैनंदिन उत्पन्न मिळत असल्याचे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले. गावी जाण्याची आणि परतीच्या प्रवासाची लाट अजून काही दिवस राहणार असल्याने जिल्ह्यातील चारही आगारांच्या उत्पन्नात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

## समृद्धीवर अपघात

**मालेगाव / प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर चॅनल क्रमांक २५७+७०० मुंबई कॉरिडॉर येथे बुधवारी पहाटे दोन ट्रकमध्ये झालेल्या अपघातात दोन्ही ट्रक चालक अर्जुन नर्सिंग सुलाने (३७) आणि उमराज अन्सारी (३०) हे किरकोळ जखमी झाले. झोपेची डुलकी लागल्याने हा अपघात झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

## घरगुती वादातून चाकू हल्ला ; तरुण जागीच ठार

**मालेगाव / प्रतिनिधी**

तालुक्यातील आमखेडा गावात घरगुती वादातून चाकूने झालेल्या हल्ल्यात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना बुधवारी सायंकाळी सुमारास पाचच्या दरम्यान घडली.

या हल्ल्यात अविनाश निमिचंद चव्हाण यांचा जागीच मृत्यू झाला असून, काहीजण जखमी झाल्याची



माहिती मिळाली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, घरगुती कारणावरून झालेल्या वादातून काही व्यक्तींनी अविनाश चव्हाण यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. हल्ला एवढा गंभीर होता की, त्यात अविनाश यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. इतर काही व्यक्ती जखमी असून त्यांच्यावर वाशिम येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळावर आरोपींनी दोन विनानंबर मोटरसायकली सोडून पळ काढल्याचे पोलिसांनी सांगितले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे.


## नगर परिषद वाशिम अग्निशमन व आणीबाणी सेवा

पारंपारिकपणे फटाके हे दिवाळी, लग्न समारंभ आणि अशा इतर आनंदाच्या प्रसंगी साजरे करण्याचा अविभाज्य भाग बनतात. परंतु सुरक्षिततेची खबरदारी न घेता फटाक्यांच्या अंदाधुंद वापरामुळे आनंदाचे प्रसंग खिन्न होतात आणि अश्रू बदलतो. काही सावधगिरी, काही सुरक्षेची खबरदारी अशा विचित्र घटना वाचण्यास मदत करु शकते जेणेकरुन उत्सव अधिक उज्वल आणि उद्देशपूर्ण होईल. फटाके वापरताना काही सुरक्षा खबरदारी खालीलप्रमाणे असावी.

### दिवाळीत अग्निसुरक्षेसाठी करा:

* परवानाधारक विक्रेत्यांकडून फटाके खरेदी करा, अपघाताचा धोका कमी करण्यासाठी कायदेशीर मान्यता असलेले दर्जेदार फटाके खरेदी करत असल्याची खात्री करा.
* मोकळ्या जागेत फटाके फोडा: इमारती, वाहने आणि ज्वलनशील पदार्थांपासून दूर, उद्याने किंवा मोठ्या मैदानांसारख्या मोकळ्या ठिकाणी हलके फटाके वाजवा.
* पाण्याची बादली जवळ ठेवा: आगीच्या आपत्कालीन परिस्थितीत नेहमी पाणी हातात ठेवा.
सुती कपडे घाला: आगीशी संबंधित दुखापतींचा धोका कमी करण्यासाठी सुती कपडे घालण्यास प्राधान्य द्या, कारण सिंथेटिक कापड सहजपणे आग पकडू शकतात.
* मुलांचे पर्यवेक्षण करा: फटाके फोडताना मुलांनी सुरक्षेचे उपाय पाळले आहेत याची खात्री करण्यासाठी नेहमी प्रौढ व्यक्तीवर देखरेख ठेवा.
* फटाक्यांची योग्य विल्हेवाट लावा: फटाके फोडल्यानंतर वापरलेल्यांची विल्हेवाट लावा, उरलेल्या ठिणग्या पेटू नयेत म्हणून बादली पाण्यात.
* एका वेळी एकच फटाके पेटवा: अनपेक्षित स्फोट टाळण्यासाठी अनेक फटाके एकत्र लावणे टाळा.
* सुरक्षित अंतर राखा: इजा टाळण्यासाठी फटाके पेटवल्यानंतर त्याच्यापासून सुरक्षित अंतरावर उभे रहा.
* वाऱ्याची दिशा तपासा: फटाके नेहमी वाऱ्याची दिशा लक्षात घेऊन फटाके फोडा जेणेकरून ते घर किंवा लोकांकडे वाहू नयेत.

### दिवाळीत अग्निसुरक्षेसाठी काय करू नका:

* घरामध्ये फटाके पेटवू नका: घरांमध्ये, खिडक्याजवळ किंवा इतर मर्यादित जागेत कधीही फटाके पेटवू नका.
* सेल किंवा वाहणारे कपडे घालू नका: सहज आग पकडू शकणारे सैल कपडे घालणे टाळा.
* ज्वलनशील पदार्थांजवळ फटाके वापरू नका: फटाके सुकी पाने, गॅस सिलिंडर किंवा वाहने यासारख्या वस्तूंपासून दूर ठेवा.
* न जळलेले फटाके उजळून टाकू नका: जर फटाके पेटू शकले नाहीत तर ते पुन्हा पेटवण्याचा प्रयत्न करू नका. काही मिनिटे थांबा आणि नंतर त्याची सुरक्षितपणे विल्हेवाट लावा.
* इमर्जन्सी एक्झिट्स ब्लॉक करू नका: फटाके त्या भागात वाजत नाहीत याची खात्री करा
* आग लागल्यास बाहेर पडण्याचे किंवा सुटण्याचे मार्ग अवरोधित करू शकतात.
* मेणबत्त्या किंवा डायऱ्यांना लक्ष न देता ठेवू नका: तेलाचे दिवे, मेणबत्त्या किंवा डायऱ्यांना कधीही लक्ष न देता, विशेषत: पडदे किंवा ज्वलनशील पदार्थांजवळ ठेवू नका.
* भाजणे किंवा जखमांकडे दुर्लक्ष करू नका: कोणतीही दुखापत किंवा भाजल्यास, ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या. योग्य मार्गदर्शनाशिवाय घरगुती उपाय करू नका.

**राहुल शिवाजीराव मारकड**

प्र. नगर अग्निशमन अधिकारी, नगर परिषद, वाशिम



दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा



## कार्यालय नगर परिषद मंगरुळपीर, जि. वाशिम

ULB Code ८०२६७९

### "स्वच्छ दिवाळी-शुभ दिवाळी" व "माझी वसुंधरा अभियान ६.०" अंतर्गत फटाक्यांबाबत जाहीर आवाहन

मंगरूळपीर शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची अधिसूचना MPCB/JD/(APC)/TB/B-००७३ दि.०३/१०/२०२४ नुसार जास्त आवाज निर्माण करणाऱ्या/वायू प्रदूषण करणा-या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. तसेच आपणास सर्वांना माहीतच आहे की, आपण वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे एक महत्त्वाचे कारण आहे. विविध सण/उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूंची श्रेणी तयार करतात. हे वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हानी पोहचवितात. हवेचे प्रदूषण थांबवण्याची क्रिया आपण स्वतःपासून सुरू करू शकतो. सबब माझी वसुंधरा अभियान ६.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२६ अंतर्गत येणाऱ्या सण/उत्सवात फटाके वाजविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

तरी सर्व नागरिकांनी याची अंमलबजावणी करावी असे आवाहन करण्यात येत आहे. येणारी दिवाळी स्वच्छ दिवाळी-शुभ दिवाळी हरित पर्यावरणपूरक म्हणून साजरी करुयात. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो.



आपले घर व घराचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा.



कचरा रस्त्यावर / नालीत फेकू नये




ओला व सुका कचरा दररोज घंटागाडीतच टाकावा



आपल्या घरातील नळास तोटी बसवावी व पाण्याचा अपव्यय टाळावा.



प्लास्टिक पिशव्याचा वापर टाळा

स्वाक्षरी

**सतिश शेवदा**

मुख्याधिकारी

नगर परिषद, मंगरुळपीर जि. वाशिम

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे २८ वर्षांपासूनचे व्रत...

# दिवाळीचे तीन दिवस सातपुडा पर्वतरांगातील आदिवासींसोबत!

बुलढाणा/प्रतिनिधी

दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा, असे या सणाचे वर्णन केले जात असले तरी आजही समाजातील लाखो लोक या सण, उत्सवापासून वंचित आहेत. आपण दिवाळीचा आनंद आपल्या कुटुंब व मित्रपरिवारासह साजरा करतो पण महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासाठी दिवाळी म्हणजे केवळ सण नसून माणसांमधील नाळ अधिक घट्ट करणारा उत्सव आहे. दिवाळीचे तीन दिवस हर्षवर्धन सपकाळ यांनी सातपुडा पर्वतरांगांतील भिंगारा, चालीस टपरी, गोमाल या गावांतील गावकऱ्यांसोबत साजरे केले. दरवर्षी



या आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्याचे त्यांचे हे मागील २६ वर्षांपासूनचे व्रत आहे..

दिवाळी म्हणजे प्रकाशाची आराधना, आणि माझा हाच प्रयत्न असतो की माझी संपूर्ण शक्ती पणाला लावून हा प्रकाश येथे आणावा, अंधाराचे रूपांतर प्रकाशात करावे. ही परंपरा अखंड ठेवत, यावर्षी मी सलग २७ वे वर्ष येथील आदिवासी बांधवांच्या वस्त्यांमध्ये आणि गावांमध्ये दिवाळी साजरी करत आहे. आमची ही पद्धत केवळ सणापुरती मर्यादित नसून, मिष्टान्न वाटपाबरोबरच सामुदायिक भोजन, ग्रामसभा आयोजन, वैद्यकीय शिबिरे आणि वस्त्रवाटप हे या उत्सवाचे अविभाज्य घटक आहेत. हे कोणतेही बाहेरून येऊन केलेले औपचारिक सोहळे नाहीत. जसे आपण आपल्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी करतो, तसेच हे माझे कुटुंब आहे आणि आम्ही सर्व मिळून हा प्रकाशाचा सण एकत्रितपणे साजरा करतो'', असे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### जिथे अंधार आहे तिथे पोहोचण्याचे काम

■ आदिवासींसोबत दिवाळी साजरी करण्याबाबत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, ''हा गोमाळ परिसर माझ्यासाठी केवळ एक भूभाग नाही; माझे येथे सखोल ऋणानुबंध आहेत. येथील लोक माझे केवळ आप्तजन नाहीत, तर ते माझे स्वकीय, माझे कुटुंब आहेत. या सर्वांशी माझे अतूट आणि दृढ नाते जोडले गेले आहे. गेल्या २६ वर्षांपासून मी एक व्रत जपले आहे. माझ्या क्षमतेनुसार, माझ्या कुवतीनुसार माझ्याजवळ असलेला प्रकाश घेऊन, जिथे अंधार आहे तिथे पोहोचण्याचे काम करत आहे.

# समाजकार्याच्या विद्यार्थ्यांची सामाजिक संदेश रॅलीतून जनजागृती

बुलढाणा/प्रतिनिधी

स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय बुलढाणा द्वितीय वर्षाच्या समुदाय विकास विभागाच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्र अध्ययन अंतर्गत ग्राम खुपगाव ता. बुलढाणा येथे १८ ऑक्टोबर रोजी सामाजिक संदेश रॅलीचे आयोजन केले. या रॅलीतून विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना सामाजिक संदेश देत जनगागृती केली.

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना क्षेत्र अध्ययनातून प्रत्यक्ष समाजकार्याचा अनुभव यावा यासाठी क्षेत्र अध्ययन अनिवार्य असते. समुदाय विकास विभागाअंतर्गत द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी खूपगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना संघटित करून सामाजिक संदेश रॅलीचे आयोजन केले. या रॅलीच्या माध्यमातून बालविवाह, प्लास्टिक मुक्त पर्यावरण, बेटी बचाओ - बेटी पढाओ अभियान, स्वच्छ गाव,



सुदृढ आरोग्य इत्यादी महत्त्वाच्या सामाजिक विषयांबाबत संदेश दिला. विविध सामाजिक संदेशांचे फलक हातामध्ये घेऊन जिल्हा परिषद शाळेच्या चिमुकल्यांनी गावकऱ्यांना आकर्षित करून जनजागृती केली. सामाजिक संदेश रॅलीचा समारोप कार्यक्रम जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात पार पडला. दरम्यान विविध विषयांवर समाजकार्याच्या विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला.

महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश गेडाम, समुदाय विकास विभाग प्रमुख प्रा. डॉ. अस्मिता ठोंबरे, प्रा. अर्जुन बोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली द्वितीय वर्षाच्या उडाण गटातील विद्यार्थ्यांकडून रॅलीचे नियोजन करण्यात आले होते. सदर रॅलीसाठी साक्षी तायडे, गोपाल घेवंदे, विवेक तायडे, प्रज्ञा सरदार, वनिता अवसरमोल, राहुल सुरडकर, अनुराधा वावगे, गजानन हिंगे इत्यादींनी परिश्रम घेतले. याप्रसंगी मुख्याध्यापक तायडे, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, खूपगाव ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# स्व:खर्चाने बुजविले रस्त्यावरील खड्डे

किशोर काळे यांचा स्तूत्य उपक्रम..

गोहोगाव दांदडे/प्रतिनिधी

डोणगाव ते केनवड या मुख्य रस्त्यावर हायवेवर काही ठिकाणी मोठमोठे जीव घेणे खड्डे पडलेले आहेत. यामुळे या हायवेवर जोरात चालणाऱ्या गाड्या व समोर अचानक खड्डे आल्याने किरकोळ अपघात त्याचप्रमाणे गाड्यांचे नुकसान होत असल्याचे चित्र दिसत आहे. यावर उपाय म्हणून गोहोगाव येथील सामाजिक कार्यकर्ते किशोर प्रल्हाद काळे यांनी स्वःखर्चाने रस्त्यावरील खड्डे बुजविले. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीने समाजातील विविध स्तरातून त्यांचे कौतूक होत आहे.

सध्या दिवाळी व भाऊबीज सणाची धामधूम जोरात सुरू आहे. यामध्ये सरासरी सर्वसामान्य नागरिकांचा सोबत महिला बसवून



मोटर सायकलने प्रवास मोठ्या प्रमाणात केला जात आहे. मात्र या खड्ड्यांमुळे दुचाकी, चारचाकी यासह इतर वाहन धारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर काही गाड्यांचे नुकसान होत असल्याचे विदारक चित्र होते. गोहोगाव येथील सदन कास्तकार असलेले किशोर प्रल्हाद काळे, यांच्या मुलाचा व सुनेचा दाताचा दवाखाना व्यवसाय केनवड या ठिकाणी आहे.त्यामुळे त्यांच्या मुलाचे दररोज येणे - जाणे असल्यामुळे त्यांना ही अडचण जाणवल्याने त्यांनी २२ ऑक्टोबर बुधवारी या मार्गावरील पिंपरी सरहद्द, कुकसा, केनवड यादरम्यानचे असलेले मोठमोठाले खड्डे दोन मजूर लावून स्वतःच्या खर्चाने बुजविण्याचे काम केले. यामुळे काही प्रमाणात का होईना त्या ठिकाणचे मोठमोठे जीवघेण खड्डे बुजबिल्याने त्या खड्ड्यामुळे होणारे किरकोळ अपघात व गाड्यांचे नुकसान टळण्याला मदत होणार आहे. याही अगोदर गेल्या वर्षी त्यांनी स्वतःच्या खर्चाने गोहोगाव दांदडे ते डोणगाव या मुख्य रस्त्यावरील खड्डे सुध्दा स्वःखर्चाने बुजवण्याचे काम केले होते, हे विशेष...!

# सापडलेला मोबाइल केला परत; अजय जाधव यांचा प्रामाणिकपणा

**बुलढाणा :** सध्या दिवाळीचे दिवस आहेत. बाजारात, चौका चौकात विलक्षण गर्दी आहे. या गर्दीचा फायदा घेत चोर आणि भुरटे कधी कोणाचे दिवाळे काढतील सांगता येत नाही. कष्टाने आणि मेहनतीने कमीवलेल्या पैसे व वस्तुंना चोरटे भुरटे कधी गुल करतील सांगता येत नाही. परंतु बुलढाणा शहरात प्रामाणिक युवक असल्याचा प्रत्यय शिवाज्ञा फाऊंडेशनचे, नांद्राकोळी येथील अजय जाधव यांनी दिला. सापडलेला मोबाईल परत करत त्यांनी आपल्यातील माणूसकीचे दर्शन घडविले.

कृषी उत्पन्न बाजार समिती समोर वरच्या रस्त्याने चढताना अजय जाधव यांना अंदाजित २३ हजार रुपये किंमतीचा मोबाईल सापडला. या वेळी



अजय जाधव यांनी सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर वाघमारे यांची भेट घेऊन, मोबाईल वर आलेल्या कॉलच्या द्वारे मोबाईल मालकांची ओळख तपासून घेतली. त्यांनंतर बुलढाणा शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवी राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा मोबाईल मालक तुषार पवार यांना परत केला. या प्रामाणिक पणाचे कौतूक न करता प्रत्येकाने अडचणीत सापडलेल्यांना मदत करण्याचे आवाहन अजय जाधव यांनी केले आहे.

# स्पर्धा परीक्षेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी जोपासली गुरुनिष्ठा

**मेहकर** : मेहकरमध्ये ज्या वेळेला स्पर्धा परीक्षेचे फारसे वातावरण नव्हते. तेव्हा जवळपास २२ वर्षापूर्वी मेहकरमध्ये राईतकर करिअर मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक भगवान राईतकर हे स्थानिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहे. विविध स्पर्धांमधून शासकीय सेवेत निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांनी शिक्षक राईतकर यांना भेटून त्यांचे आशीर्वाद घेतले.

'ऑल सब्जेक्ट अँड वन टीचर' असा पॅटर्न त्यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करतांना उपयोगात आणला होता. सर्व विषय शिक्षक भगवान राईतकर हे स्वतः शिकवायचे. त्यांच्या



मार्गदर्शनामध्ये स्पर्धा परीक्षमधून शेकडो विद्यार्थी सिलेक्ट होऊन प्रशासकीय सेवेमध्ये कार्यरत आहेत.

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून निवड झालेले विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हे वर्षातून किमान एक वेळा भगवान राईतकर यांची भेट घेतात आणि जुन्या आठवणींना उजाळा देत, आपल्या स्पर्धा परीक्षा गुरुजींकडून आशीर्वाद घेत असतात. दिवाळीनिमित्त गजानन सोनुने (पोलीस उपनिरीक्षक, अमरावती शहर), उदय किल्लेकर ( कोर्ट , वाशिम), अश्विन मोरे (शिक्षक व गझलकार) गाडे पाटील (युवा उद्योजक) यांनी भगवान राईतकर सर यांची भेट घेतली व दिवाळी या पावनपर्वावर आपल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक गुरुजींचे आशीर्वाद घेतले.




